
लाट
हमीद दलवाई

# लाट

# लाट

हमीद दलवाई

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन
५२८

पहिली आवृत्ती
६ मार्च १९६१
दुसरी आवृत्ती
२८ सप्टेंबर १९९०
तिसरी आवृत्ती
२६ जानेवारी २००३

© २००३ श्रीमती मेहरुन्निसा दलवाई

मुखपृष्ठ
बाळ ठाकूर

किंमत शंभर रुपये

ISBN 81-7486-297-8

प्रकाशक
संजय वि० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
माधव द० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

पहिल्या दोन आवृत्त्यांचे
प्रकाशक
मंजुळ प्रकाशन
पुणे ४११ ००१

श्री० मधु लिमये यांस

# ‘लाट’च्या निमित्ताने थोडेसे

हमीद दलवाई मराठीतून साहित्य-लेखन करू लागले, तेव्हा त्यांची फारशी दखल मराठी मुसलमानांना घ्यावीशी वाटली नाही. इतर लेखकांप्रमाणेच त्यांचे लेखन असणार अशी त्यांची समजूत होती. पण हमीदने जेव्हा स्वत: पाहिलेल्या, अनुभवलेल्या मराठी मुसलमानांच्या जीवनावर लिहायला सुरुवात केली तेव्हा ते काहीसे बेचैन झाले.

वैचारिक आणि ललित असा भेद करण्याची आपल्याकडे प्रथा पडली आहे. त्यांच्यात दुर्लभ्य असा भेद आहे अशी समजूत. महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ ठाकूर यांचे साहित्य वाचले की, हा भेद किती वरवरचा आणि नकली आहे ते ध्यानी येते. महात्मा गांधींच्या वैचारिक लिखाणात केवढे तरी लालित्य आढळते आणि रवींद्रांच्या ललित म्हणवल्या जाणाऱ्या लेखनात केवढी विलक्षण विचारवत्ता प्रकट झाली आहे, ते पाहून मन चकित होते. हमीदने वैचारिक लिखाण केले तसे ललित लेखनही केले आणि ते दोन्ही प्रवाह सरमिसळ झालेले आढळतील.

हमीदच्या वैचारिक साहित्याचे वेगळेपण त्याच्या वास्तवाच्या सम्यक आकलनात आणि निर्भय मांडणीत दिसून येते. तीच गोष्ट त्याचे ललित साहित्य वाचतानाही जाणवते. त्याचे मानवी भावजीवनाचे आकलन सम्यक वास्तवावर आधारलेले आहे. तो मुस्लिम समाजात वावरला, वाढला. त्या जीवनातील विविध रसधारा त्याने पाहिल्या, चाखल्या. इतर मुस्लिम लेखकांप्रमाणे आपला समाज वगळून त्याने फारसे लिहिले नाही. त्याच्या काव्यात्म सत्याच्या मुळाशी वास्तव सत्य ठाम उभे असते. त्याने माणसे बेचैन, प्रक्षुब्ध झाली तरी ते वास्तव सत्य नाकारणे कोणालाच शक्य नसते.

‘लाट’ हा हमीदच्या कथांचा संग्रह. त्याच्या गाजलेल्या कथांचा या संग्रहात अंतर्भाव केलेला आहे. साधना प्रकाशनाने पानशेतफुटीच्या आधी हा संग्रह प्रकाशित केला आणि दुर्दैवाने त्याच्या प्रती मोठ्या प्रमाणावर वितरित होण्याआधीच तो पाणलोटाचे भक्ष्य झाला! त्यानंतर त्याची एखादी प्रत मिळणेही अवघड झाले. शेवटी मेहरुन्निसा दलवाई यांनी मोठ्या कष्टाने एक प्रत मिळवली व त्यामुळे हे पुनर्मुद्रण शक्य झाले. मंजुल प्रकाशनचे श्री० सुनील अंबिके यांनी प्रकाशनाची जबाबदारी हमीदबद्दलच्या आपलेपणाने उचलली. हमीदने ‘इंधन’ नावाची एक कादंबरीही लिहिली आहे आणि तीही प्रक्षोभक ठरली आहे. हिंदीत त्या

कादंबरीचा अनुवाद प्रकाशित झाला आहे.

हमीदच्या वैचारिक साहित्याचे आखात ललित साहित्यात शिरले आहे आणि त्याच्या ललित साहित्याचे भूशीर त्याच्या वैचारिक साहित्यात घुसले आहे. वैचारिक साहित्यात जशी त्याची निर्भय सत्यनिष्ठा जाणवते, तशी त्याच्या ललित साहित्यातही आढळते. त्यामुळेच त्याच्या साहित्यात जी काय अभिसरणक्षमता आली आहे ती आलेली आहे. जमातवादी मुस्लिमांच्या तीव्र प्रतिक्रिया त्याच्या दोन्ही प्रकारच्या साहित्याबद्दल झाल्याचे आढळते. ही त्याच्या साहित्य क्षेत्रातील कर्तृत्वाला मिळालेली अप्रत्यक्ष मान्यताच आहे. त्याच्या साहित्याची मुस्लिमांनाही उपेक्षा करून चालण्यासारखे नाही. एका अर्थाने हा वानवळा आहे. हमीदला आणखी आयुष्य लाभते तर मराठी ललित साहित्यावर त्याचा स्वतंत्र ठसा उमटू शकला असता एवढी ग्वाही द्यायला हे साहित्य पुरेसे आहे.

मराठी साहित्य आता कुंपणाबाहेर पडले आहे आणि त्यात व्यापकता आली आहे. अवघे मराठी जीवन आपल्या कवेत घेण्याची धडपड चाललेली दिसते. साहित्यावर जात-वंश-धर्म-भाषा किंवा यौन यांचे बंधन येते तेव्हा त्याची एकात्म समाज घडवण्याची शक्ती संपुष्टात आलेली असते. सर्व समाजघटकांच्या जीवनातील भावभावनांच्या धाग्यांनी साहित्याचे सणंग विणले गेले पाहिजे. हमीद दलवाईचे साहित्य हे या नव्या जाणीवेची चाहूल देणारे आहे. आपण मूढपणाने भाषा, लिपी, पोषाख, नावे यांची निरगाठ निष्कारणच जात-धर्माशी बांधली आहे आणि त्यातूनच दुरावा आणि परकेपण जोपासले गेले आहे. ही निरगाठ सुटली म्हणजे साहित्याला अनेक अंगांनी बहर येईल.

'लाट' हे हमीदचे पुस्तक दिशादर्शक आहे. प्रादेशिक भाषांचा स्वीकार जातिधर्म निरपेक्षपणे केला जाईल तेव्हा त्या त्या भाषांच्या साहित्यात समाजाच्या सर्व घटकांचे प्रतिबिंब पडलेले दिसेल आणि त्याने ते साहित्य समृद्ध होईल. जातिधर्माच्या बेड्या तोडण्याच्या कामी हमीदने मोठी कर्तबगारी दाखवली व एक नवी वाट वहिवाटली म्हणून त्याच्या पुस्तकांचे महत्त्व.

**–यदुनाथ थत्ते**

१ छप्पर
८ कफनचोर
१४ कळ
२३ ओॲसिस
२९ पराभूत
४२ तळपट
४८ शेरणं
५२ बेकार (पण कलावंत) माणसाची गोष्ट
६३ माणूस आणि गाढव
६९ महफिल
८० खुदा हाफिज
९२ लाट
१०० आम्हां चौघांची बाई

# छप्पर

जवळ जवळ चार वर्षांनी आपले शिक्षण संपवून अबासखानाचा मुलगा करीम जेव्हा घरी गेला, तेव्हा घराच्या छपराशीच थांबून, कपाळाला आठ्या घालीत आपल्या बापाला म्हणाला, ''काय हा काळोख आपल्या घरात? धड चालायलासुद्धा जमत नाही!''

अबासखानाने मुलाचे आपादमस्तक निरीक्षण केले. वीस वर्षे या घरात वावरलेल्या माणसाला चालायला न जमायला काय झाले? तो मुलाला हसत हसत म्हणाला, ''मुंबईच्या लायटातून आल्यावर असंच वाटतं माणसाला. मी जेव्हा पहिल्यांदा घरी आलो...'' आणि त्याने नेहमीप्रमाणे आपल्या भाकडकथा तिथल्या तिथे मुलाला सांगायला सुरुवात केली. पण करीम तेथे थांबला नाही. त्याची बाळंतपणासाठी आलेली बहीण आजारी पडली होती. बापाला तिथेच बोलत ठेवून तो काळोखातून ठेचा खात बहिणीच्या खोलीत गेला आणि खाटेवर झोपलेल्या बहिणीला पाहून आश्चर्याने म्हणाला, ''तू अशी पांढरी फटफटीत का पडली आहेस?''

ती निस्तेजपणे हसली. बाजूला तिच्या कुशीत तिचे मूल शांतपणे झोपी गेले होते, त्याला ती हळूच थोपटू लागली.

''तुला होतं आहे तरी काय?'' त्याने पुन्हा संशयाच्या स्वरात विचारले.

या वेळी मात्र त्याच्या पाठोपाठ खोलीत आलेल्या त्याच्या आईने उत्तर दिले, ''तिला काहीसुद्धा झालेलं नाही.''

''नाही काय? मी उद्या डॉक्टरकडून तपासणी करून घेतो.''

''बरं घे. पण आता हातपाय धुवायला चल.''

तिथून तो घरात गेला. पण त्याचे मन मात्र शांत झाले नाही. बहिणीची पाहिल्यापासून त्याला एक चमत्कारिक शंका येऊ लागली. दुसऱ्या दिवशी आई-बाप 'नको नको' म्हणत असताना त्याने अट्टहासाने डॉक्टरला आणले आणि तिला तपासून घेतले. तिचा पाहिल्यापासून जो संशय त्याला येत होता, तो खरा ठरला! तिला क्षय झाला होता!

घरातल्या माणसांना हे ऐकून धक्का बसला. ती बरेच दिवस आजारी होती. परंतु तिचे दुखणे किरकोळ असेल, असे त्यांना वाटत होते. त्या दिवशी घरातले वातावरण पार बदलून गेले. अबासखान, त्याची बायको आणि धाकटी मुलगी अशी तिघेही खिन्न होऊन स्वस्थ

बसून राहिली. आजाऱ्याच्या खोलीतही कुणाला जावेसे वाटेना.

करीमची विवंचना मात्र वेगळी होती. तो त्यांच्यातला शहाणा माणूस होता. क्षयासारखा भयंकर रोग आणि त्याचा सांसर्गिक प्रसार या गोष्टी त्याला चांगल्या समजत होत्या. भीतीने तो थरारून गेला.

दोन-चार दिवस गेल्यावर तिला द्यायचे म्हणून, डॉक्टरचे औषध सुरू झाले; कारण आता कसलाच उपयोग होणार नाही, हे त्याने स्पष्ट सांगितले. घरातले वातावरण साधारणसे ताळ्यावर येताच करीमने, आजारी बहिणीपासून सगळ्यांनी जपून राहावे म्हणून त्यांना ताकीद दिली. धाकट्या बहिणीने त्याने सांगितलेले सगळे ऐकून जवळजवळ सोडून दिले आणि आई सरळच त्याच्याशी युक्तिवाद करू लागली. ती म्हणाली, ''अरे, आपलं नशीब फुटकं, त्याला काय करणार!''

''होय, ते खरं!'' करीम तिच्याजवळ बोलू लागला, ''पण हा रोग अगदी भयंकर आहे. बाकीच्यांनी जपलं पाहिजे. तिची भांडी, कपडे, सगळं अलग ठेवा.'' आणि अगोदर जे सांगितलं तेच तो पुन्हा पुन्हा सांगू लागला.

''मी जलमभर शीक माणसाचं खात आले. मला काय झालं?'' ती म्हणाली, ''अरे बाबा, नशीब! नशिबाच्या गोष्टी आहेत!''

''पण नाही खाल्लं तर काय झालं? तिचं अलग ठेवलंस तर काय बिघडलं?''

''बरं! तुझ्या मनासारखं! मी सगळं अलग ठेवते.'' आणि तिने बोलणे बंद केले.

करीमच्या मनाला थोडे समाधान वाटले. काही दिवस गेले. बहिणीची प्रकृती हळूहळू ढासळत चालली. तो मनातल्या भीतीने अनेक दिवस तिच्या खोलीकडे फिरकला नाही. तिच्या जवळ जाऊन तिची विचारपूस करण्याचा अनेकदा मनात आलेला विचार त्याने भीतीने, संशयाने दडपून टाकला. परंतु त्याचे मन त्याला खाऊ लागले. बहिणीवरील प्रेमाने त्याच्या मनातल्या भीतीला मागे सारले आणि एक दिवस त्याने जेव्हा तिच्या खोलीत जाण्यासाठी दरवाजात पाऊल टाकले, तेव्हा त्याची धाकटी बहीण आत असलेली त्याने पाहिली.

आजारी माणसाच्या शुश्रूषेला कोणी तरी हवे होते म्हणून ती बसली होती. 'फार वेळ आत बसत जाऊ नको,' अशी तिला पुन्हा ताकीद देण्याचे त्याने ठरविले. तो आत जाणार, तेवढ्यात त्याचे तिच्याकडे लक्ष वेधले आणि तो जागच्या जागीच उभा राहिला.

तिच्या हातात पेजेचा पेला होता आणि चमच्याने ती आजारी बहिणीला पेज पाजीत होती. तिने एकदोन चमचे मोठ्या मुष्किलीने घेतले. मग हाताने 'नको' म्हणून सांगितले. काही वेळ हातातच पेला घेऊन धाकटी बसून राहिली. तेवढ्यात क्षीण आवाजात थोरली म्हणाली, ''तू पिऊन टाक ती पेज.''

धाकटीने हातातला चमचा पेल्यातल्या पेजेने भरला आणि तोंडाला लावला. त्याबरोबर दारातून तो ओरडला, ''टाक! टाक ती पेज! पिऊ नको!''

दोघीही एकदम दचकल्या. आणि धाकटीच्या हातातला पेला खाली आपटला!

करीम दरवाजातूनच परत फिरला.

त्या दिवशी त्याने सगळे घर डोक्यावर घेतले. आईला तो म्हणाला, ''साली सगळी जंगली माणसं आहात तुम्ही!''

''होय बाबा, आम्ही जंगलीच आहोत. आमचे दिवस गेले ना पण?'' तिला एकंदरीत अधिक बोलायची इच्छा नव्हती. मुलीच्या आजाराने आणि मृत्यूच्या जाणीवेने ती भेदरून गेली होती.

पण तो तेवढ्यावरच गप्प बसला नाही. ''गेले कसले?'' तो उसळून म्हणाला, ''तुझे एक गेले; पण ह्या पोरीचे जायचे आहेत की नाही?''

''हो रे बाबा. बस कर आता! हे मला गुपचूप का बोलला नाहीस? आत तिच्या समक्ष कशाला तमाशा केलास? तिची तबियत जास्तीच बिघडली आहे आता, समजलास?''

आणि हा वाद थांबवून ती जवळजवळ डोळे पुशीत आजारी मुलीच्या खोलीत गेली.

जवळ जवळ महिनाभराने बहीण मृत्यू पावली. ती मरेपर्यंत तो पुन्हा म्हणून तिच्या खोलीत गेला नाही. तिचा महिना झाला आणि घर पूर्ववत शांत झाले. अबासखान छपरात सकाळ-संध्याकाळ बसू लागला. आई चुलीशी लुडबूड करू लागली आणि धाकटी बहीण, बहिणीचे मागे राहिलेले मूल सांभाळू लागली.

आणि त्याने एक दिवस सारे घर शेणाने सारवायला सांगितले. घरातल्या गोष्टीत अबासखान लक्ष घालीत नसे. या वेळी जेव्हा त्याला छपरातले बिस्तर हलवावे लागले, तेव्हा त्याने मुलास विचारले, ''तू या नसत्या गोष्टीत कशाला लक्ष घालतोस? काही उद्योगधंदा बघ. शेतावर जात जा!''

मुलाला शेतावरच पाठवायचा होता तर त्याला चार वर्षे शिकवला कशाला याचा विचार अबासखानाने कधी केला नाही आणि करीमनेही आपल्या डोक्यात कधी आणला नाही. शेतावर जायचा त्याला नेहमीच कंटाळा असे. बापाला काही उत्तर न देता तो मनातल्या मनात चिडला.

''आपण घरात जास्ती लक्ष देऊ नये.'' अबासखान पुन्हा म्हणाला, ''आपल्या संसारात लक्ष द्यावं.''

त्याने ऐकले न ऐकल्यासारखे केले आणि तिथून तो बाजूला झाला. घर सारवण्याचा कार्यक्रम मात्र पार पडला. तो आपल्या मनात बापाच्या बोलण्याचा विचार करीत राहिला.

असे चारसहा महिने गेले आणि त्याची धाकटी बहीण एक दिवस रक्त ओकली. चांगली तस्तभर रक्त ओकली. तिने अंथरूण धरले. त्याच्या आईबापांच्या तोंडचे पाणी पळाले. एकाएकी पोरीला झाले तरी काय?

तो मात्र भीतीने भेदरून गेला. पुन्हा त्याच्या मनात भीती आणि संशय ठाण मांडून बसली. मृत बहिणीचा कृश देह त्याला डोळ्यांसमोर दिसू लागला आणि तिची उष्टी पेज पिणारी धडधाकट धाकटी बहीण...

पहिल्यासारखाच डॉक्टर आला आणि त्याने क्षयाचे निदान केले. ऐन तारुण्यातच तिला

क्षयाने गाठल्याचा त्याचा संशय खरा ठरला. रक्त ओकून ओकून पंधरावीस दिवसांत ती खंगून गेली. अंथरुणातून उठून बसण्याचेही सामर्थ्य तिला राहिले नाही. त्या पहिल्याच खोलीत आता तिची खाट पडली आणि तिच्याऐवजी तिची आई शुश्रूषा करू लागली. धाकट्या पोरक्या मुलाची त्याच्या बापाच्या घरी रवानगी झाली.

भीतीने आणि संतापाने तो स्वत:शीच धुमसत राहिला. पण मग त्याने मनाचा निश्चय केला. आई-बापांना बोलण्याचे, ऐकवण्याचे त्याने ठरविले. रागाने थरथरत तो एक दिवस आई-बाप सचिंत बसली असताना ओरडला, ''मी पहिल्यापासून सांगत होतो. तिचे सगळे अलग ठेवा. तिच्या वस्तूंचा संपर्क कशाला लावू नका. पण तुम्ही माझं ऐकलं नाही आणि ह्या पोरीनंसुद्धा! आता बघा! हिनं तिचं उष्टं खाल्लं, आता तुम्ही हिचं खा! सगळ्या घराचा एकदा तापा बसवून टाका!''

दोघे स्तब्धपणे ऐकत राहिली.

''सगळा जंगलीपणा आहे. तेच नडलं आहे! आता बस झालं! जरा हुषार व्हा! दुनियेत काय चाललंय ते बघा!''

''कशाला बघायची आहे दुनिया आता? माझ्या नशिबात आलं खरं भोगायला!'' अगदी असह्य होऊन रडत त्याची आई म्हणू लागली, ''पण यावर काही इलाज नाही काय रे? माझी पोर यातून वाचणार नाही काय रे?''

''नाही आई, नाही. रोग आता बरा होण्याच्या पलीकडे गेलेला आहे. थर्ड स्टेज आहे, थर्ड स्टेज! म्हणजे काय? अगदी शेवटची अवस्था. समजलं?''

''काय सालं-काय साला नशीब तरी!'' इतकेच अबासखान मध्येच बोलला.

''कां नाही रे करीम? माझ्या जिवा, परवरदिगारनं मनात आणलं तर माझं सोनं बरंसुद्धा होईल. माझी नुसती न्होवरी रे करीम!'' आणि अनावर वात्सल्याने ती रडू लागली.

बायको रडू लागताच अबासखान पुन्हा म्हणाला, ''रडायचं कशाला? आँ? रडायचं कशाला? तिला दुवा करायची! तिला बघायची. जा, तिच्या खोलीत जा.'' तेव्हा मग ती उठून गेली आणि हे संभाषण एवढ्यावरच थांबले.

बहीण आजारी पडल्यापासून करीम अतिशय सावधपणे घरात वावरत होता. स्वत:चे कपडे, खाणे-पिणे इकडे तो जातीने लक्ष देऊ लागला. स्वयंपाकघरात त्याची नजर प्रत्येक वस्तूवर बारकाईने फिरू लागली. आई बहिणीच्या खोलीत गेली असता संशयाने तो दाराबाहेर घुटमळू लागला. पुष्कळ वेळ घरात वावरणे त्या दिवसांत त्याला भीतीचे वाटू लागले. परंतु बाहेर कोठेही जायची त्याची वहिवाट नव्हती. बापाने पुन्हा एकदा त्याला शेतावर जायला सांगितले; पण त्याने तिकडे लक्ष दिले नाही.

बहिणीचे दुखणे कैक महिने रेंगाळले. तितके दिवस मनाच्या चमत्कारिक अवस्थेत त्याने घालवले. भीतीने भेदरल्यासारखा तो त्या दिवसांत वावरला. अगदीच वाईट दिसेल या भावनेने एकदा–फक्त एकदा–तो बहिणीच्या खोलीत डोकावला; पण फार वेळ तिथे थांबला नाही. दोन क्षणांतच तिथून तो बाहेर पडला.

अखेर ती एकदाची मृत्यू पावली.

तिचा महिना झाल्यावर त्याने पुन्हा सगळे सोपस्कार करायला लावले-घर सारवण्याचे आणि स्वच्छ करण्याचे. बापाने अवाक्षर न काढता या वेळी आपली गादी आपणहून उचलली.

पण ते करूनही या वेळी त्याचे मन पूर्वीसारखे शांत झाले नाही. संशयाचा, भीतीचा अंश त्याच्या मनात शिल्लक राहिला आणि त्याला पोखरू लागला. क्षयाने दोन माणसे घरातून नेली. आता तिसरे तर नेणार नाही? क्षय घरात कायमचाच ठाण तर मांडणार नाही?

त्याची शंका थोड्याच महिन्यांत खरी ठरली. अबासखान आता क्षयाचे भक्ष्य बनला! एकाएकी म्हातारा रक्त ओकू लागला. झपाट्याने मरणाच्या पंथास लागला.

या वेळी क्षयाने त्याला विचार करायलाही विशेष अवधी दिला नाही. एखाद्या घोडेस्वारासारखा घोडदौड करीत तो आला आणि फरपटत ओढून घेऊन गेला. पंधरा दिवसांत सगळा खेळ खतम झाला. या पंधरा दिवसांत दिङ्मूढ अवस्थेत तो घरात (खरे म्हणजे घराबाहेर) वावरत होता.

अबासखान मेल्यावर त्याची लुळी पडलेली विचारशक्ती जागृत झाली. क्षयाचा एकच विचार त्याच्या डोक्यात धुमाकूळ घालू लागला. स्वत: काळजीपूर्वक राहण्याचे, घरात वावरण्याचे त्याने ठरवले. घरात झोपण्याचे त्याने प्रथम सोडून दिले आणि तो छपरात झोपू लागला. मग सगळे घर त्याने यावेळी फिनेलने धुऊन घेतले. अगदी स्वच्छ केले. घराची काही कौले उसवली आणि आत प्रकाश खेळू दिला.

पण इतके करून त्याचे समाधान झाले नाही. त्याच्या मनातली धास्ती कमी झाली नाही. एकदा छपरात खाटेवर पडल्या पडल्या त्याच्या डोक्यात एकदम एक विचार आला आणि तो धावत घरात आईजवळ गेला.

ती वठणातल्या काळोखात बसली होती.

''ह्या काळोखानं सगळा सत्यानाश केला आहे.'' तो म्हणाला.

नवरा मेल्यापासून पांढरे नेसून ती वठणात बसत होती आणि जायलाच हवे म्हणून चुलीशी जात होती. बोलायचे तर तिने जवळ जवळ सोडूनच दिले होते. (बोलणार तरी कुणाशी?)

''घराचं छप्पर मोडलं पाहिजे.'' उभ्या उभ्या तिच्या दिशेने पाहत तो म्हणाला.

''छप्पर मोडलं पाहिजे? का?'' काळोखातून तिचा आवाज त्याला ऐकू आला.

''घरात काळोख येतो म्हणून!''

''तुला वेड तर नाही लागलं? अरे, काळोख येतो म्हणून वाडवडिलांनी बांधलेलं छप्पर मोडायचं?''

''मग काय झालं? ह्या काळोखानं सगळा सत्यानाश केला आहे! त्यासाठी काय आता घरातल्या उरलेल्या माणसांनी मरायचं?''

''मरायला आता राहिलंय रे कोण? गेली सगळी! गेली!'' ती रडू लागली.

परंतु करीम या वेळी निश्चयाने म्हणाला, ''गेली ती गेली. तुला आणि मला जगायचं आहे

ना? म्हणून मोडायचं छप्पर.''
''मी नाही मोडू देणार छप्पर! तुला माहीत आहे या छपराची कुळकथा?''
''नाही.''
''मग ऐक. तुझ्या वाडवडिलांनी हे छप्पर बांधलं आणि मग ह्या घराची भरभराट झाली. घर भरलं. धान्यांनी, माणसांनी. हे छप्पर असं भाग्याचं आहे. ते मोडल्यावर राहिलं काय?''
''पण मी आणि तू राहिलो पाहिजे ना?''
''भलतंच बोलू नको. तुला काय होणार आहे माझ्या जिवा! भलतंच मनात कसं घेतोस? खुदा तुला शंभर वर्षांची हयाती देवो!''
''ह्या काळोखात? ह्या छपराखाली? शक्य नाही. मी नाही राहणार त्यात!''
''मग काय करणार? इथं राहायचं नसलं तर कुठे बाहेर मुलखाला जा. नोकरीधंदा कर!''
''मी? ते कशाला म्हणून?'' त्याने स्वत:शीच आणि तिला उद्देशून म्हटले. नोकरीचा विचार त्याच्या मनात आला नव्हता. त्याला नोकरी करण्याची काय आवश्यकता होती?
''छप्पर मोडायचं नाही तर!'' त्याने हताश स्वरात म्हटले. म्हातारी पुन्हा जोरात ''नाही'' म्हणाली. तो ''मी घरात राहणार नाही'' असे म्हणाला. म्हातारीने त्याला छपरातच राहावयास सुचवले. ''तू घरात येऊसुद्धा नको. मी तुझे सगळे तिथेच आणून देईन. तू घरात पाऊलसुद्धा ठेवू नको.'' अखेर अशी तडजोड करून तो बाहेर पडला. छपरातच त्याने आपला वेगळा संसार थाटला.

काही दिवस गेल्यावर एकदा सकाळीच त्याला किंचित ताप आला. खोकल्याचीही थोडीशी उबळ आली आणि त्याचे सगळे शरीर हादरून निघाले. थोड्या वेळात खोकला थांबला आणि अगतिकपणे त्याने आईला हाका मारल्या. म्हातारी धावत आली.
''काय झालं? आँ? ओरडलास का?''
काही न बोलता तो नुसता ओक्साबोक्सी रडू लागला.
तिने त्याच्या कपाळावर हात ठेवला. त्याला काही वेळ न्याहाळले आणि मग ती म्हणाली, ''तुला पडसं झालं आहे, थंडी. समजलं? दुसरं काही नाही. उगाच वेड्यासारखं करू नको.''
पण त्याच्या मनातली भीती गेली नाही. त्याने आईला मिठी मारली आणि तो पुन्हा जोरजोराने रडू लागला. म्हातारीने अखेर शेजारच्या माणसाला डॉक्टरला आणण्यास पाठवले.
डॉक्टरनेही तेच सांगितले, ''तुम्हाला काहीही झालेलं नाही. उगाच तुम्ही मनाला संशय घेतला आहे. हे औषध घ्या. आणि बरे झालात की बाहेर वावरत जा. शेतीवाडी आहे ना तुमची? तिच्यावर जात चला.''
त्याने औषध घ्यायला सुरुवात केली. पडल्या पडल्या छप्पर मोडण्याचे विचार, पुन्हा त्याच्या डोक्यात आले, ''हे छप्पर मोडलं पाहिजे. छप्पर मोडलं पाहिजे...''

आईने प्रथम त्याच्या बडबडीकडे लक्ष दिले नाही; पण तो वारंवार हे बडबडू लागल्यावर ती म्हणाली, ''पुन्हा तेच! तुला सांगितलं ना काय ते एकदा?'' मग त्याला तिने सांगितलेल्या कथेची आठवण आली. त्याचे बडबडणे बंद झाले. चार-पाच दिवसांत तो बरा झाला. हिंडू-फिरू लागला. त्याचे मन किंचित शांत झाले. डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणे तो मग आपल्या शेतावर जाऊ लागला.

ते दिवस गवतकापणीचे होते. सकाळी आठाला तो घराबाहेर पडे तो रात्रीचा घरात (म्हणजे छपरात) परत येई. सकाळच्या चकाकत्या उन्हात उभे राहायला त्याला फार बरे वाटे. पण दुपारचे ऊन पडले की त्याच. जीव कासाविस होई. मजुरीवरची माणसे या उन्हात कशी काम करतात याचे मनाशी आश्चर्य करीत एखाद्या वृक्षाच्या सावलीत तो उभा राही. त्यांच्या धिप्पाड शरीरांची आपल्या किरकोळ देहाशी मनातल्या मनात तो तुलना करू लागे. परंतु फार दिवस शेतावर जाणेही त्याला जमेना. त्याला त्या माणसांबरोबर वावरण्याचा, बोलण्याचा कंटाळा येऊ लागला. काही दिवस त्याने असेच रेटले. आणि मग एक दिवस शेतावर न जाण्याचे त्याने ठरवले. त्याच्या मनातले संशयाचे आणि भीतीचे विचार मात्र नाहीसे झाले.

त्या दिवशी सकाळी तो घरीच राहिला; आणि पुष्कळ दिवसांनी छपराचे आणि काळोखाचे विचार मात्र त्याच्या डोक्यात आले. 'काय हा काळोख घरात? धड चालायलासुद्धा जमत नाही!' तो स्वत:शीच बडबडला आणि नाइलाजाने त्याच छपरातल्या आपल्या जागेवर बसला.

असे महिने दोन महिने तो बापासारखा छपरात बसून राहिला आणि एक दिवस सकाळीच त्याला रक्ताची एक जबरदस्त उलटी झाली...

# कफनचोर

सायंकाळच्या वेळी तीसचाळीस लोकांनी जनाजा कबरस्तानात आणला; आणि मरतिकाचे दफन करून ते निघून गेले. जराशा वेळाने अंधार पडला. काही कोल्ह्यांनी कोल्हेकुई करीत कबरस्तानातून खाली तळात उड्या घेतल्या. एक तरस धीमे धीमे आपली फरा ओढीत त्या कबरेपाशी आला आणि कबर खणण्याचा यत्न करून पुढे सटकला. मावळतीच्या चंद्राच्या क्षीण चांदण्याने सारे कबरस्तान धूसरपणे उजळून निघाले. झाडांच्या सावल्या चमत्कारिकपणे पसरल्या. बांधून काढलेल्या कबरी शुभ्र पुतळ्यांप्रमाणे उठून दिसू लागल्या.

डोंगराच्या बाजूने कुंपणावरून उडी मारून तेवढ्यात रसूलने कबरस्तानात प्रवेश केला. असंख्य कबरींतून आणि मांडीमांडी वाढलेल्या गवतातून न अडखळता चालत तो अचूक मघाशी काढलेल्या कबरीपाशी आला. धूसर चांदण्यात त्याने मघाशीच काढलेली कबर निरखून पाहिली. कबरीच्या शेजारीच बोरीचे झाड होते आणि कबरीवर लावलेली सबज्याची झाडे सुकून एका कडेला झुकली होती. पलीकडच्या कुंपणाआडून सायंकाळी या खुणा त्याने पाहून ठेवल्या होत्या.

हातातले फावडे आणि टोपली त्याने खाली ठेवली. लुंगी उलटी वर उचलून घट्ट बांधली. मग त्याने सावधगिरीने आजूबाजूला पाहिले. गाडल्या गेलेल्या माणसांखेरीज आता तिथे चिटपाखरूदेखील नव्हते.

खाली वाकून कबरीच्या उंचवट्यावर ठेवलेले मोठाले धोंडे त्याने आधी बाजूला गवतावर लोटून दिले. सबज्याची लावलेली रोपे उपटून बाजूला फेकली. मग फावडे हातात घेऊन क्षणभर तो निश्चल उभा राहिला. पुन्हा त्याने आजूबाजूस पाहिले आणि मग भराभर तो फावड्याने कबरेवरची माती बाजूला ढकलू लागला. त्याबरोबर फावड्याचा खसखस आवाज त्या विचित्र शांततेत येऊ लागला.

जमीन अगदी भुसभुशीत होती. भुसभुशीत वाळूची बनलेली होती. ह्या जागेत गावच्या अगदी एका टोकाला कबरस्तान याचसाठी बांधण्यात आलेले होते. या भुसभुशीत वाळूत पुरलेल्या माणसाची, वाळू लागून चार दिवसांत माती होऊन जात होती. यामुळे कोल्हे, तरस यांच्या भयाने कबर फारवर खोल खणण्याची जरुरी लागत नव्हती.

नेहमीच्या सरावाने रसूलने कबरेचा उंचवटा साफ केला. खाली वाकून त्याने कबरेची जागा बरोबर चाचपून पाहिली आणि पुन्हा तो भराभर फावड्याने माती उपसू लागला.

चौफेर पसरलेले ते कबरस्तान शांत होते. मेलेली माणसे शांतपणे तिथे पडली होती; कायमची झोपी गेली होती. पुष्कळांची कधीच माती होऊन गेली होती. काहींचे सांगाडे शिल्लक उरले होते. त्यांच्यावर सबज्यांचे रान माजले होते. त्यांची क्षीण सावट साऱ्या कबरस्तानात ठिकठिकाणी पसरली होती. क्षीणशा चांदण्याने त्या भयाण वातावरणाला अधिक भयाणता आली होती.

रसूलचे तिकडे लक्ष नव्हते. तो भराभर माती बाहेर उपसत होता; माती गवतावर पडल्याचा खसखस आवाज ऐकत होता. पण खणता खणता तो एकदम दचकला. खणायचे बंद करून तो कान देऊन ऐकू लागला. जवळच कुणाच्या तरी पायांचा आवाज त्याला ऐकू येऊ लागला. कोणी तरी चालल्यासारखा गवताचा खसखस आवाज जवळ जवळ येऊ लागला.

चंद्र आता पश्चिम क्षितिजाजवळ गेला होता. केवळ अस्पष्टशा धूसरतेने अंधाराला फिकटता आलेली होती. भांबावून त्याने चौफेर नजर टाकली. दृष्टीच्या टप्प्यात मावेल तेवढा कबरस्तानाचा भाग घाईघाईने त्याने नजरेखाली घातला आणि त्याला अगदी जवळच कोणी तरी उभे असल्याचे दिसले.

कसलीच हालचाल न करता तो काही क्षण पुतळ्यासारखा ताठ उभा राहिला. हातातले फावडे त्याने घट्ट धरून ठेवले. वेळ आलीच तर समोर दिसणाऱ्या माणसाच्या कपाळात ते हाणण्याची त्याने तयारी केली.

समोर कोणी तरी उभे दिसत असूनही आपल्या मागावर कोणी येईल, असे त्याला वाटेना. गेल्या वर्षीच काही लोकांनी असला उपद्व्याप करून पाहिला होता.

...नेहमीप्रमाणे दिवसा काढलेल्या कबरीची जागा गुप्तपणे हेरून रात्री तो कबरस्तानात आला आणि भराभर त्याने कबर खणली. माती उपसल्यावर त्याने लाकडाचे ठेवलेले ओंडके वर टाकले आणि प्रेताचे कफन फर्रकन ओढले. इतक्यात त्याला चाहूल लागली. पाच-दहा लोक लाठ्याकाठ्या आणि कंदील घेऊन कबरस्तानात आले. ते अगदी जवळ येईपर्यंत रसूलला काही जाणवले नाही. त्यामुळे तिथून पळायला संधी मिळाली नाही. पण तो भ्याला नाही. कबरेच्या खड्ड्यात तो काही वेळ लपून राहिला. गारगार मुडद्यावर पाय देऊन तो उभा राहिला. ते लोक जवळ येऊन कबरेत डोकावू लागले. रसूलने कफन डोक्यापासून पायापर्यंत पांघरले आणि दणकन उडी मारून तो बाहेर पडला. कफनात लपेटलेली ती आकृती पाहताच सगळ्यांची एकजात बोबडी वळली. त्यांना घाम फुटला, शुद्ध हरपण्याची वेळ आली. बोंबलत ते गावाकडे पळत सुटले. रसूलने मग सावकाश कबरेवर माती लोटली आणि तो निघून गेला. दुसऱ्या दिवशी गावात कोण गोंधळ उडाला. गावच्या एका बाजूला असलेल्या या कबरस्तानात जाऊन खऱ्या-खोट्याची शहानिशा करायलाही कोणी धजावले नाही. त्यातल्या एकाला ताप आला आणि सातआठ दिवसांत तो उलटला!

समोरची आकृती बाजूला सरकल्याचे बघून रसूल भानावर आला. त्याने डोळे फाडफाडून पाहण्याचा प्रयत्न केला. गवत खसखसू लागले आणि पाय ओढीत ती आकृती बाजूस सरकू लागली. तरस–तो तरस होता? रसूलचा किती तरी वेळ त्याने निष्कारण मध्ये फुकट घालविला होता?

फावडे खाली ठेवून त्याने एक लहानसा दगड उचलला आणि तो तरसाच्या दिशेने भिरकावला. दगड वर्मी लागून तरस केकाटत आणि फरा ओढीत कुंपणापलीकडे होऊन डोंगरावर गेला.

निश्चिंत मनाने रसूल पुन्हा कबर खणण्याच्या उद्योगाला लागला. आता तो भराभर माती फावड्याने वर फेकू लागला. माती गवतावर पडून तिचा पुन्हा पहिल्यासारखा खसखस आवाज होऊ लागला.

ढोपरभर कबर आता खणून झाली होती. माती कशी भुसभुशीत आणि कोरडी होती. आणि दफन देताना माती पोकळही राहिली होती. तुडवण्याची लोकांनी फारशी दक्षता घेतलेली दिसत नव्हती. रसूलला त्यामुळे फारसे श्रम पडले नाहीत.

परंतु कधी त्याला फार श्रम करावे लागत. त्याची दमछाक होऊन जाई. कबर कधी तुडवलेली तरी असायची किंवा मातीच चिकचिकीत असायची. पावसाळ्यात तर फारच त्रास. सगळी ओली माती आणि नुसता चिखल. मिट्ट काळोख. रातकिड्यांची किरकीर सुरू झाली की त्याला नुसते भयाण वाटू लागायचे. कबरस्तानातल्या त्या काळोख्या रात्रीच्या भयाणतेने त्याच्या फत्तर दिलाला कचरवले होते. एकदा मागे फिरवले होते. कधी कधी तो खणायला लागायचा आणि पावसाची झोड सुरू व्हायची. अर्धवट खणलेल्या कबरीत ढोपर ढोपर पाणी साचायचे आणि त्याचे सगळे श्रम वाया जायचे. तशीच माती लोटून त्याला परतावे लागायचे.

मांडीभर कबर खणून झाली तेव्हा रसूल खणायचा थांबला आणि कबरीच्या कडेवर पाय खाली सोडून बसला. रात्रीच्या गारठ्यातही त्याला श्रमाने घाम सुटला. कपाळावरचा घाम त्याने हाताने पुसून काढला. सावधगिरीने त्याने आजूबाजूला पाहिले. मग वरती चमचमणाऱ्या चांदण्यांकडे पाहिले. वातावरणातल्या गारठ्याची आणि दाटणाऱ्या धुक्याची त्याला जाणीव झाली. कबर खणायचे काम आता संपले होते. अजून पुष्कळ रात्र शिल्लक होती. नुकतीच कुठे मध्यरात्र उलटून गेली होती. लगतच्या रस्त्यावरील बैलगाड्यांची तुरळक वाहतूक आता सुरू झाली होती. त्यांच्या लयबद्ध खडखडाटाने त्या भयाण वातावरणाला थोडी हुशारी आली होती. दोन्ही हात मागे टाकून तो रेलून बसला आणि समोरच्या डोंगराकडे लांबवर बघत राहिला.

...तसाच तो बसलेला असताना कधीतरी उजाडून गेले. कफनाचे मातीत बरबटलेले कापड त्याने घरी धुऊन साफ केले. संध्याकाळ झाल्यावर तो ते कापड मारवाड्याकडे घेऊन गेला. मारवाड्याने गुपचूप कापड घेतले आणि त्याच्या हातावर पंचवीस रुपये ठेवले.

''इतकेच सेठ?' असहाय्यपणे रसूलने विचारले, ''एवढ्या मेहनतीचे फक्त पंचवीसच

रुपये?''

मारवाड्याने दहाची एक नोट पुढे केली. नाइलाजाने ते पैसे खिशात टाकून तो तिथून निघाला. अनेक कटकटी त्याला मिटवायच्या होत्या...

गारवा अंगाला झोंबू लागला तसा तो पुन्हा भानावर आला आणि सावरून बसला. मग त्याने कबरेत उडी घेतली. खाली वाकून त्याने दुल्हादीचे लाकडाचे ओंडके चाचपले. मग एकेक ओंडका त्याने सावकाश वर फेकला. सगळे ओंडके उचलताच कफनाचे सफेत वस्त्र त्या काळोखात त्याच्या दृष्टीस पडले.

प्रेताशेजारी बसून रसूलने कफन सोडायला सुरुवात केली. प्रेताच्या मस्तकाजवळची दोरी बाजूला केली. मग खाली सरकून मधली आणि खालची हटवली. याचप्रमाणे त्याने गुंडाळलेले कफन अलगद दोन्ही बाजूंनी कडेला केले. एक मृत देह त्याला दिसू लागला. पायांपासून डोक्यापर्यंत त्याने आपली लुकलुकती नजर त्यावर फिरवली आणि डोक्यापाशी स्थिर केली. तो जवळ, डोक्याजवळ सरकला. कलते करून ठेवलेल्या तोंडावरून त्याने सहज हात फिरवला. प्रेताच्या तोंडावरून त्याचा हात फिरू लागला आणि कपाळावरून फिरत केसांवर गेला. त्याने हाताने केस चाचपून पाहिले. लांबसडक केस! स्त्रीचे केस! कोणा तरी स्त्रीचे ते प्रेत होते. कोण होती ही? कोणी कुंवार मुलगी? की एखादी जख्खड म्हातारी?

धडपडत उठून तो कबरीच्या बाहेर आला आणि आणलेली मेणबत्ती आणि काड्याची पेटी त्याने घेतली. मग आत उतरून त्याने मेणबत्ती पेटवली आणि ती दुल्हादीच्या कडेवर ठेवली.

मेणबत्तीच्या प्रकाशाने कबरीचा खड्डा उजळून निघाला. मातीची ढेकळे आणि पुंजके यांच्या मधोमध उताणा निजलेला स्त्रीदेह रसूल पाहू लागला. त्याच्या दिशेला कललेल्या तिच्या मुखाकडे त्याने टक लावली.

सुमारे चौदा-पंधरा वर्षांची ती कोणी तरी एक मुलगी होती. ताज्या फुलासारखी ती टवटवीत होती. तिचे अवयव नुकतेच भरू लागलेले होते. मृत्यूचे चिन्ह तिच्या मुखावर दिसत नव्हते. जणू ती नुकतीच झोपली होती. झोपेतच जणू तिचे केस विस्कटले होते. तिचे डोळे किंचित उघडे राहिले होते. किलकिल्या डोळ्यांनी झोपेतच ती जणू रसूलला पाहत होती.

तिच्या देहावरची वस्त्रे क्षणार्धात दूर करून रसूल तिचे अवयव नि अवयव निरखून पाहू लागला. तिचे गोरे गोरे तोंड आणि किलकिले डोळे, नाकाचा सरळ शेंडा आणि बारीक गळा, नुकतीच भरू लागलेली तिची छाती आणि मांसल पोटऱ्या! पायांची ताठ बोटे–एका कोवळ्या मुलीचा नग्न देह!

त्याच्या साऱ्या शरीरातून एक शिणीक निघून गेली. कफन उचलायची त्याने घाई केली नाही. काही वेळ तो त्या स्त्रीदेहाकडे बघत राहिला, नुसता बघत राहिला. मग हलकेच आपल्या उजव्या हाताने त्याने तिच्या नाकाच्या शेंड्याला स्पर्श केला. तिच्या गार नाकाचा त्याच्या हाताला स्पर्श झाला. तिची कानशिले त्याने चाचपली. हात हलवून पाहिले आणि

केसांवरून हळुवारपणे हात फिरवला. इतक्या हळुवारपणे की, ती झोपेतून जागी होईल याचे जणू त्याला भय वाटत होते. तिचे तोंड दोन्ही हातांनी त्याने कुरवाळले. तिच्या मस्तकावर तो हळू हळू थोपटू लागला. ते अलगद हलू लागले. जणू काय लाजून ती 'नको-नको' म्हणू लागली. त्याच्याकडे कललेले तिचे डोके त्याने जोरात सरळ केले. परंतु त्याचा हात सुटताच ते गटकन पुन्हा त्याच्या दिशेला कलले.

त्याच्या साऱ्या अवयवांतून पुन्हा दुसरी शिणीक धावली. काय होते आहे हे त्याला समजेना. कफन घेऊन खड्ड्यावर माती ढकलावी, असे त्याच्या मनात आले. पण तिथून उठायला त्याचे मन राजी होईना. त्याचे हात नेहमीप्रमाणे कफनाकडे न धावता तिच्या गोऱ्या मुखावर फिरू लागले, तिच्या पापण्यांवरून सरकू लागले, तिच्या लांबसडक केसांशी चाळा करू लागले. तो हळूच तिच्या बाजूला सरकून बसला. तिच्या अगदी निकट बसला. तिच्या गारगार शरीराला त्याचे उष्ण शरीर भिडले.

परंतु तेवढ्यात वाऱ्याचा कसा काय एक झोत आला आणि मेणबत्ती विझून गेली. खड्ड्यात गडद अंधार पसरला. त्याच्या डोळ्यांसमोर एकदम अंधारी आली. त्याला काहीच दिसेना. शेजारच्या गार स्पर्शाने त्याची संवेदना तेवढी जागृत राहिली होती. त्या स्पर्शाची त्याला एकदम शिसारी आली. चटकन तो बाजूला सरकला. त्याने डोळे गच्च मिटले आणि पुन्हा उघडले. हळूहळू काळोखी मोडली. त्याला किंचित दिसू लागले. तो भांबावल्यासारखा समोर पाहू लागला.

अवघडल्यासारखे बसून बसून त्याचे हातपाय जड झाले. सगळे अंग भरून आले. गारवा अधिकाधिक अंगाला झोंबू लागला. काय करावे? उठावे? जायला निघावे?...कफन? कफनाचे काय? पण मग...

अवघडलेला पाय त्याने सहज लांब केला आणि नेमका तो तिला लागला. तोच स्पर्श! विचित्र स्पर्श! त्याने पाय काढला नाही, बाजूला घेतला नाही. अभावितपणे तो पुन्हा जवळ सरकला. सरकत सरकत जवळ गेला. तिला खेटून बसला. अगदी खेटून!

गार अंग! बर्फाचा स्पर्श...नाकाचा शेंडा आणि लांबसडक केस...निमुळती बोटे...ताठ बोटे...गोठलेले रक्त...कलते तोंड...हसरे तोंड...किलकिले डोळे...अर्धवट उघडे डोळे...तो चमत्कारिकपणे शहारला.

पुढे जावे? अजून? हात...हा काय हात! आणि ही बोटे? बोटांत बोटे गुंफली गेली. कुठे? तिची बोटे तर ताठ आहेत. थंड पडली आहेत. डोके हलते आहे...कलंडले आहे. नाही...काही नाही...थंडगार...नको नको! आणखी पुढे नको...

किळसवाण्या भीतीच्या एका लाटेने त्याच्या मनाला मागे फेकले. त्याचे डोके बधिर झाले. संवेदना लुप्त होऊ लागल्या. सगळे शरीर जड झाले. तो तसाच बसला–बसून राहिला...

पहाट होऊ लागली. झुंजुमुंजू झाले. रस्त्यावरून जाणाऱ्या बैलगाड्यांचा खडखडाट बंद झाला. पाखरांची किलबिल सुरू झाली. धुके फार दाटले. गारवा सगळ्या वातावरणात

भरून राहिला.

त्याबरोबर रसूल भानावर आला. पहाट झाल्याचे लक्षात येताच तो दचकला. शेजारच्या स्पर्शाची जाणीव होऊन तो बाजूला सरकला. दूर झाला. धडपडत उठून उभा राहिला. दिवसाची चाहूल लागताच त्याला मारवाड्याची आठवण आली. नव्या दिवसाच्या बोजाखाली त्याचे मन भारून गेले.

घाबऱ्याघाबऱ्या त्याने सभोवताली पाहिले. कोणीही दिसत नव्हते. मग त्याने चमत्कारिकपणे तिच्याकडे नजर टाकली आणि खाली वाकून घाईघाईने तो कफन ओढू लागला.

# कळ

तिच्यासंबंधी अनेक अफवा मी रोज ऐकत होतो. तिचा बाप दरिद्री होता आणि ती मात्र थाटात राहत होती. त्याला नेसायला अंगभर वस्त्रदेखील नव्हते आणि ती मात्र रोज नवी पातळे नेसत होती. तिच्या घरची माणसे फार सच्छील होती आणि ती मात्र रोज कुणा ना कुणाबरोबर शहरभर भटकत होती. तिचा एकदा गर्भपात झाल्याचाही उल्लेख अधूनमधून होत होता.

मी तिला रोजच पाहत होतो. संध्याकाळच्या वेळी मी राहत असलेल्या खोलीच्या कठड्याशी उभा राहिलो की, ती रस्त्याने जाताना मला दिसत असे. रस्त्यावरील लोकांच्या नजरा तिच्याकडे वळत असत.

काही दिवस मी माझ्या चित्रकाराच्या व्यवसायाला साजेशी स्वतंत्र खोली शोधीत होतो. तिच्या बापाची आणि माझी याच दरम्यान ओळख झाली. अडलेला तो गृहस्थ आपल्या दोनचार खोल्यांपैकी एक खोली मला द्यायला तयार झाला. तो तिचा बाप होता हे मला खोली पाहायला गेलो तेव्हा कळले. त्याने दिलेला पत्ता शोधीत मी जेव्हा त्यांच्या घरात गेलो, तेव्हा तो दारात उभा राहून आशाळभूतपणे माझी वाट पाहत होता. आत नेऊन त्याने मला खोली दाखवली. खोली स्वतंत्र होती. तिला बाहेरून वेगळा दरवाजा होता. आत न्हाणीघर होते आणि एका वेगळ्या दरवाजाने ती इतर खोल्यांना जोडली गेली होती. मी खोली पसंत केली आणि दुसऱ्या दिवशी यायचे ठरवून जायला निघालो. म्हातारा मला दरवाजापर्यंत पोहोचवायला आला.

त्यावेळी ती कुठून तरी आली. दरवाजातून मी बाहेर पडत असतानाच एकदम ती समोर आली. तिने भडक वेष केला होता. चेहऱ्यावर खूपशी पावडर थापली होती. गालांना रंग लावला होता आणि ओठही रंगवलेले होते. माझ्याकडे तिने पुरते पाहिलेदेखील नाही. मला डावलून ती आत निघून गेली. ती आत जात असताना बापाने काहीशा शरमलेल्या नजरेने पाहिले आणि मला निरोप दिला.

तिथे राहायला गेल्यानंतर काही दिवस मला तिच्या अस्तित्वाची जाणीवही झाली नाही. सकाळी मी फार लवकर आपल्या उद्योगावर जाई आणि रात्रीचा परभारे जेवून परत येई. मी परतायच्या वेळी ती नेमकी कुठे बाहेर गेलेली असे. दिवसभर उघडा असलेला मधला

दरवाजा बंद करून मी येताच पुन्हा माझ्या उद्योगाला लागे. त्या सबंध कुटुंबाशी माझा प्रत्यक्ष संबंध येत नसे.

परंतु काही गोष्टी टाळणे अशक्य होते. त्यांचे अठराविश्वे दारिद्र्य मधला दरवाजा बंद केल्याने माझ्यापासून लपून राहू शकत नव्हते. माझ्या कसल्या ना कसल्या वस्तूची त्यांना वारंवार गरज लागत असे आणि मी मुकाट्याने त्यांना ती देत असे. मागण्याचे हे काम तो गृहस्थ करीत असे.

पण एक दिवस बापाऐवजी ती मुलगी माझ्याकडे आली. मी तेव्हा नुकताच परतलो होतो आणि आरामखुर्चीत पडलो होतो. ती दरवाजात येऊन उभी राहिली तेव्हा तिच्याकडे माझे लक्ष गेले.

त्यावेळी ती नुकतीच बाहेरून आली असावी. आपला वेष तिने अद्याप बदललेला नव्हता. नेहमीसारखे भडक रंगाचे पातळ ती नेसली होती. पावडर, रंग होतेच. शिवाय त्या दिवशी तिने डोळ्यांत काजळही जास्त घातले होते. माझे लक्ष जाताच हळू आवाजात तिने बापाचा निरोप मला सांगितला. त्याने पाच रुपये मागितले होते. मी मुकाट्याने पैसे तिच्यापुढे केले. ते घेताच एक शब्द न बोलता ती निघून गेली.

आणि नेलेले पैसे परत करायलाही तीच आली. तो रविवार होता. एक चित्र पुरे करण्यात मी दंग झालो होतो. ती सावकाश दार ढकलून आत आली. प्रथम तिच्याकडे मी लक्ष दिले नाही.

''तुमचे पैसे.'' ती पुटपुटली.

''ठेवा तिथे.'' मी टेबलाकडे बोट दाखवले.

परंतु पैसे टेबलावर ठेवून ती तशीच उभी राहिली. मला संकोचल्यासारखे वाटू लागले. चित्र काढायचे थांबून मी तिच्याकडे पाहू लागलो.

ती तेव्हा अगदी साध्या वेषात होती. टवटवीत फुलाप्रमाणं नाजूक आणि प्रसन्न दिसत होती. काही न बोलता तीही माझ्याकडे पाहू लागली. मी म्हणालो, ''बसा ना.'' ती बसली आणि मी पुन्हा चित्र पुरे करू लागलो.

परंतु ती क्षणभरातच तिथून उठली. कडेलाच माझ्या पुष्कळशा चित्रांचा ढिगारा पडला होता. जवळ जाऊन त्यातले एकेक चित्र ती पाहू लागली.

मी माझे चित्र पुरे केले आणि आरामखुर्चीवर बसून तिच्या हालचाली पाहू लागलो.

तिचे माझ्याकडे बरोबर लक्ष असावे. चटकन तिने चित्रे होती तशी ठेवली आणि तीही एका खुर्चीवर बसली.

''तुम्हाला चित्रकलेची आवड दिसते.'' मी विचारले.

''होय. मी जे० जे० स्कूलमध्ये होते. पण पुढं कंटिन्यू करणं जमलं नाही.''

मी काही म्हणालो नाही, तिच्याकडे मी पाहत राहिलो.

''तुम्ही पूर्वी त्या चौकानजीक राहत होता काय?''

''हो. तुम्हाला काय माहीत?''

''मी तुम्हाला त्या चाळीत पाहिलं आहे.''

''मीही तुम्हाला पुष्कळदा तिथूनच पाहिलं आहे.''

''मला तुम्ही ओळखत होतात?''

''हो.''

''मग तसं कधी दाखवलं नाहीत?''

''मला आवडत नाही.''

आम्ही काही वेळ स्तब्ध बसलो. या सगळ्या संभाषणाच्या वेळी ती माझ्याकडे सारखी टक लावून पाहत होती. तिची नजर सतत माझ्यावर खिळून राहिली होती.

खोलीत अंधार पडायला आला होता. उठून मी दिवा लावला. मला जेवायला जायचे होते.

''कुठे निघालात?'' मी जायच्या तयारीला लागल्याचे पाहून तिने विचारले.

''जेवायला.''

''एवढी घाई काय आहे? आता कुठे सात वाजले आहेत.''

मी तसाच खुर्चीवर बसून राहिलो. परंतु काही न बोलता एका मुलीच्या सहवासात बसून राहणे फार बिकट असते. मनाची उगाच उलथापालथ होते. तिची तीच इच्छा होती हे उघड होते. म्हणून मी काहीच बोलू शकलो नाही.

''तुम्ही काहीच बोलत नाही?''

मी नुसता हसलो. मला काहीच बोलायचे नव्हते. मला स्वस्थही बसायचे नव्हते. सरळ उठून जेवायला जावे, असा विचार करून मी उभा राहिलो.

''बसा हो थोडा वेळ.''

मी हसून तिला म्हणालो, ''माझी खाणावळ बंद होईल नवाला.''

'एक वेळ नाही जेवलात तर काय होणार आहे?'

''काही नाही. न जेवल्याने तरी विशेष काय होणार आहे?''

तिची नजर बदलली. चेहरा उजळला. हसून तिने म्हटले, ''आज आमच्याकडे जेवा.''

''नको.''

''का? तुम्हाला हवे तर इथे आणून देते.''

''चालेल.''

थोडा वेळ बसून ती निघून गेली. दिवसभर काम करून मला कंटाळा आला होता. ती जाताच मी खोलीबाहेर पडलो आणि थोड्याच वेळात पुन्हा परतलो.

मी आलो तेव्हा टेबलावर जेवणाचे ताट झाकून ठेवलेले होते. टेबलावरचा दिवाही तिने जळत ठेवला होता. जेवणाचे ताट ठेवून ती गेली का हे मला कळेना. मी जेवून घेतले आणि आरामखुर्चीवर वाचत पडलो. वाचताना माझे मन तिचा विचार करू लागले. ती येईल असे मला वाटू लागले. ती निदान जेवणाचे ताट नेण्याच्या निमित्ताने तरी...

परंतु बराच वेळ झाला तरी ती आली नाही. कंटाळून मी पुस्तक टेबलावर भिरकावले, दिवा घालवला आणि पलंगावर आडवा झालो.

तेवढ्यात तिने दारावर टिचक्या मारल्या. दार उघडेच होते. त्या विचारात मी कडी घालायचे विसरून गेलो होतो. लागलीच ते ढकलले गेले. अंधारात तिची आकृती दारात उभी असलेली मला दिसली.

''तुम्ही झोपलात की काय?'' ती दरवाजातूनच पुटपुटली.

''नाही. नुकताच मी दिवा घालवला.''

ती पुढे आली. येताना तिने दरवाजा हळूच बंद केला. मग टेबलावरचा दिवा लावून ती पलंगावर येऊन बसली.

मी जागचा हललो नाही. उठावेसे मला वाटले नाही. तिच्याकडे मी पाहू लागलो.

तिच्या अर्ध्या चेहऱ्यावर दिव्याचा प्रकाश पडला होता आणि माझ्या चेहऱ्यावर तिची छाया पसरली होती. मला दिवा दिसत नव्हता. तीच दिसत होती. ती फार जवळ बसली होती. तिची नजर माझ्यावर रोखलेली होती आणि चेहरा कासाविस झाला होता.

तिच्या वेणीच्या गोड सुगंधाने मी वेडावून जाऊ लागलो. वेणी कसली होती कुणास ठाऊक? तिने ती नुकतीच केसात घातली होती. मघाशी ती नव्हती–निश्चित नव्हती. हळूहळू मी धुंद होऊ लागलो. तिला जवळ ओढावे असे मला वाटू लागले.

''तुम्ही बाहेरून केव्हा आलात?'' ती कुजबुजली.

''लगेच.''

''नाही. तुम्ही यायला वेळ केलात हं. मी तुमची वाट बघत होते. कितीतरी वेळ इथे बसून राहिले होते.''

वास्तविक ती खोटे बोलत होती. मी फार लवकर परतलो होतो. मी काहीच उत्तर दिले नाही.

हळूहळू तिच्या हातांनी माझ्या केसांशी चाळा करायला सुरुवात केली. ती अधिक जवळ सरकली आणि मग सरळ तिने आपले डोके माझ्या छातीवर टेकले.

''तुम्ही बोलत नाही! काहीच बोलत नाही! कसला विचार करताहात?'' ती कुजबुजली. एखाद्या हिस्टेरिया झालेल्या मुलीप्रमाणे ती मला घट्ट बिलगली.

आणि अखेर मीही तिला जवळ ओढले.

रात्री ती कधी निघून गेली, ते मला समजले नाही. सकाळी मी जागा झालो तेव्हा अंथरुणात मी एकटा होतो.

नेहमीसारखा मी कामावर गेलो. त्या दिवशी कामावरून परत यायला मला रात्रीचे दहा वाजले. पण मी आलो तेव्हा ती माझ्या खोलीत येऊन बसली होती. मला पाहताच तिने हसल्यासारखे केले.

''तू इथे आहेस?''

''हो. मुद्दाम आले.''

मी आश्चर्याने तिच्याकडे पाहिले.

''दिवसभर मी फार मनस्ताप सहन केला. मला सारखी चुटपूट लागून राहिली. रात्री मी विचित्र वागले. तुम्हाला माझा राग तर आला नाही? तिरस्कार तर वाटला नाही?''

''तिरस्कार कशासाठी?'' मी हसून विचारले.

''रात्रीच्या प्रकारानंतर तुम्हांला काही वाटलं नाही? मीच तुमच्याकडे आले. तुमची ओळख करून घेतली. तुमच्याशी बोलत बसले. आणि रात्री...कुणाही पुरुषाला वाटेल की, काय भयंकर मुलगी आहे! आपल्या असहायतेचा गैरफायदा घेत आहे! पण तसं नाही. माझा इलाज चालला नाही. मला तुम्ही आवडलात. मला तुम्ही हवे आहात.''

तिचे म्हणणे ठीक होते. पण माझ्या मनाची प्रतिक्रिया माझी मलाच कळली नव्हती. तिच्या इतक्या उघड बोलण्याने मी थक्क झालो होतो. परंतु माझ्या मनात तिरस्कार निर्माण झाला नाही. तसे असते तर मी तिला केव्हाच खोलीबाहेर घालवले असते. ती समोर बसली होती आणि तिला मी हवा होतो. माझे डोके भणभणू लागले. हातानेच तिला जवळ येण्याची खूण केली.

अशी रोज ती येऊ लागली. रोज मी तिच्या येण्याची अपेक्षा करू लागलो.

''मला तुम्ही आवडता. फार आवडता. माझं तुमच्यावर प्रेम आहे. पण तुम्ही काहीच बोलत नाही. का? तुम्हाला मी आवडत नाही? मी आवडत नाही तुम्हाला?''

''आपण का असं वागतो?''

''कुणास ठाऊक!''

''का मी तुमच्याकडे आले?''

''कुणास ठाऊक!''

''कुणास ठाऊक काय? तुम्हाला चांगलं माहीत आहे.''

''तुम्ही इथं राहायला का आलात?''

''मला जागा हवी होती.''

''मी इथं राहात असल्याचं तुम्हाला माहीत होतं?''

''नाही. मागाहून कळलं.''

''शक्य आहे! माहीत असतं तर तुम्ही कदाचित आलाही नसता. आला असतात?''

''ते मी काय सांगू!''

''मी फार वाईट आहे. तुम्हाला माहीत झालं ना मी कशी वागते ते? मी फार चमत्कारिक वागते. अगदी लूज वागते.''

''माहीत आहे.''

''आणखी काय माहीत आहे?''

''काही नाही.''

''खोटं! तुम्ही कशाला लपविता माझ्यापासून? साऱ्यांना ते माहीत आहे. माझा

एकदा...एकदा...''

''तुम्हाला माझ्याविषयी काहीच वाटत नाही?''

''काही नाही.''

''मग का मला वारंवार बोलावता?''

''तू येऊ नकोस.''

''माझ्यानं राहवणार नाही. तुम्ही ते ओळखलं आहे. मी अगदी वेड्यासारखी वागते. अगतिक होऊन जाते. एकटी असले की मला लोनली वाटू लागतं. मी चुकते का हो?''

''मला हे सगळं सोडून द्यावंसं वाटतं. या स्वैर आयुष्याला तिलांजली द्यावीशी वाटते. मी यातून बाहेर पडेन का हो?''

''मी काय सांगू?''

''का? इतक्या दिवसांत तुम्हाला माझ्याविषयी काहीच मत बनवता आलं नाही? की तुम्हाला खरं सांगायचं नाही?''

''असं हे किती दिवस चालणार? किती दिवस आपण एकमेकांना अशी भेटत राहणार? हे बरं नाही. खरंच, बरं नाही. मला येऊ नयेसं वाटतं. पण...मी काय करू मला कळत नाही!''

''तुमचं माझ्यावर प्रेम नाही?''

''नाही.''

''कशाला मग मला तुम्ही जवळ घेता?''

''तुला अनेक लोक जवळ घेतात.''

''पण तुमच्याबद्दल मला जे वाटतं ते त्यांच्याबद्दल वाटत नाही. मी तुमच्याकडे अधिक आकर्षित झाले आहे.''

''कारण त्यांच्यापेक्षा मी तुझ्या अधिक सहवासात असतो. रात्र रात्र आपण एकमेकांच्या मिठीत पडलेलो असतो.''

''मला लग्न करावंसं वाटतं. कुणाशी तरी संसार करावासा वाटतो. पण माझे चारित्र्य आड येतं. त्यामुळे कुठंच जमत नाही. माझं काय होईल हो? हल्ली मला बाहेर पडायचीसुद्धा शरम वाटते. लोक काय हवं ते बोलत असतात. त्यामुळे मी घरातच राहते. आईबाबांच्या ते लक्षात आलं आहे. परवा बाबा आईशी बोलत होते : 'आपण तिच्याकडे दुर्लक्ष केलं. जाणूनबुजून दुर्लक्ष केलं. आपल्या गरजा भागत होत्या म्हणून काही बोललो नाही-' ''

''त्यांना आपला संशय आला आहे?''

''नाही. मी त्यांना पैसे देत असे. मला अनेकांकडून मिळालेले. ते लाचारीने मागत आणि मी सरळ काढून देई. तुमच्याविषयी त्यांना तसा संशय नाही. आपल्या दारिद्र्याची झळ तुम्हाला लागू नये असे त्यांना वाटते. तुमच्याविषयी त्यांचं मत फार चांगलं आहे.''

एक दिवस तिला यायला फार उशीर झाला. किती तरी वेळ झाला. ती आलीच नाही.

आज ती येत नाही असे मला वाटू लागले. परंतु ते मान्य करायला मी तयार झालो नाही. ती न येणे अशक्य होते. कदाचित तिच्या आईबापांना काही कळले असेल म्हणून ती आली नसावी. पण त्यांची पर्वा करण्याचे मला काही कारण नव्हते.

मी झोपी गेलो नाही. टेबलावरचा दिवा जळत ठेवून मी आरामखुर्चीवर बसून राहिलो. मग काही वेळाने खोलीत येरझारा घालू लागलो.

ती बदलली असणे शक्य आहे. वारंवार तिने माझ्याकडेच कशाला यावे? तिला कोणी दुसरा सापडला असेल...किंवा ती स्वत:वर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करीत असेल. पण ते तिला शक्य होणार नाही, हे मला चांगले माहीत होते.

येरझारा घालताना माझे तोंड दरवाजाच्या दिशेने झाले. आणि मी जागच्या जागी उभा राहिलो. दरवाजा हळूहळू उघडला जात होता. माझे मन काहीसे ताळ्यावर आले. मी पुन्हा आरामखुर्चीवर बसलो.

तिने नेहमीसारखे दार उघडले. परंतु पुढे न येता ती दारातच, दाराच्या चौकटीत दोन्ही हात ठेवून उभी राहिली. ती विलक्षण प्रसन्न दिसत होती. उत्साहाने नुसती फुलून गेली होती. मी पुटपुटलो, ''ये. बस इथे.''

ती घाईने पुढे आली. येताच तिने माझा हात हातात घेतला. तृप्त नजरेने माझ्याकडे पाहू लागली.

''मी आज आनंदात आहे-फार फार आनंदात आहे.''

''म्हणून इतक्या उशिरा आलीस की काय?''

''छे! वास्तविक आज मी लवकर यायचं ठरवलं होतं. केव्हापासून येण्यासाठी धडपडत होते, पण यायलाच मिळालं नाही.''

मी किंचित अस्वस्थ झालो.

''आज मला आईनं खूप उपदेश केला. यापुढं तरी मी व्यवस्थित वागावं अशी तिची अपेक्षा–''

''यापुढं विशेषसं काय होणार आहे?''

''तेच सांगायला आले. माझं लग्न ठरतं आहे!''

बोलायची थांबून ती माझ्याकडे पाहू लागली. तिची नजर माझ्यावर खिळून राहिली. असे टक लावून पाहत राहायची तिला सवय होती. अगदी प्रथम ती माझ्याशी बोलत बसली, तेव्हा याच नजरेने तिने माझा ठाव घेण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी तिच्या लग्नाच्या वार्तेची माझ्यावर कोणती प्रतिक्रिया झाली आहे, हे ती अजमावू लागली.

मला अर्थातच आश्चर्य वाटले. तिचे लग्न होणार नाही असे मी कधी गृहीत धरून चाललो नव्हतो. फक्त ते सहजासहजी होणार नाही, असे मला वाटत होते. मी स्वत:शीच हसलो. परंतु तिच्यापासून ते लपून राहिले नाही.

''का हसलात?''

मी उत्तरलो, ''तुझ्याशी सहजासहजी लग्न करायला निघालेल्या माणसाचे मला हसू येते

आहे.''

''बरोबर आहे! तुम्हाला हसू येणं स्वाभाविक आहे!'' ती शांतपणे म्हणाली. तिचा आवाज भारावून गेला. आवंढा गिळून ती पुढे सांगू लागली, ''मला आधी खरंच वाटत नव्हतं. माझं लग्न होईल असंही हल्ली मला वाटत नसे. माझ्या भावी आयुष्याची कल्पना मला कधीच करता येत नव्हती. मी जणू एका प्रवाहात सापडले होते. वाहत चालले होते आणि आधार शोधीत होते.''

ती आसुसलेल्या नजरेने अद्याप माझ्याकडे पाहत होती. माझा हात अद्याप तिच्या हातात होता. तिच्या बोलण्याने मी विलक्षण अस्वस्थ झालो. तिचे लग्न होणार होते!

''त्याने तुला आधार दिला तर!'' मी विचारले.

''होय.''

''कसा दिला? तू त्याला कसं फशी पाडलंस?'' मी विचारले. तो कसा फसवला जात आहे हे मला जाणवू लागले. या फसवणुकीच्या धंद्यातला मीही एक भागीदार होतो.

''मी फसवले नाही काही! यात फसवण्याचा प्रश्नच आलेला नाही! त्याला सारं माहीत आहे. आपणहून त्याने मला स्वीकारण्याचं कबूल केलं आहे!''

तिच्या हातातला माझा हात एकदम लुळा पडला. ''त्याला सारं माहीत आहे?'' मी एक आवंढा गिळून विचारले.

''होय! सारं माहीत आहे.''

''काय?'' मी चमकून विचारले.

''सारं. मी फार वाईट वागले. माझं चारित्र्य चांगले नाही! माझे अनेकांशी अनेक प्रकारचे संबंध आले आहेत. आणि...आणि माझा एकदा...एकदा...''

''इंपॉसिबल!'' मी उद्गारलो! ''हे शक्य नाही. तू खरं सांगते आहेस?'' माणूस इतका मूर्ख असू शकतो यावर माझा विश्वास बसला नाही.

''खरं! अगदी खरं! मी खोटं सांगेन तुम्हाला? तो आजच आमच्याकडे आला होता. मला तो पहिल्यापासून ओळखतो. मध्ये काही दिवस तो इथे नव्हता. आज आला तेव्हा घरात मी एकटीच होते. आम्ही बोलत बसलो, तेव्हाच–''

''तेव्हा काय झालं?''

''तेव्हा तुमच्याशी नेहमी जे बोलते तेच त्याच्याशी बोलले. मला सगळं असह्य झालं आणि भराभर सारं ओकून टाकलं. 'मी फार वाईट आहे रे! मी फार वाईट वागले! अगदी लूज वागले. त्याचंच प्रायश्चित्त आता भोगते आहे. जन्मभर मला ते भोगावं लागणार आहे.'

स्वस्थपणे तो हे ऐकत होता. बोलता बोलता मला रडू कोसळलं. मी हुंदके देऊ लागले. त्याला काय वाटलं कुणास ठाऊक, संथपणे त्यानं विचारलं, 'तू रडतेस कशाला? मी तुझ्याशी लग्न करतो!'

रडायची थांबून मी त्याच्याकडे पाहू लागले. आश्चर्याने पाहू लागले. माझा त्याच्यावर विश्वास बसला नाही. कसा बसावा? मी विचारलं, 'खरंच? खरंच तू माझ्याशी लग्न

करशील? अशक्य! साफ अशक्य!'

'अशक्य का? मी खरं बोलतोय. माझ्यावर विश्वास ठेव. तुला शंका वाटणं स्वाभाविक आहे. तुला काय वाटतं ते मी समजू शकतो. मला ते सारं माहीत आहे. तरीही तुला स्वीकारण्याची माझी तयारी आहे.'

'पण तुला माहीत आहे? तुला माहीत आहे?' मी अडखळत सांगू लागले.

'माहीत आहे! माहीत आहे!' त्यानं अडवून म्हटलं, 'सगळं माहीत आहे! मी तेही ऐकून चुकलो आहे. तरीही मी तुझ्याशी लग्न करणार आहे. तुझ्या चारित्र्यासकट, तुझ्या दुर्गुणांसकट तुझा स्वीकार करणार आहे. लोकांची पापं झाकावी लागली तरी झाकणार आहे!' ''

तिचे पुढचे बोलणे मी ऐकले नाही. ऐकूच शकलो नाही. ऐकण्याच्या मन:स्थितीत राहिलो नाही. मी तिच्याकडे पाहू लागलो...

'' 'तू फार वाईट वागलीस!' तो म्हणाला, 'अगदी बेजबाबदारपणे वागलीस! तुझ्या आईबापांनी तुझा गैरफायदा घेतला. चार लोकांनी तुझा हवा तसा उपयोग केला. काही माणसं अशीच रास्कल असतात! त्याला काही इलाज नाही. कुणाचाच इलाज नाही!...''

''पुरे कर!'' मी पुटपुटलो.

''संपलेच आहे.'' ती उठून म्हणाली, ''मी जाते आता! आपला संशय कुणाला येणं बरं नाही!..'' तिने खाली वाकून माझे चुंबन घेतले. मग सावकाश ती आतल्या खोलीत गेली. हळूच मधला दरवाजा तिने लावून घेतला.

मी शून्यपणे आरामखुर्चीवर बसून राहिलो. तिचे बोलणे काही वेळ माझ्या डोक्यात घुमत राहिले. माझ्या मनात एक तीव्र कळ उठली. पलंग आणि चादर आपसांत माझ्याबद्दल कुजबुजू लागली. टेबलावरचा दिवा संथपणे जळता जळता मला हसू लागला.

# ओॲसिस

एका लग्नसमारंभासाठी ती मुंबईहून त्या इवल्याशा गावात आली होती. पण त्या गावातील आडदांड माणसे आणि तिथले नागडेउघडे जीवन तिच्या शहरी मनाला घृणास्पद वाटू लागले. त्यांच्यात मिसळून जाणे, कुणाशी मुक्तपणे बोलणे आणि वावरणे तिच्या प्रकृतीला पेलले नाही. तिथला क्षण नि क्षण त्यामुळे तिला जीवघेणा वाटू लागला. तिथे घालवावे लागणारे दोन दिवस तिला युगासारखे भासू लागले. आपल्या खोलीचा दरवाजा बंद करून ती कॉटवर पडून राहू लागली; विमनस्क होऊन गेली. पहिल्या दिवशी संध्याकाळची, अगदीच कंटाळा आला म्हणून ती खोलीबाहेर पडली. त्या ओसाड, भकास ठिकाणी पाहण्यासारखेही काही नव्हते. धुळीने माखलेल्या रस्त्याने त्या दिवशी ती सरळ चालू लागली. अंधार पडेपर्यंत चालत राहिली आणि मग परत फिरली.

दुसऱ्या दिवशी तिने जरा अधिक मजल मारायचे ठरवले. आदल्या दिवसापेक्षा अधिक लवकर, प्रखर उन्हात ती रस्त्याला लागली. माथ्यावर तप्तता झेलीत आणि कडेच्या जळत्या शेतातून निघालेला, वातावरणात दाटून राहिलेला धूर नाकातोंडात घेत ती चालू लागली. रस्त्याने दोन्ही बाजूंनी उघड्याबोडक्या डोंगरांच्या रांगा आणि उजाड शेते मागे पळू लागली. गरम सुसाट वाहणाऱ्या वाऱ्यांनी उडणारा धुरळा तिला लपेटू लागला. रस्त्यावर उभ्या असलेल्या जीर्ण, वठलेल्या वृक्षावरील पिकली पाने भरारा उडत तिच्या अंगावर येऊ लागली. ती चालत राहिली आणि तो धूर, ते डोंगर, ती शेते, तो धुरळा आणि पिकली पाने जणू तिचा पाठलाग करीत राहिली. तिच्या सोबतच चालत राहिली. न बदलणाऱ्या सततच्या त्या दृश्याने पुढे जायची तिला अनावर ओढ निर्माण झाली. ती अधिक भराभर चालू लागली.

असा बराच वेळ चालत राहिल्यानंतर तिचे पाय भरून आले, दुखू लागले. अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. उन्हाने डोके ठणकू लागले. धुराने कोंडमारा होऊ लागला. पण तिची पावले तशीच पुढे पडू लागली.

त्या डोंगरांच्या रांगा आता मागे पडल्या. भकास वाटणारा प्रदेश अदृश्य होऊन हिरवी झाडे आसमंतात डोकावू लागली. रस्त्याची नागमोडी वळणे लयाला गेली आणि तो सरळ धावू लागला. माळरानावर वरवर चढू लागला. धापा टाकीत ती चढण चढून गेली आणि

तिथेच थबकून उभी राहिली.

त्या माळरानाच्या उतरत्या पाठीवर, रस्त्याच्या बाजूला लहान इवल्याइवल्या शेतांचे पाचूसारखे तुकडे कोरले गेले होते. सपाटशा दिसणाऱ्या त्या विस्तीर्ण तुकतुकीत माळरानाच्या पाठीवर मध्येच तिने त्या शेताची हिरवी शाल पांघरलेली होती. माळरानाच्या प्रचंड भालप्रदेशावर तेवढाच एक हिरवा पट्टा ओढला गेला होता.

त्या ओसाड प्रदेशात मध्येच ते हिरवे पाचूचे बेट उगवताच तिचे भान हरखून गेले. विमनस्कता तिच्या मनात खोल बुडून गेली आणि चैतन्याचे तुषार पृष्ठावर उडू लागले. तिच्या वृत्तीवर त्या दृश्यासारखे हिरवे गहिरे रंग चढू लागले. चेटूक झाल्यासारखी ती त्या शेताकडे पाहू लागली, त्याच्याकडे खेचली गेली. रस्ता सोडून माळरानाच्या पायवाटेने ती चालू लागली, त्या शेताच्या जवळ जाऊ लागली.

उन्हाची प्रखरता आता कमी झाली होती. वाऱ्याचा जोर मंदावला होता आणि त्यांना शीतळाई येऊ लागली होती. घाम अंगातच जिरू लागला होता. निळ्या रंगाची झिलई तिथल्या वातावरणात झगमगत होती. धूर उरला नव्हता. धुरळा उडत नव्हता. त्या धरित्रीच्या सान्निध्याने अवघ्या विश्वाचे रंगरूप बदलून गेले होते. त्या शेतात काम करणारी माणसेही वेगळी भासत होती आणि आपल्या कामात पुरती गढून गेली होती.

ती त्यांच्या जवळ जवळ जात चालली आणि तिला ती स्पष्ट दिसू लागली. त्यांचे चेहरेमोहरे, अवयव, आकार तिच्या डोळ्यांसमोर प्रकट झाले. एकरभर पसरलेल्या त्या हिरव्या गालिच्यावर जणू काही पऱ्या आणि देवदूत स्वच्छंदपणे बागडत होती, आपल्याच नादात गर्क होऊन राहिली होती.

ती जवळ जाताच त्यांना तिची चाहूल लागली. कवायत केल्यासारखी ती माना वर करून तिच्याकडे जिज्ञासेने पाहू लागली. तिचे पाय अडखळले. चालता चालता ती मध्येच उभी राहिली.

त्यांची जिज्ञासा क्षणार्धात ओसरत गेली. त्यांच्या माना पुन्हा खाली वळल्या. आपल्या कामात ती पुन्हा मग्न झाली. आपल्या शरीराच्या आकर्षक हालचाली करू लागली. स्वत:चे अस्तित्व विसरून त्यांना पाहत राहावे असे तिला वाटू लागले. ती तशीच उभी राहून त्यांच्याकडे बघू लागली.

पण तिच्या डोळ्यांसमोर लग्नमंडपात पाहिलेला एक चेहरा डोकावला आणि समोरचे दृश्य विस्कटून जाऊ लागले. तिच्या मनावर दाटलेले गहिरे रंग उडून जाऊ लागले. तळाशी बुडी मारून बसलेली विमनस्कता पृष्ठावर आली. धरित्री तिला अवकळा आल्यासारखी पुन्हा ओसाड, उजाड भासू लागली.

पऱ्यांच्या नाचात राक्षसाने मध्येच येऊन त्यांची दाणादाण उडवून द्यावी तसा तो पुरुष चेहरा मध्येच डोकावला. त्याबरोबर कमरेत लवलेली ती माणसे भीतीने बाजूला झाली. वाकलेल्या अवस्थेतच त्याच्याकडे पाहू लागली. त्यांना तो उभ्या उभ्या जोराने काही सांगू लागला. त्याची नजर तिच्याकडे वळली नाही तोवर तिने त्याला पुरते पाहून घेतले.

त्याचा चेहरा सारखा हालत होता. त्याचा जबडा खूप मोठा आणि कपाळ त्या माळरानासारखे केवढे तरी विस्तीर्ण होते. त्याचे सारे शरीरच भव्य, थोराड होते. वाकलेली ती माणसे त्याच्या मानाने कितीतरी लहान, क्षुद्र, खुजी भासत होती. त्याच्या लांब पसरलेल्या सावलीत ती लपेटून गेली होती.

त्याचे लक्ष तिच्याकडे वेधले. तिच्याकडे आश्चर्याने तो पाहू लागला, तेव्हा तिने आपली नजर दुसरीकडे वळवली आणि त्या अफाट भासणाऱ्या माळरानावर स्थिरावली. तो आपल्याला कसा न्याहाळीत असेल हे तिला जाणवू लागले. आपली ओढणी, सलवार, केस, नखे, हात–या साऱ्यांवर त्याची नजर बुभुक्षितपणे फिरत असेल. ती नजर आपला वेष बाजूला सारून त्वचेवर फिरू लागल्याचे आणि त्वचेची तिने चाळण करून टाकल्याचे तिला वाटू लागले. पण त्वचेच्या असंख्य छिद्रांतून तिची नजर त्याच्याकडे डोकावून पाहू लागली. त्याच्या नजरेला नजर देऊ लागली. आपल्या विचारांची तिला इतकी भीती वाटली की, तिने आपली दृष्टी माळरानावरून त्याच्यावर नेऊन स्थिर केली.

त्याच्या नजरेतले आश्चर्य ओसंडून गेल्याचे तिला दिसून आले. आपला जबडा खुशाल उघडा ठेवून तो आता हसत होता. तिने आपल्याकडे पाहण्याची संधी शोधण्यासाठी तो तिच्यावर नजर रोखूनच उभा राहिला होता. तिची दृष्टी वळताच त्याने आपला हात हवेत उंच उडवला आणि तिच्या रोखाने तो चालू लागला.

तिच्या मनातली भीती उडून गेली. त्याचे आपल्यासमोरचे अस्तित्व तेवढे तिला जाणवत राहिले.

क्षणार्धात तो तिच्यासमोर येऊन उभा राहिला. त्याच्या केसाळ छातीवरून ओघळणारा घाम तिच्या डोळ्यांसमोर उन्हात चकाकू लागला. तो इतक्या जवळ येऊन उभा राहिला की, त्याची केसाळ छाती तेवढी तिला दिसत राहिली.

''मिस जबीन! या, या ना!'' तो तोंड उघडे ठेवून हसत म्हणाला.

''थँक्स!'' ती सफाईदार इंग्रजीत उत्तरली. तो पाठमोरा होऊन चालू लागताच मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणे ती त्याच्यामागून चालू लागली. त्याची लांबच लांब सावली तिला लपेटून घेऊ लागली. त्याच्या शेतात काम करणाऱ्या त्या माणसांच्या नजरा विस्मयाने तिच्यावर फिरल्या. अस्मानातली कोणी परी अलगद या धरित्रीवर उतरल्याचा भास त्यांच्या नजरेत प्रकटला.

तिला त्याने एका शेतात चार खांबांवर उंच उभ्या केलेल्या खोपटात नेऊन बसवले. त्याच्या पाठोपाठ शिडी चढून ती त्या गवताने शाकारलेल्या खोपटात शिरली. आत बसताच खालचे गवत तिला टोचू लागले आणि त्याच्या नजरेच्या तरवारीची धार तिला पाहवेनाशी झाली. त्याच्याकडे पाहण्याचे टाळून ती बाहेर पाहू लागली. काम करीत असलेल्या शेतातल्या माणसांच्या लयबद्ध हालचाली निरखू लागली.

''यह है मेरी जन्नत!'' तो उद्गारला. ''ह्या जमिनीचा एकरभर तुकडा हेच माझे सर्वस्व! मी दिवसरात्र इथेच राहतो. इथेच खातो आणि इथेच पडून राहतो. कष्ट इथे करतो आणि त्याचे सुखही इथेच भोगतो! धिस इज माय हेवन!''

त्याच्या जड आवाजाने तिच्या मनावर फार विलक्षण जादू केली. तिचे मन भारल्यासारखे झाले. तिने आपली दृष्टी त्याच्यावर रोखली आणि हसून ती मोकळ्या सुरात ओरडली, ''इट इज अॅन ओअॅसिस...ओअॅसिस इन द डेझर्ट!''

''होय. जन्नत म्हणजे तरी काय, ओअॅसिसच!''

पण जन्नत आणि ओअॅसिस तिला एकच वाटली नाहीत. त्यातला फरक तिच्या मनात स्पष्टपणे उभा राहिला.

''असे कसे? जन्नत ओअॅसिस कसे असेल?'' तिने विचारले.

''नसायला काय झाले? कुराणातले ओअॅसिस जन्नतसारखेच आहे.''

तिने अनेकदा कुराण वाचले होते. पण त्यातले जन्नतचे वर्णन तिला काही ओअॅसिसप्रमाणे वाटले नव्हते. पण आता ती ते आठवण्याचा प्रयत्न करू लागली तेव्हा तिला ते नीट आठवेनासे झाले.

तिच्यासमोर स्वर्ग प्रगट होऊ लागला; जन्नत उभी राहू लागली. नितळ पाण्याचा एक झरा, हिरवे गवत, खजुराचे झाड आणि झऱ्याच्या काठावर बसलेल्या पऱ्या. तिचे अंग परीसारखे हलके होऊ लागले. तिला पंख फुटू लागले.

मग हा कोण? हा दणकट अडाण्यासारखा दिसणारा, पण शहरी रीतिरिवाजाला सरावलेला माणूस कोण? त्याचे आणि आपले नाते काय? या जन्नतीतला देवदूत? जिब्रईल? काही क्षणापूर्वीच आपल्याला तो राक्षसासारखा भासला याचा तिला विसर पडून गेला. तिला तो आता देवदूतच वाटू लागला.

''या जळत्या उन्हात इकडे कशा काय आलात?'' त्याने विचारले.

तिचे पंख हवेत पसरले गेले. भराऱ्या मारीत तिच्या तोंडून शब्द ओघळू लागले. ''खोलीत बसून बसून कंटाळा आला. आज एकटीच रस्त्याने चालू लागले. चालत चालत इथवर आले.''

''अच्छा. किती दिवस राहणार आहात इथे?''

''दिवस कसले? आज संध्याकाळपर्यंतच! मी उद्या जाणार आहे!''

त्याने पूर्वीसारखे ''अच्छा'' म्हटले. जणू ती राहिली आणि गेली याचे त्याला कसलेच सोयरसुतक नव्हते. त्याचे 'अच्छा' कानावर आदळताच तिचे पंख मिटू लागले. भिरक्या घेत ती पुन्हा जमिनीवर उतरू लागली.

बोलता बोलता त्यांची नजर शेतात दूरवर फिरू लागली. एका शेतातल्या शेत नांगरणाऱ्या माणसाच्या आकृतीवर जाऊन स्थिर झाली. त्याचे नांगरणे त्याला चुकीचे वाटू लागले, काही तरी त्याला खटकू लागले. तो तिच्याकडे वळून दिलगिरीच्या सुरात म्हणाला, ''माफ करा हं. तुम्ही थोडा वेळ बसून राहा. मी आत्ता येतो.''

तिच्या मान हलवण्याकडे न पाहता तो भराभर शिडी उतरून खाली गेला. त्या माणसाच्या हातातून त्याने नांगर आपल्या हातात घेतला आणि तो स्वत: चालवू लागला.

तिची नजर त्याच्या शेत नांगरणाऱ्या आकृतीवर जाऊन झेपावली. त्याच्या दणकट भव्य

आकृतीच्या हालचालींवर ती मोहित झाली. आपले दोन्ही हात त्याने नांगरावर असे जोराने दाबून धरले की, नांगराच्या दोन्ही बैलांची शक्ती त्याच्यापुढे लुळी पडली. ते चालता चालता धडपडले. नांगराचा फाळ खोलवर ज़मिनीत रुतून बसला. बैलांनी आपल्या सर्व सामर्थ्यानिशी जेव्हा नांगर पुढे ओढला तेव्हा मातीची प्रचंड ढेकळे जमिनीतून वर येऊन पडू लागली. त्याच्या अंगावर, चेहऱ्यावर त्यांची धूळ उडू लागली.

त्याच्या बळकट दबलेल्या खांद्यांकडे ती बघत राहिली. त्याच्या प्रचंड शक्तीच्या आविष्काराने विद्ध होऊन गेली. त्या सामर्थ्याने आपले जीवन व्यापून टाकले आहे असे तिला वाटले. आजवर जगलेले, भोगलेले जीवन कळाहीन वाटू लागले. आपले पंख पसरून ती त्याच्याकडे झेपावू लागली.

पण तो दूर होता. फार दूर होता. त्याच्याजवळ जावे, फार जवळ जावे, असे तिला वाटू लागले. त्याक्षणी त्याच्या सान्निध्याचा तिच्या मनाने ध्यास घेतला. ती त्या खोपटात उभी राहिली आणि आपले सारे सामर्थ्य एकवटून ओरडली, ''स्प्लेंडिड! स्प्लेंडिड!''

तिचे वाऱ्याबरोबर थरथरत गेलेले शब्द त्याच्या कानावर आदळले. त्याने तिच्याकडे पाहिले. हसून आपला हात हवेत उडवला आणि पुन्हा तो पाहू लागला–आपल्या नांगर हाकण्याच्या कामात गढून गेला.

पण त्या 'स्प्लेंडिड'वर संतुष्ट राहण्याची आता तिची तयारी नव्हती. ती पुन्हा तितक्या जोराने ओरडली, ''मी येऊ काय? तुम्हाला येऊन मदत करू?''

तिची वाक्ये कानावर पडताच त्याचे खांदे ढिले पडले. त्याच्या चेहऱ्यावर विलक्षण आश्चर्य प्रकटले. नांगर जागच्या जागी थबकून उभा राहिला. ढेकळे उडायची राहिली आणि धुरळा त्याच्या अंगावर येईनासा झाला, शेतातली माणसे हातातले काम थांबवून माना वर करून तिच्याकडे पाहू लागली.

त्याचा चेहरा पुन्हा पूर्ववत दिसू लागला. त्याने हसून नकारार्थी मान हलवली. नांगर पुन्हा चालू केला. त्याचे खांदे पुन्हा दबून गेले. ढेकळे उडू लागली, धुरळ्यात तो माखला जाऊ लागला. त्या माणसांनी माना खाली घालून पुन्हा आपले काम सुरू केले.

ती घामाघूम होऊन मटकन खाली बसली. क्षणभर हरवलेले तिचे अस्तित्व तिला पुन्हा येऊन बिलगले. स्वत:च्या वागण्याने आणि त्याच्या थंड उदासीन प्रतिक्रियेने ती शरमून गेली.

त्याने नांगर त्या माणसाच्या हातात दिला आणि तिच्या दिशेने तो चालत येऊ लागला, तेव्हा तिला भीती, विलक्षण भीती वाटू लागली. त्याने आपल्या अधिक निकट येऊ नये, असे तिला वाटू लागले.

पण तो येऊन खोपटाखालीच उभा राहिला. तिथूनच म्हणाला, ''चला, तुम्हाला घरी पोहोचायला वेळ होईल. आता थोड्याच वेळात अंधार पडेल.''

त्याचा आवाज तिला फार दुरून कुठून तरी ऐकू आल्यासारखा वाटला. तिचे मन भीतीमुक्त झाले. झपाझप ती शिडी उतरली आणि त्याच्याबरोबर, त्याच्या मागोमाग, माळरानावरल्या पायवाटेकडे जाऊ लागली.

मूकपणे चालत दोघे पायवाटेला येऊन भिडली, तेव्हा तो चालायचा थांबला. आपला जबडा उघडून हसत तिच्याकडे पाहू लागला. ''अच्छा. खुदा हाफिज.''

पश्चिम क्षितिजाला टेकलेल्या सूर्याच्या तांबड्या झगमगत्या गोळ्याकडे पाहत ती थरथरत पुटपुटली, ''खुदा हाफिज.'' आणि चटकन वळून रस्त्याने अडखळल्यासारखी चालू लागली. रस्त्याच्या दिशेने जाऊ लागली. ते चाललेलें अंतर तिला आता फार वाटू लागले; भयंकरपणे जाणवू लागले. चढणीपर्यंतच तिला कितीतरी वेळ लागला.

त्या चढणीवर जाऊन पोहोचताच तिने मागे वळून पाहिले. तो माळरानाचा प्रदेश आता अंधारात वितळून चालला होता. तीही अंधारात लोटली जात होती. त्याच्या प्रचंड सावलीसारखा तिला तो अंधार भासू लागला. त्या सावलीत गुरफटून गेल्यासारखे तिला वाटले. ती स्वत: त्या अंधारात वितळून जाऊ लागली आणि तिची पावले मात्र पुढेच पडू लागली.

# पराभूत

अलीखान कमरुद्दीनखान मुस्तफा या नावाचा आणि मुस्तफाखान या नावाने ओळखला जाणारा एक सव्वीस वर्षांचा हाडकुळा तरुण त्या गावात राहत होता. गावाच्या एका कोपऱ्यात असलेल्या आपल्या घरातले त्याचे अस्तित्व तसे गावात कुणाला जाणवतही नव्हते. त्याचा बाप कमरुद्दीनखान गावातल्या मसूदखान या खोताकडे नांगरकी करीत असे. आपल्या मुलाने खोताच्या मुलांसारखे शिकावे असे त्याला खूप वाटत असे. त्याने मुस्तफाखानला दापोलीच्या अँग्लो उर्दू हायस्कूलमध्ये शिकायला पाठवला होता. पण नांगरकी करीत असताना कमरुद्दीनखानच्या पायात एकदा नांगराचा फाळ घुसला आणि त्याचे सेप्टिक होऊन तो एकाएकी मरण पावला.

मुस्तफाखानच्या शिक्षणाचा ग्रंथ अशा रीतीने आकस्मिकपणे संपुष्टात आला. तेव्हापासून शाळा सोडून तो घरी येऊन राहिला होता.

तो गावात कायमचा राहायला आल्यापासून सहसा बाहेर पडला नाही आणि कुणाकडे गेला नाही. कुणात मिसळला नाही अथवा कोणाशी आपणहून बोलायच्यादेखील फंदात पडला नाही. त्याने काही कामधंदाही केला नाही. आपल्या घरात तो नुसताच बसून राहू लागला. भुतासारखा रात्रंदिवस त्या घरात वावरू लागला.

एकदोनदा जेव्हा कधी मसूदखान मुंबईतल्या आपल्या व्यापारातून चार-आठ दिवसांचा घरी आला तेव्हा मुस्तफाखान त्याच्याकडे गेला आणि त्याने काही पैशांची त्याच्याकडे मागणी केली. त्याचा बाप आपली नांगरकी करण्यात मृत्यू पावला या गोष्टीची फारशी जाणीव मसूदखानाला राहिली नव्हती. परंतु त्याला सारे कायदेकानू माहीत होते आणि मुस्तफाखानला कुणी चेतवला तर आपल्यावर नुकसानभरपाईचा दावा करून तो काही शेकड्यांनी पैसे घेऊ शकेल, अशी त्याला भीती वाटत होती. त्यामुळे त्याने एकदोनदा मुस्तफाखानला थोडे पैसे देऊन वाटेस लावले.

मसूदखान फार हुषार मनुष्य होता. तो खूप श्रीमंतही होता. तो सतत मुंबईला व्यापारी उलाढाली करण्यात मग्न राहिला होता. तथापि त्याच्यामागेदेखील त्याच्या घरची आणि शेतीची कामे यंत्रासारखी बिनबोभाट चालत होती. एवढी त्याची जरब होती.

त्याने अद्यापपर्यंत अनेक बायका केल्या होत्या. वर्षभर संसार करून या ना त्या निमित्ताने

अखेर त्याने प्रत्येकीला घटस्फोट दिला होता; आणि सध्याच्या बायकोला घटस्फोट द्यावयाला तो निघालेला होता.

मुस्तफाखानला हे सारे माहीत होते. मसूदखानला भेटायला जायचा विचारदेखील त्याला आवडत नव्हता. आपल्याकडे तो तुच्छतेने पाहतो, आपल्या नोकराचा मुलगा म्हणून आपल्याला वागवतो हे तर त्याच्या केव्हाच लक्षात येऊन चुकले होते. परंतु त्याचा इलाज चालत नव्हता. तो लाचार बनत होता आणि दर वेळी लाचारीने मान खाली घालून मसूदखानपाशी पैशांची मागणी त्याने केली होती.

पण मसूदखान त्याला सतत असा पैसा देत राहणे अशक्य होते. तिसऱ्या वेळी जेव्हा मुस्तफाखान त्याच्याकडे जाऊन उभा राहिला तेव्हा त्याने तोंड उघडण्यापूर्वीच मसूदखानने त्याच्यावर तोंड सोडले. त्याच्या आईबापांचा उद्धार केला. आणि त्याला गचांडी मारून घालवून दिले.

त्यानंतर पुन्हा म्हणून मुस्तफाखान मसूदखानकडे कधी गेला नाही. अवमानित झाल्याचे त्याला एवढे दु:ख झाले की, घराबाहेर पडायचीदेखील त्याला लाज वाटू लागली. भकास मुद्रेने तो आपल्या घराच्या पडवीत सतत बसून राहू लागला.

अशा रीतीने घरी बसून दु:ख करीत असताना हळूहळू त्याच्या मनात मसूदखानविषयी अढी निर्माण झाली. हळूहळू त्याच्याविषयीचा तिरस्कार त्याच्या मनात दाटू लागला. हळूहळू तो मसूदखानचा द्वेष करू लागला.

आणि अजूनपर्यंत न जाणवलेली मसूदखानची अनेक कृष्णकृत्ये त्याला आठवू लागली. आपल्या बापाच्या हकनाक मृत्यूला तो जबाबदार असल्याची त्याच्या मनाची आता खात्री पटली. त्याने केलेली असंख्य लग्ने त्याला सलू लागली. त्याच्या अवाढव्य कमाईमागे काहीतरी काळेबेरे असले पाहिजे, असे त्याच्या मनाने घेतले.

पण त्याला आपण जाब विचारू शकत नाही, आपल्या बापाच्या मृत्यूबद्दलदेखील त्याला कोर्टात खेचू शकत नाही या विचाराने मुस्तफाखान हतबल झाला. एवढा मोठा अन्याय मुकाट्याने गिळण्याखेरीज आपल्यापुढे काहीच पर्याय नाही याची त्याला जाणीव होऊन चुकली आणि तो आतल्या आत तडफडू लागला. स्वत:च्या क्षुद्रतेची कल्पना येताच तो अधिकच विकल बनला. मसूदखानचा तो अधिकाधिक तिरस्कार करू लागला.

मसूदखान आपल्या बायकोला तलाक देणार असल्याचे गावात अनेक दिवस बोलले जात होते. एक दिवस त्याने खरोखरच बायकोला तलाक दिला. त्याची बायको आपल्या बापाकडे राहावयास गेली. गावात काही दिवस हा विषय चर्चिला गेला आणि मग विसरला गेला. काहीच झाले नाही अशा रीतीने लोक पुन्हा वागू लागले.

पण काही दिवसांनी मसूदखानची दुसरी (खरे म्हणजे नवी) बायको घरात असल्याचे वृत्त पसरले आणि ते खरेही ठरले. मसूदखानने पुन्हा एक लग्न केले.

पण या वेळी साराच मामला वेगळा होता. नेहमीसारखी त्याची बायको गावातली अगर जवळपासची नव्हती. ती मुंबईची होती आणि हे लग्नही परभारे मुंबईतच झाले होते. लग्नाची

दावतदेखील गावात कुणाला दिली गेली नव्हती.

मसूदखानच्या तलाकचे आणि नव्या लग्नाचे वृत्त आपल्या घरात भुतासारख्या वावरणाऱ्या मुस्तफाखानपर्यंत कसे तरी जाऊन पोहोचले तेव्हा त्याच्या अंगाचा भडका उडाला. एखाद्या रुळासारखे अजस्र सामर्थ्य असलेला तो माणूस या जगातले हवे ते विकत घ्यायला निघाला आहे असे त्याला वाटू लागले. हा रूळ थांबविण्याचे सामर्थ्य आपल्यात नाही याची त्याला त्या क्षणी पुन्हा खंत वाटू लागली.

घरातल्या घरात येरझारा घालीत असताना मसूदखानच्या नरडीचा घोट घेण्याचा विचार त्याच्या मनात डोकावला. आपल्या मनात हा विचार यावा याचे त्याला आश्चर्य वाटले. मसूदखानला रोखण्याची, त्याचा अन्याय वेशीवर टांगण्याची आपल्याला इच्छा झाली याचे त्याला नवल वाटू लागले.

पण तसे झाले खरे! वेड्यासारखा तो विचार त्याच्या मस्तकात घुसला आणि ठाण मांडून बसला. त्या क्षणी मसूदखान गावात हजर असता तर तो नक्कीच त्याच्या नरडीचा घोट घ्यावयास गेला असता! पण त्याच्या दुर्दैवाने मसूदखान मुंबईत मधुचंद्र साजरा करीत होता. आपल्या नव्या बायकोचे सौख्य अनुभवीत होता. मेजवान्या झोडीत होता.

मुस्तफाखानला त्याच्या या नव्या बायकोबद्दल अनुकंपा वाटू लागली. मसूदखानने आजवर तलाक दिलेल्या साऱ्या बायका त्याच्या नजरेसमोर उभ्या राहिल्या तेव्हा या नव्या बायकोचे भवितव्यदेखील वेगळे नाही, हा विचार त्याच्या मनात आला. त्या सोडून दिलेल्या बायकांबद्दल त्याला जशी दया वाटू लागली, तशीच त्याला या नव्या बायकोबद्दलदेखील वाटू लागली. त्या सोडल्या गेल्या म्हणून आणि ही कधी तरी सोडून देण्यासाठी आणली गेली म्हणून! पण या साऱ्या बायका त्याने पाहिल्या होत्या. अगदी मसूदखानने त्यांच्याशी लग्ने करण्याच्या आधीपासून तो त्यांना ओळखत होता. त्यांच्या सुखदु:खांशी, आकांक्षांशी, नवऱ्याबद्दलच्या त्यांच्या किमान सुखाच्या कल्पनांशी तो परिचित झाला होता. पण ही मुंबईची बायको त्याने पाहिली नव्हती आणि जे तिच्याविषयी त्याने ऐकले होते, त्यावरून गावातल्या या सामान्य स्त्रियांहून ती खचित वेगळी असल्याचे अनुमान त्याने काढले होते.

हैदराबादच्या कुठल्या तरी नबाबाची ती मुलगी असल्याचे त्याने ऐकले होते. ती चांगली शिकलेली, सुसंस्कृत मुलगी आहे असेही त्याला माहीत झाले होते. आणि मसूदखानशी तिचा प्रेमविवाह झाला असल्याचीही अफवा त्याच्यापर्यंत पोहोचली होती. मसूदखानसारख्या दुष्ट मनुष्याला निवडणाऱ्या त्या मुलीबद्दल त्याला करुणा वाटू लागली. अशा मोठ्या घराण्यातल्या चांगल्या मुलीने त्याला कशी माळ घातली हे कोडे विचार करूनदेखील त्याच्याने उलगडेनासे झाले.

त्याला तिच्याविषयी विलक्षण कुतूहल मात्र निर्माण झाले. तिला बघावेसे त्याला वाटू लागले. तिला शक्य तर भेटावे आणि तिचे हृद्गत समजावून घ्यावे असला विचित्र विचार त्याच्या डोक्यात येऊ लागला.

एक दिवस मसूदखान तिला घेऊन गावात आल्याचे कळताच तो विलक्षण अस्वस्थ

झाला. ती येणार असल्याचे कळले तेव्हा तो रस्त्यावर जाऊन उभा राहिला. इतर गोळा झालेल्या लोकांत मिसळला आणि मोटारीतून उतरणाऱ्या एकेक आकृतीकडे आतुरलेल्या नजरेने पाहत राहिला. मसूदखानबरोबर मोफत यायला मिळाले म्हणून त्याच्या गाडीतून आलेली गावातली फालतूक माणसे एकामागोमाग आधी त्या मोटारीतून उतरली. त्यानंतर मसूदखान उतरला. आता त्याची बायको उतरणार या अपेक्षेने डोळे किलकिले करून तो मोटारीच्या दिशेने पाहू लागला. पण तेवढ्यात मसूदखानच्या गड्यांनी एक डोली आणली आणि नेमकी मोटारीच्या दरवाजासमोर उभी केली. मसूदखानची बायको आत जाऊन केव्हा बसली त्याला कळलेदेखील नाही. डोली उचलली गेली आणि मागून लोक चालू लागले, तिथून निघून गेले.

आणि अशा रीतीने मसूदखानच्या बायकोला पाहायची त्याची एक संधी हुकली गेली. पाहायलाच जी मिळाली नाही तिच्याशी बोलणार तरी कसे? पण या एका अनुभवाने तो निराश झाला नाही. ती आपल्या दृष्टीस पडावी म्हणून तो आटोकाट प्रयत्न करू लागला. ती नवी नवरी असल्याने गावात कुठे तरी जायला म्हणून बाहेर पडेल या अपेक्षेने ठरावीक रस्त्यावर तो रेंगाळत उभा राहू लागला. मसूदखानच्या घराभोवताली रस्त्याने जाण्या-येण्याच्या मिषाने आणि कुणाच्या दृष्टीस पडणार नाही अशा बेताने तो फिरू लागला. त्याच्या घराच्या ठरावीक खिडक्यांसमोर जाऊन डोकावू लागला.

पण मसूदखानच्या बायकोचे त्याला दर्शन झाले नाही. ती घराबाहेर पडली नाही. कुणाकडे गेली नाही. कधी चुकूनदेखील कुठल्या खिडकीत उभी राहिली नाही. एवढी शिकलेली, सुसंस्कृत मुलगी त्या घराच्या चार भिंतीतच अडकून पडलेली पाहून त्याचे अंत:करण शतश: विदीर्ण होऊन गेले. ती मसूदखानच्या मोहजालात फसली जावी याचे त्याला अतोनात दु:ख होऊ लागले आणि मसूदखानचा त्याला अधिकच द्वेष वाटू लागला.

काही दिवसांनी मसूदखान एकटाच मुंबईला निघून गेला. त्याची बायको मात्र त्याच्या कुटुंबीयात तिथेच राहिली. त्याने असे एकटे मुंबईला निघून जाणे मुस्तफाखानला खटकले. त्याच्या या कृत्यातदेखील त्याला वेगळा, विचित्र अर्थ भरलेला दिसू लागला. आपल्या स्वैराचाराला तिचे बंधन राहू नये म्हणून त्याने योजलेली ही युक्ती असल्याचे मुस्तफाखानला वाटले.

त्याला वाटले, तिला भेटावे आणि मसूदखानविषयी सारे सांगून टाकावे. त्याने आजपर्यंत केलेली असंख्य लग्ने, त्याने आपल्या बायकांना दिलेली क्रूर वागणूक, त्याचा बदफैलीपणा, पैसे कमावण्याचे त्याचे वाममार्ग, आपल्या बापाचा त्याने घेतलेला बळी, मुस्तफाखानपाशी सांगण्यासारख्या कितीतरी कथा होत्या. पण तीच भेटत नव्हती. तिचे त्याला दर्शनदेखील होत नव्हते. तिचे नखदेखील त्याच्या नजरेस पडत नव्हते.

पण अखेर एक दिवस त्याला विलक्षण अनपेक्षितपणे मसूदखानच्या बायकोचे दर्शन झाले. पहाटेच्या वेळी आपल्या पडवीतल्या खाटेवर तो जाग येऊन पडला असताना एका स्त्रीची आकृती रस्त्याने समुद्राच्या दिशेने चालत गेलेली त्याने पाहिली आणि त्याची उत्कंठा

शिगेला जाऊन पोंहोचली. दुसऱ्या दिवशी पहाटे त्याच वेळी पुन्हा ती आकृती प्रगट झाली. तशीच सावकाश चालत समुद्राच्या दिशेने जाऊ लागली. आणि मग रोज नियमित जाताना त्याला ती दिसू लागली.

तिच्या केवळ चालण्याच्या ढबीवरून ती मसूदखानची बायको असली पाहिजे हे त्याने ओळखले. एवढी संथ चाल गावातल्या अडाणी बायकांची असणे शक्यच नाही, असे त्याला वाटले. गावातली कोणी स्त्री पहाटेच्या वेळी एकटी फिरायला जाणेही शक्य नाही, याचीही त्याला जाणीव झाली.

तिच्या मागोमाग तो रस्त्याने चालू लागला. थोडे अंतर ठेवून तो ती कुठे जाते ते पाहू लागला. चालता चालता समुद्राच्या अवाढव्य पसरलेल्या किनाऱ्यावर येऊन थडकला. थबकून तो जागच्या जागीच उभा राहिला.

मसूदखानची बायको संथ पावले टाकीत थोडी पुढे गेली आणि त्या किनाऱ्यावर एके ठिकाणी समुद्राकडे तोंड करून उभी राहिली. काही क्षण उभी राहून ती तिथेच खाली बसली.

मुस्तफाखान सावकाश पावले टाकीत तिच्याजवळ गेला आणि तिला न दिसेल अशा बेताने उभा राहिला. तिच्याकडे पाहू लागला. ती आपले पाय पसरून आणि आपल्या शरीराचा भार आपल्या दोन्ही हातांवर मागे टाकून बसली असल्याचे त्याच्या लक्षात आले. पहाटेच्या त्या खाऱ्या, मतलई वाऱ्याने बेभान, रोमांचित झाल्यासारखी ती समुद्राच्या दिशेने पाहत असल्याचे त्याला जाणवले. बसायची ती पद्धतही त्याला वेगळी, अनोखी वाटली. आणि तिची वस्त्रे, ती नेसायची पद्धत, सारेच त्याला वेगळे असल्याचे जाणवले. तिच्या सुसंस्कृतपणाविषयी, नबाबी घराण्याविषयी जे जे काही त्याने ऐकले होते ते ते सारे खरे असल्याचा त्याला पडताळा आला. आणि मसूदखानविषयीचा त्याचा तिरस्कार पुन्हा उफाळून आला. मसूदखानच्या मोहजालात ती फसली जावी या विचाराने तो कासाविस झाला. ती सुंदर, नाजूक स्त्री आपल्या संथ गतीने मसूदखानच्या बाहुपाशात कशी ओढली जात असेल याचे चित्र मनात उभे राहताच तो शहारून गेला.

त्याला मग तिथे अधिक वेळ थांबणे शक्यच झाले नाही. तो भराभर चालत तिच्यासमोर जाऊन उभा राहिला. त्याला पाहून ती चपापून व्यवस्थित बसली. आपले पसरलेले पाय तिने आखडून घेतले आणि आदबीने ती त्याच्याकडे पाहू लागली.

''अशा आश्चर्याने पाहू नका.'' तो तिला म्हणाला, ''माझे नाव मुस्तफाखान. या गावातच मी राहतो. पहाटे नेहमी फिरायला येतो. तुम्हांला इथं बसलेल्या पाहून सहज पुढे आलो.''

ती नुसतीच हसली आणि लागलीच गंभीर झाली. त्याच्या बोलण्यावर तिने पुरेसा विश्वास ठेवला नाहीसे त्याला तिच्या चर्येवरून वाटू लागले.

''आपण मसूदखानच्या पत्नी वाटते?''

''होय.'' ती कशीबशी एकच शब्द बोलली.

''मला वाटलंच!'' तो पुन्हा म्हणाला, ''आमच्या गावात बाहेरगावची तुमच्याशिवाय

दुसरी कोणीच स्त्री नाही. शिवाय, अशी पहाटे एकटीच फिरायला कोणी येणंही शक्य नाही.''

ती पुन्हा हसली. पण या वेळी मात्र लागलीच गंभीर झाली. पुष्कळ वेळ हसरा चेहरा करून त्याच्याकडे पाहत राहिली.

त्याला अधिक काय बोलावे ते कळेनासे झाले. तिचे हृद्गत कसे समजून घ्यावे? मसूदखानविषयी तिला एकदम कसे सावध करावे? विषयाला सुरुवात तरी कशी करावी?

ती एव्हाना त्याच्याकडे पाहायची बंद झाली होती. पहाटेचा अस्पष्ट प्रकाश मिसळलेल्या काळोखाच्या आवरणाखाली पसरलेल्या अथांग समुद्राकडे ती अनिमिषपणे पाहत होती. समुद्राचे त्या वेळचे दर्शन त्यालाही वेगळे, विलोभनीय वाटले. वाहणारा तो वारा वेगळा वाटला. न दिसणाऱ्या लाटांचा नाद आगळा भासला. आणि सागराची अथांगता केवळ त्या नादानेच जाणवली. तिच्यासारखाच तोही मंत्रमुग्ध बनला. काही न बोलता तो तिथून बाजूला झाला. जरा दूर जाऊन बसला. ती उठून निघून जाईपर्यंत बसून राहिला.

मग रोज पहाटे तो तिच्या यायच्या वेळी समुद्रावर येऊ लागला. आधी दूर उभा राहून जणू अचानक ती दृष्टीस पडल्याचे तिला भासवू लागला. आणि सहज चार गोष्टी बोलत बसू लागला. तो रोजच असा भेटू लागल्यानंतर तीही त्याच्याशी मोकळेपणाने बोलू लागली, पण ते बोलणे सारे अघळपघळ होते. ते समुद्राबद्दल होते. पहाटेच्या त्या खाऱ्या, मतलई वाऱ्याबद्दल होते. न दिसणाऱ्या लाटांच्या गुंजारवाबद्दल होते, बोलण्यातून त्याला तिचे गूढत्वच प्रतीत झाले होते. ती एखाद्या रहस्यमय कथानकाची नायिका भासली होती. स्वप्नरंजनात दंग होणारी आणि निष्पाप, अशी त्याच्या मनावर बिंबली होती. त्यामुळे तिच्याविषयी अनुकंपा आणि मसूदखानविषयीचा तिरस्कार अधिकाधिक वाढला होता.

मग एक दिवस त्याने तिच्याशी बोलता बोलता सरळच विचारले, ''तुमचा प्रेमविवाह झाला काय?''

तिने आश्चर्याने मान वर करून त्याच्याकडे पाहिले. तिच्या ओठांच्या पाकळ्या विस्फारल्या गेल्या. डोळ्यांत अनेक भाव प्रकटून नाहीसे झाले. ते सारे पकडता आले असते तर केवढे चांगले झाले असते, असे त्याला वाटले.

''होय.'' ती काही वेळाने म्हणाली आणि हसली. नेहमीसारखी हसऱ्या चेहऱ्याने त्याच्याकडे पाहत राहिली. तिचा चेहरा गोंधळल्यासारखा झाला. त्याला नेमके काय विचारायचे आहे हे तिच्या लक्षात आले नाही.

''कसा झाला?'' त्याने पुन्हा प्रश्न केला, 'तुमची हरकत नसेल आणि काही विपरीत वाटून घेणार नसाल तर ते सारे तुमच्या तोंडून ऐकायची माझी इच्छा आहे.''

ते ऐकून ती आपल्या हातावर रेलली आणि आकाशातल्या पहाटे लुप्त होणाऱ्या ताऱ्यांकडे पाहू लागली. त्या आठवणींनीच ती रोमांचित झाली. त्याचे अस्तित्व जणू विसरली. आपले पाय तिने नकळत पुढे पसरले आणि तिच्या तोंडून शब्द उमटू लागले...

ते ऐकताना शब्दांचा रूढ अर्थ त्याला गमावल्यासारखे वाटू लागले. कुठल्या तरी

संगीताच्या सुरांसारखा तिचा तो आवाज त्याच्या कानांत घुमू लागला. त्यातल्या घटनांपेक्षा तिच्या भावनांची उत्कटता तेवढी त्याच्या हृदयापर्यंत जाऊन भिडत होती. मसूदखानच्या प्रेमाने ओलीचिंब होऊन विवस्त्र अवस्थेत ती शहारत असल्याचे दृश्य त्या शब्दांतून त्याच्या मनात प्रकट झाले.

त्या विचाराने तो शरमिंदा झाला. आणि मग तिच्या प्रेमाबद्दल सांगितलेली कथा त्याला आकलन झाली. मसूदखान व्यापाराच्या निमित्ताने नेहमीच तिच्या घरी जात-येत होता. त्याने तिला पाहिली होती आणि तिच्याशी ओळख होताच तिला मागणी घातली होती. यात वेगळे, वैशिष्ट्यपूर्ण काहीच नव्हते. फक्त तीच वेगळी होती, वैशिष्ट्यपूर्ण होती. आणि त्या सामान्य माणसाच्या तकलुपी प्रेमाने अगदीच सामान्य रीतीने बळी पडली होती.

''हे अगदीच सामान्य झाले!'' तो उपरोधाच्या सुरात उत्तरला, ''अशी लग्ने नेहमीच घडतात. आश्चर्य वाटते ते तुमच्याबद्दल! तुम्ही कशा तयार झालात?''

''का बरे?'' तिने विचारले. ''माझी लग्नाला संमती होती. ते मला आवडले होते. त्यांच्याशी लग्न न करण्यासारखे काहीच कारण नव्हते.''

''काहीच कारण नव्हते?''

''काहीच नव्हते. निदान माझ्या दृष्टीने तरी मला आक्षेपार्ह वाटणारे त्यांच्यात काहीच आढळले नाही.''

''तुमच्या दृष्टीनं?'' तो जोरात म्हणाला आणि हसला. खदखदून हसला.

''का? त्यात हसायला काय झाले?'' तिने चमकून विचारले.

''तुमच्या दृष्टीने म्हणालात ना, म्हणून हसलो. तुमची दृष्टी निष्पाप आहे, भाबडी आहे, भोळी आहे. अशा दृष्टीला समोरचा मनुष्य वेगळा कसा दिसेल? तुम्हांला त्याआधी मसूदखानची कितीशी माहिती होती?''

''काहीच नाही!'' ती उद्गारली. आणि आपण अनावश्यकरीत्या त्याच्याशी युक्तिवाद करण्यात गुंतून जात असल्याचे तिला जाणवले. त्यातून अंग काढून घेण्याच्या इच्छेने ती म्हणाली, ''आणि माहीत असण्याची काही आवश्यकताही मला वाटली नाही.''

''असे कसे?'' आपले बोलणे अट्टहासाने चालवीत तो म्हणाला, ''ज्याच्याबरोबर आयुष्य काढावयाचे त्याची थोडीफार तरी माहिती–''

''जाऊ द्या हो.'' ती चटकन त्याला थांबवीत म्हणाली, ''तुम्ही उगाचच हा विषय घोळवताहात!''

''तुम्हांला आवडत नाही का?''

''तो प्रश्न नाही. आवडत नाहीही. पण शिवाय तुमच्याशी मी तो चर्चीत बसावे असे काही मला वाटत नाही.''

आणि मग तो गप्प बसला. त्या दिवशी तो विषय तसाच वाढवण्याची उकळी त्याने मनातल्या मनात दाबली. गळ्यापर्यंत आलेले मसूदखानविषयीचे तिरस्काराचे शब्द त्याने आतल्या आत गिळले. त्याने आपला पवित्रा बदलला आणि लागलीच चेहराही बदलून

टाकला. अजीजीच्या सुरात तो म्हणाला, ''तुम्हाला दुखावण्याची माझी इच्छा नव्हती.''

''खरे आहे. मी तसे कुठे समजले?'' ती उत्तरली, ''पण एवढे मात्र कळून चुकले की, तुमचे माझ्या नवऱ्याबद्दल काही चांगले मत नाही.''

''होय. नाही. किंबहुना फार वाईट मत आहे.''

''होय का? पण त्याचे कारण कोणते?''

''खास असे कोणतेच कारण नाही. वाईट माणसाबद्दल माणसाचे मत वाईटच होत असते.''

''अर्थात तो वाईट अथवा चांगला असणे हे आपल्या वाटण्यावर अवलंबून असते.''

यावर त्याला पुन्हा गप्प बसावे लागले. तिला उत्तर द्यायचे त्याला यावेळीही जमले नाही. त्याला ती अधिकच गूढ, रहस्यमय वाटू लागली. आणि मग रोज रोज भेटू लागल्यानंतर तिचे वागणे त्याला अधिकच बुचकळ्यात टाकू लागले.

एक दिवस त्याने तिला विचारले, ''तुम्ही पहाटेच्या फिरायला का येता?''

त्याच्या विचारण्यात काही तरी खोल अर्थ आहे असा तिला तात्काळ संशय आला. ती मिस्किलपणे उत्तरली, ''पहाटेची वेळ फिरायला चांगली असते म्हणून.''

''हे एक कारण झाले. दुसरे?''

''यावेळी सहसा कोणी मला पाह्यचा संभव नसतो म्हणून!''

''असं? म्हणजे तुम्हाला बाहेर पडलेले कुणी पाहू नये, अशी तुमची इच्छा असते तर!''

''नाही नाही, असं बिलकूल नाही. तुम्ही मला रोजच पाहता की! तुमच्यांशी मी मोकळेपणानं बोलते. मुंबईला मी एकट्यानं बाहेर पडते. पण या तुमच्या गावात फिरायला असं बाहेर पडणं कुणाला आवडणार नाही.''

''मग काय झाले? लोकांच्या आवडीनुसार तुम्हांला वागायचे काही कारण नाही.''

''होय, पण माझ्या नवऱ्यालाही ते आवडत नाही.''

''असं? म्हणजे तुमच्या नवऱ्यानं तुम्हाला दिवसा बाहेर पडायची बंदी केली आहे.''

''असा काही माझ्या म्हणण्याचा अर्थ होत नाही. त्यांना जे आवडत नाही ते मी करीत नाही.''

''तुम्हाला आवडत असले तरी?''

''हो! मला आवडत असले तरी.''

''पण हा शुद्ध जुलूम झाला!''

''असे तुमचे म्हणणे! मला तसे वाटत नाही.''

या क्षणी त्याचा संताप अनावर झाला. मसूदखानविषयीचा सारा त्वेष त्याच्या मस्तकात भिनला. त्याच्या तिरस्काराने तो वेडापिसा झाला. तो दातओठ खात म्हणाला, ''तुम्हांला तुमच्या नवऱ्याबद्दल काहीच माहिती नाही. मी काय सांगतो ते ऐका! तुमचा नवरा हा एक बदफैली माणूस आहे, हे तुम्हांला माहीत आहे? त्याने आजवर अनेक लग्ने करून अनेकींच्या आयुष्याची राखरांगोळी केल्याची तुम्हाला कल्पना आहे? आपल्या बायकांशी तो

अत्यंत क्रूरपणे वागतो याची तुम्हाला अद्याप जाणीव झाली आहे? पैशापलीकडे त्याला कसलीच मातबरी वाटत नाही हे तुम्हाला माहीत आहे? स्त्री आणि धन कुठल्याही वाममार्गाने मिळवण्याची त्याची तयारी असते, याचा तुम्हाला अनुभव आला आहे? म्हणूनच तो तुम्हाला दिवसा फिरायला पाठवू इच्छित नाही. आपल्या बायकोने चार लोकांत मिसळावे, बाहेर पडावे असे त्याला वाटत नाही, वाटणार नाही. तिने आपल्यासारखेच बनावे म्हणून तो प्रयत्न करीत राहणार, आपली मते तुमच्यावर लादणार. स्वत:सारखे तुम्हाला वागायला लावणार! तुमच्या स्वतंत्र व्यक्तित्वाला तिलांजली द्यायला लावणार!...''

पुढे काय बोलावे त्याला कळेना. आपण केलेला प्रहार तिला कितपत जाणवला हेही त्याला आकलन होईना. जोवर तो बोलत होता तोवर तिच्या प्रतिक्रिया जाणणे त्याला शक्य झाले नाही. पण तो बोलायचा थांबला तेव्हा त्याला आश्चर्याचा धक्का बसला.

ती हसत होती. नेहमीसारखीच हसऱ्या चेहऱ्याने त्याच्याकडे पाहत होती. एखाद्या लहान मुलाच्या बडबडण्याने मोठ्या माणसांची जशी करमणूक होते तशी तिची झाल्याचे तिचा चेहरा आणि डोळे त्याला सांगत होते.

त्या हास्याने तो दुखावला! ते निर्मळ, निष्पाप हसणे त्याच्या जिव्हारी लागले. आपले सारे बोलणे असे सहजासहजी हसून तिने उडवून लावावे याचे त्याला दु:ख झाले. त्याला वाटले, तिला आपले बोलणे खरे वाटत नसावे.

''तुम्हाला हे सारे खोटे वाटते?''

''छे: छे:!'' ती म्हणाली, ''कदाचित खरेही असेल; पण मला खऱ्याखोट्याचा पडताळा कुठे घ्यायचा आहे?''

''मग तुम्ही हसलात का?''

पुन्हा तशीच हसत ती उत्तरली, ''मी इथे आल्यापासून मला अनेकांनी माझ्या नवऱ्याबद्दल जे सांगितले, तेच तुम्ही मला ऐकवले. मी ते ऐकून केव्हाच कंटाळून गेले आहे. मग हसू नको तर काय करू? जे मला आधीच माहीत होते ते ऐकण्यात स्वारस्य तरी कसे येणार?''

ती पुढे म्हणाली, ''पण इतरांपेक्षा तुमचे सांगणे मला जरा वेगळे वाटते खरे! लोकांचा उद्देश माझे त्यांच्याविषयी मत कलुषित करणे हा होता. तुमचा तसा दिसत नाही. तुम्हाला ते खरोखरच भयंकर वाटतात. वाईट वाटतात. आणि अशा वाईट माणसापासून मी दूर राहावे या अपेक्षेने तुम्ही सारं मला सांगताहात! तुम्हाला ते वाईट दिसले असतील, कदाचित तुमच्याशीही ते वाईट वागले असतील. पण मला ते चांगले वाटतात! खरंच, चांगले वाटतात.''

तो उपरोधाने हसून म्हणाला, ''त्याने तलाक दिलेल्या साऱ्या बायकांना असेच वाटत होते. त्याच्याविषयी त्यांच्या अशाच भावना होत्या. पण अखेर त्यांचे काय झाले? तुम्हालाही अखेर तोच अनुभव येईल-''

''अशक्य!'' ती म्हणाली. पण या वेळी नेहमीसारखा तोल ठेवणे तिला शक्य झाले नाही. तिचा आवाज फार वेगळा, विचित्र निघाला. तिचा चेहरा पार बदलून गेला. जणू

आपले सर्वस्वच लुटले जात आहे या भावनेने ती कासाविस बनून गेली. ''हे शक्य नाही. कधीच शक्य नाही!'' ती पुन्हा म्हणाली. तिचा गळा आता दाटून आला आणि डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

तो बोलायचा बंद झाला. तिच्या त्या प्रेमाच्या दीप्तीने दिपल्यासारखा तिच्याकडे पाहू लागला. हळूहळू तिची आसवे गालांवर ओघळू लागल्याचे त्याच्या ध्यानात आले आणि तो व्यथित झाला. कासाविस झाला. तिला आपण अशा यातना द्यायला नको होत्या, असे त्याला वाटू लागले. तो म्हणाला, 'आय ॲम सॉरी. तुम्हाला दु:ख देण्याची माझी इच्छा नव्हती.''

ती काहीच म्हणाली नाही. तशीच समुद्राकडे पाहत बसून राहिली. हळूहळू तिच्या गालांवरील आसवे सुकून गेली. डोळे कोरडे झाले. चेहरा सौम्य, हसरा झाला आणि मग त्याला बरे वाटले. खूप बरे वाटले. मसूदखानबद्दल कितीही तिरस्कार वाटत असला तरी तिला दु:ख व्हावे असे तो स्वप्नातदेखील कल्पीत नव्हता. किंबहुना तिने आनंदी राहावे म्हणून तर त्याची ही सारी धडपड चालली होती.

त्या दिवशी ती तिथून उठून गेली तेव्हा यापुढे ती फिरायला येणार नाही आणि आलीच तरी आपल्याशी एक शब्ददेखील बोलणार नाही असे मात्र त्याला वाटले. परंतु ती नेहमीसारखी दुसऱ्या दिवशी तर आलीच, पण त्याच्याशी मोकळेपणाने बोलू लागली. इतकेच नव्हे तर तिने त्याला पाहताच हसून विचारले, ''आज कुठल्या इराद्याने आला आहात?''

''कुठल्याही नव्हे. तुमचे मन:स्वास्थ्य बिघडवण्याचा माझा बिलकूल इरादा नाही.''

''शुक्रिया!'' ती हसून उत्तरली. पण त्या दिवशी तिलाच तो विषय काढण्यावाचून चैन पडले नाही. तिने विचारले, ''तुम्ही असे सतत माझ्या नवऱ्याविरुद्ध का बरे बोलत असता?''

''मग काय करू? आमच्यासारखी सामान्य माणसे बोलण्यापलीकडे अधिक काही करू शकत नाहीत. पण निदान आम्हाला बोलता येते हेही काही कमी महत्त्वाचे नव्हे! अर्थात बोलायचे तर त्याकरिता योग्य ते माणूस मिळाले पाहिजे. सुदैवाने तेही मला तुमच्या रूपाने लाभले. म्हणून मी तुमच्यापाशी बोलत असतो. शिवाय तुमच्याशी बोलायला अधिक अर्थ आहे. तो मनुष्य कसा आहे हे तुम्हाला कळणे अधिक आवश्यक आहे.''

''पण मला ते कळून घ्यायचे नसेल तर?''

''नका घेऊ, त्यामुळे काही बिघडले नाही. पण मी बोलत राहणार! सतत ऐकवत राहणार. कारण एक दिवस केव्हा तरी मी माझे म्हणणे तुम्हाला पटवू शकेन याचा मला विश्वास आहे.''

''तुमची कल्पना चुकीची आहे. साफ चुकीची!''

पण तिच्या या उत्तराने तो काही बोलायचा बंद झाला नाही. त्याचा हिरमोड झाला नाही. किंबहुना आता तो अधिक हिरीरीने तिच्याशी युक्तिवाद करू लागला. नवऱ्याविषयीची तिची मते आपण बदलू शकू असे त्याला उगाचच वाटू लागले. तो दिवसागणिक तिच्यापाशी

मसूदखानच्या चारित्र्यावर, त्याच्या एकूण वागण्यावर प्रखर हल्ले चढवू लागला. त्याची सरळ निंदा करू लागला आणि तिची उघड उघड स्तुती त्याने आरंभली.

तो तिला म्हणाला, ''तो तुमच्या लायक नाही, बिलकूल लायक नाही. तुमचा नवरा होण्याच्या बिलकूल पात्रतेचा नाही.''

''का बरे?''

''का? कारण उघडच आहे. तुम्ही वेगळ्या आहात. फार चांगल्या आहात. निष्पाप मनाच्या आहात. स्वप्नातसुद्धा तुम्ही कुणाला दुखवले नसेल, फसवले नसेल. अशा स्त्रीचा नवरा व्हायची त्याची कशी लायकी असणार? पण त्याने तुमची पात्रता ओळखलेली नाही. म्हणून तर घराच्या चार भिंतीत तुम्हाला त्याने बंदिस्त होण्याची आज्ञा केली. पण तुमची पात्रता मी ओळखली आहे. तुमची योग्यता मी जाणली आहे.''

''तुम्ही?''

''होय.''

''पण तुम्ही जाणून उपयोग काय?'' ती हसून उत्तरली, ''मला तुमच्याशी काहीच कर्तव्य नाही. माझ्या नवऱ्याने माझी पात्रता ओळखणे मी अधिक महत्त्वाचे समजते. त्याच्याच मतांना किंमत देते–दुसऱ्या कुणाच्या नव्हे!''

तिच्या या युक्तिवादाने पुन्हा त्याला त्या क्षणी चीत केले. तात्पुरते नामोहरम करून टाकले. पुन्हा तो त्या दिवशी स्वस्थ बसला. पुन्हा दोघांत तात्पुरता अबोला निर्माण झाला. सागराचा आवाज तेवढा ऐकू येत राहिला. झाडांची सळसळ तेवढी जाणवत राहिली. आणि एकमेकांचे अस्तित्व तेवढे त्यांना सलत राहिले.

पण एवढे होऊनदेखील ती येत राहिली आणि त्याच्याशी नेहमीसारखी बोलत राहिली. यातच तो मग स्वत:ला धन्य समजू लागला. तिच्या नवऱ्याविषयीच्या प्रेमाने भरलेला उत्कट स्वर त्याला तसाच सतत ऐकू येत राहिला. तिचे निरागस हास्य तसेच त्याच्या दृष्टीस पडू लागले. आणि तो तिच्या नवऱ्यावर आग ओकीत राहिला. सततची आग!

परंतु एक दिवस त्या विस्तीर्ण किनाऱ्यावर एका कोपऱ्यात वाळूवर रेलती बसलेली तिची आकृती त्याला दिसायची बंद झाली. कायमचीच बंद झाली. तो तिला वेड्यासारखा सर्वत्र शोधू लागला. अनेक दिवस ती येत नाही हे माहीत असूनदेखील वेड्या आशेने तो पहाटे किनाऱ्यावर येऊ लागला आणि तिला धुंडाळत बसू लागला. पण त्याला ती पुन्हा कधीच दिसली नाही.

काही दिवसांतच मसूदखान गावात आला असल्याचे त्याला माहीत झाले व तिच्या न येण्यामागचा अर्थ त्याच्या ध्यानात आला. अजूनपर्यंत पहाटे फिरायला जायचे जे स्वातंत्र्य तिला त्याने बहाल केले होते, तेही आता त्याने छिनावून घेतले असले पाहिजे, असे त्याला वाटले.

त्याला वाटले आता पुरे झाले! स्वत:शीच मसूदखानचा तिरस्कार करीत राहणे पुरे झाले! त्याच्या बायकोला वळवणेही आता पुरे! प्रत्यक्ष त्यालाच आता जाब विचारावा! प्रहार प्रत्यक्ष

त्याच्यावरच करावा! जी काय शब्दांची आग ओकायची ती प्रत्यक्ष त्याच्यावरच ओकावी! आणि त्या विचाराने एक दिवस भडकला गेल्यासारखा दुपारच्या भर उन्हात तो मसूदखानच्या घरी जाऊन धडकला.

मसूदखान तेव्हा उघडाबोडका आपल्या घराच्या पडवीत बसला होता. त्याचे घामाने डबडबलेले आणि केसाळ शरीर फार ओंगळ दिसत होते. पूर्वीपेक्षा त्याचे पोट अधिक सुटले होते आणि पोटऱ्या थलथलीत झाल्या होत्या. घामाने हैराण होऊन तो हातातल्या पंख्याने सारखा वारा घेत होता. मुस्तफाखानला अंगणात आलेला पाहताच त्याने बसल्या जागेवरूनच गुर्मीत विचारले, "काय आहे?"

पहिल्या प्रथमच मुस्तफाखानने करारीपणाने मसूदखानच्या नजरेस नजर दिली. तो त्याच्याजवळ जाऊन भिडला आणि म्हणाला, "मला तुमच्याशी काही बोलायचे आहे."

"काय आहे?" मसूदखानने पुन्हा दरडावल्यासारखे विचारले.

"मला तुमच्या बायकोबद्दल काही बोलायचे आहे."

"काय म्हणालास?" मसूदखान ओरडला. त्याचा सारा नूर बदलला. तो संतापून गेला. मुस्तफाखानच्या अंगावर धावून गेला. त्याचा दंड पकडून पुन्हा ओरडला, "आधी इथून चालता हो बघू. नाही तर एक लाथ मारून बाहेर फेकेन."

"ते मला माहीत आहे." मुस्तफाखान निर्भयपणे उच्चारला, "परंतु मला जे काही बोलायचे आहे ते बोलल्याखेरीज मी इथून जाणार नाही. मला बाहेर फेकलेस तरी तिथून मी ओरडेन. माझे बोलणे संपवीन आणि मगच निघून जाईन-

"तू एक अत्यंत नीच मनुष्य आहेस. तुला खरे म्हणजे मनुष्य का म्हणावे असाही मला कधी कधी प्रश्न पडला आहे. कारण तू शुद्ध पशू आहेस. आजवर अनेक स्त्रियांशी लग्ने लावून तू त्यांच्या आयुष्याची राखरांगोळी केलीस आणि आता या नव्या बायकोची करणार आहेस. त्या शिकलेल्या, सुसंस्कृत मुलीला तू या घराच्या चार भिंतीत बंदिस्त करून ठेवली आहेस. तिला बाहेर पडायची, चार लोकांशी बोलायचीदेखील मोकळीक ठेवलेली नाहीस. कारण ती आपले खरे स्वरूप ओळखील अशी तुला भीती वाटते.

"रोज पहाटे ती फिरायला येत होती. आणि तिला काही गोष्टी कळू लागल्या होत्या. मी तिला सारे सांगत होतो. तिला तुझे सत्य स्वरूप कळावे म्हणून धडपडत होती. परंतु तिला पहाटे बाहेर पडायचीदेखील तू बंदी केलीस आणि कधीतरी तिने जे तुला सांगितले असते ते सांगायची पाळी माझ्यावर आणलीस!

"तू किती निगरगट्ट आहेस हे मला माहीत आहे, मी तुझे काहीच वाकडे करू शकत नाही हेही मला कळते. पण मी तुझ्या तोंडावर तुझ्याविषयी माझी खरी मते व्यक्त करू शकतो यातच मला आनंद वाटत आहे. त्यामुळे मला फार समाधान लाभले आहे. आणि माझ्या या कृतीचा परिणाम तुझ्या बायकोचे भले होण्यात होणार आहे अशी माझी खात्री आहे..."

एवढे सारे एका दमात बोलून झाल्यावर मुस्तफाखानला अतोनात दम लागला. आपल्या

मनगटावरील मसूदखानची पकड त्याला जाणवेनाशी झाली. मसूदखानचा चेहरा त्याला विचारमग्न झालेला दिसला. आपल्या सत्य बोलण्याचा झालेला परिणाम पाहून त्याचे हृदय आनंदाने भरून आले.

विचारमग्न मसूदखानने तेवढ्यात आपल्या बायकोला साद घातली आणि क्षणार्धात ती दरवाजात येऊन उभी राहिली. मुस्तफाखानने चटकन तिच्याकडे नजर वळवली. तिच्या चेहऱ्यावर नेहमीचेच हास्य पसरले असल्याचे त्याला दिसून आले. मसूदखानने तिला विचारले, ''याला तू ओळखतेस?''

ती हसून उत्तरली, ''त्याला ना? ओळखते ना. समुद्रावर हा नेहमी फिरायला यायचा आणि तुमच्याविरुद्ध काही ना काही मला सांगत राह्यचा. पण तुम्ही काय त्याच्या नादी लागता? मी त्याच्या बडबडण्याकडे लक्ष दिले नाही. तुम्हीही देऊ नका. त्याला सोडा. आत या–घरात या-''

ती अशी बोलता बोलता दरवाजातून पुढे आली आणि मसूदखानचा दंड धरून त्याला घेऊन जाऊ लागली. तेव्हा मुस्तफाखानचे लक्ष तिच्या शरीरयष्टीकडे वेधले. पहाटेच्या अस्पष्ट प्रकाशात पाहिलेल्या तिच्या देहाहून हा देह त्याला वेगळा किंचित जाड भासला. तिच्या शरीरातल्या बदलाने त्याला आश्चर्यचकित केले. तिच्या पोटाचा पुढे आलेला भाग त्याच्या डोळ्यांत खुपू लागला.

आपल्याला हे आधीच कसे जाणवले नाही, दिसू शकले नाही? तिचे अश्रू आपल्याला दिसले. डोळ्यांतले मिस्किल भाव आपल्यापर्यंत भिडले होते. तिच्या यातना आणि दु:ख आपल्या नजरेने टिपले आणि नवऱ्याविषयीची चेहऱ्यावर प्रकटणारी प्रीती हुडकली. मग हे एवढे कसे डोळ्यांना दिसले नाही?

पण ते आता दिसताच त्याचा सारा आवेश गळून गेल्यासारखे त्याला वाटू लागले. आतां अधिक काही बोलण्यात स्वारस्य उरले नाही, तिथे अधिक थांबण्यातही अर्थ नाही असा विचार त्याच्या मनात आला. मसूदखानने गचांडी मारल्याने एके काळी झालेल्या त्याच्या अवमानित स्थितीहून त्या क्षणी त्याला अधिक अवमानित झाल्यासारखे वाटू लागले. कसातरी तो तिथून बाहेर पडला आणि भडकलेल्या उन्हात घरचा रस्ता चालू लागला.

# तळपट

रात्र पडली आणि गावात घरोघर फाणस लटकले. मग लोकांची जेवणं झाली. काही वेळानं गावात गस्त घालणारी पोरं घराघरांतून बाहेर पडून एकत्र जमली. टोळक्या-टोळक्यांनी वाडीवाडीवर पांगली. घराघरांतून पेटलेले फाणस थोड्या वेळाने विझले. गाव काळोखात बुडाला. मशिदीतली बत्ती तेवढी तेवताना दिसत होती.

दहा वाजता मुसलमान वस्तीत एकदम जाळ पसरलेला शाळेपाशी गस्त घालत असलेल्या मुलांना दिसला. थोड्याच वेळात काळसर धूर आकाशात वर वर चढताना दिसू लागला. आणि काही क्षणातच आगीचा भडका उडाला. लोळच्या लोळ दिसू लागले. त्याबरोबर मोठा आरडाओरडा सुरू झाला. रडण्याचे आणि किंचाळण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. मोठा गलका झाला. सारा गाव गडबडून जागा झाला. विझलेले फाणस पुन्हा घरोघर पेटले. आगीच्या दिशेने गाव लोटला.

आहमद खोताच्या पेंढ्यांच्या उडवीला आग लागली होती. उडवी धडाधड आगीनं जळत होती. आगीच्या गरम धापानं जवळ जमलेल्या लोकांचं अंग शेकून निघत होतं. हसनखानचं पायबळ सुटून गेलं होतं. तो रडत होता; ओरडत होता. गावचे लोक त्याला समजावीत होते.

जमलेल्या लोकांनी लगेच धावपळ केली, आणि खालच्या विहिरीला उपसा लावला. पाण्याचा मारा सुरू झाला. तमाम गाव आग विझवण्यासाठी धडपडू लागला. कधी घराबाहेर न पडलेल्या खोतांच्या बायकादेखील हंडे भरभरून पाणी आणून उडवीत ओतू लागल्या. गावातला जवान आणि जवान आगीशी झुंज खेळू लागला.

बऱ्याच वेळानं आग आटोक्यात आली. हळूहळू वर येणारा धूरही मंदावला. जळका पेंढा उडवीपासून दूर सारण्यात आला. जमलेल्या सर्व लोकांनी आहमद खोताला दिलासा दिला. ते तिथंच उभे राहिले आणि झालेल्या प्रकाराबद्दल आपसांत कुजबुजू लागले. आग लागली कशी? कोणी लावली? असे तर्क सुरू झाले. अनेकांच्या अनेक शंका सुरू झाल्या. तेवढ्यात कुणीतरी ओरडून म्हणालं, ''याची चवकशी होया हवी.'' पण बाकीच्या लोकांनी त्याला गप्प केलं. गस्त घालणारी तिथं जमलेली पोरं भयभीत पण सावध चित्तानं पुन्हा गस्त घालण्यासाठी निघून गेली. जागा झालेला, तिथं गोळा झालेला गावही हळूहळू पांगला, आपआपल्या घरी गेला. पुन्हा गाव सामसूम झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मुसलमानवाडी जागी झाली ती रात्रीच्या आगीच्या प्रसंगानं भेदरलेली! उजाडताच उडवीपाशी पुन्हा लोकांचा घोळका जमला. दिवसाच्या उजेडात जळक्या उडवीचं, पेंढ्यांचं दृश्य भकास दिसत होतं. लोक रात्रीसारखेच तिथे कुजबुजत उभे राहिले. मग त्यातले चार लोक निघाले आणि कासमखानकडे गेले.

कासमखान गावचे सरपंच. महिन्यापूर्वी महाडला दंगे झाल्यापासून गावात गस्त घालण्याची तजवीज त्यांनीच केली होती. कारण गावातलंही वातावरण विनाकारणच बिघडलं होतं. गावच्या एका बाजूस असलेल्या एखाद्याच्या घरी क्वचित दगड पडू लागले. दारं गदगदा हालवली जाऊ लागली. गंमत अशी की, गावातल्या कुठल्याही घरी हा प्रकार होऊ लागला. घरातली बायकापोरं रात्री-अपरात्री बोंबलत उठू लागली. महाडच्या दंगलीचा फायदा घेऊन गावात गुंडगिरी करण्याचा काही उपद्व्यापी लोकांचा हा बेत असावा, असं ठरवून गाववाल्यांनी एकजुटीनं रात्रीची गस्त घालण्याचं ठरवलं.

या गोष्टीला महिना होऊन गेला. दगड पडायचे बंद झाले. बायकामुलांत पसरलेली भीतीही कमी झाली. जवान मुलं उत्साहानं, एकजुटीनं गस्त घालताना दिसू लागली. पण आज ही आग कशी लागली? सहज, चुकीनं लागली असेल काय? की कोणी जाणूनबुजून लावली? बाहेरून कुणी येऊन लावली काय? पण बाहेरून गावात येणाऱ्या दरोबस्त वाटांवर तर गस्तवाले जवान संध्याकाळपासून खडे होते-मग आग लागली कशी? कुणी गाववाल्यानं तर लावली नसेल?...

अशा प्रकारे लोकांत कुजबूज चालली होती. सकाळपासून नाना अफवा उठत होत्या. अनेकांची नावं घेतली जात होती. विनाकारण नसते संशय लोकांना यायला लागले होते. म्हणून हे लोक कासमखानांकडे आले होते. आगीचा छडा त्यांनी लावावा, गुन्हेगार त्यांनी हुडकून काढावा, म्हणून त्यांना सांगण्यासाठी आले होते.

त्यांचं हे बोलून झालं आणि मग काही वेळ स्तब्ध राहून कासमखानांनी विचारलं, ''आहमदचा कुणाशी भांडनटंटा होता काय?''

यावर सगळ्यांनी 'नाही' म्हणून माना डोलावल्या. कदाचित या गढूळ वातावरणाचा फायदा घेऊन एखादा वैरी आपलं वैर साधण्याची सहज शक्यता होती. पण या साध्या नि सरळ माणसाचं कुणाशी आणि कसलं वैर असणार होतं?

त्यांनी 'नाही' म्हणताच कासमखान सचिंत झाले, त्यांनाही काही तर्क करता येईना. खरं म्हणजे तर्क करणं हे त्यांच्या हिशेबातच नव्हतं. असं काही असलं की कुणीतरी आपला तर्क बोलून दाखवायचा आणि त्यावर त्यांच्या पाठिंब्याचं शिक्कामोर्तब करायचं अशी गावांतली नेहमीची रीत होती.

म्हणून त्यांनीच आलेल्या लोकांना विचारलं की, त्यांचा काय समज आहे? ह्या आगीच्या प्रकाराबद्दल त्यांचं काय म्हणणं आहे?

यावर प्रत्येकाने आपापले तर्क बोलून दाखवले. अखेरीस हैदर बोलला आणि त्यानं अण्णा बामणाचं नाव उच्चारलं.

त्याबरोबर सगळे जण चपापून हैदरकडे बघू लागले. त्यानं सांगितलेला हा तर्क खरा असेल का, याची आपापल्या मनाशी ते शहानिशा करू लागले.

रात्री आपण आणि सखारामराव असे दोघे बामणवाडीवरच पहाऱ्यावर होतो, रात्रीच्या दहाच्या सुमारास अण्णा हातात काठी घेऊन खोकत खोकत दुकानाच्या दिशेनं गेला–असं हैदरनं पुढं सांगितलं.

आणि सखारामरावांनीही याला दुजोरा दिला. ते म्हणाले, ''आपुनसुद्धा अन्नाच्या खोकन्याचा आवाज वळखला.''

कासमखान हळूहळू विचार करू लागले. हळूहळू मागच्या काही गोष्टी त्यांना आठवल्या. गावातल्या हिंदू मुलांसाठी वेगळी, स्वतंत्र शाळा असावी म्हणून अण्णा काही महिन्यांपूर्वी खटपट करीत होता. गावातली शाळा मुसलमानांची होती म्हणजे मुसलमानांनी आपल्या खर्चानं बांधून काढली होती. पण सगळी गावातली मुलं त्याच शाळेत शिकत होती. अण्णाला हे नको होतं की काय?

याहून दुसरी एक गोष्ट कासमखानांना अधिक महत्त्वाची वाटली. गावात दगड पडायला लागल्यावर रात्रीचा पहारा करण्याची सूचना कामसखानांनी केली, तेव्हाही अण्णानंच त्यांना विरोध केला होता. त्याचं म्हणणं असं होतं की, सबंध गावचा पहारा करण्याची काय जरुरी आहे? दरोबस्त वाडीवरल्या गड्यांनी आपापल्या वाडीच्या पहाऱ्याचा बंदोबस्त करावा म्हणजे झालं.

कासमखानांच्या मनात आलं, 'अण्णा खरोखर असा आहे काय? आग लावण्याच्या थराला तो जाईल काय?...कुणी सांगावं? धामधुमीचा, गडबडीचा वखत आहे–कुणाचाच भरंवसा देता येणार नाही...त्यातल्या त्यात या बामनाच्या जातीचा तर बिलकूल देता येणार नाही.'

आलेल्या लोकांना त्यांनी विचारलं, ''मग काय करावा म्हनताव?''

यावर सगळ्यांच्या विचारानं असं ठरलं की, आज रात्री गावकीची बैठक घ्यावीच. गावातल्या रात्री पहाऱ्यावर नसलेल्या सगळ्या लोकांना आग तुम्ही लावलीत का म्हणून विचारावं, त्यांना शपथ घ्यायला लावावी. कसमा खायला सांगावं. अण्णा तिथं येईलच. तो शपथ घेतो की नाही, यावरून खरं-खोटं काय ते कळेलच.

सगळ्यांना ही युक्ती पसंत पडली. कासमखानांच्या नावानं रात्री शाळेत बैठक घेण्याचं ठरलं. मग ते लोक निघून गेले.

रात्रीच्या प्रकाराची घरोघर चर्चा चाललेली होतीच. अल्पावधीत कसं कुणास ठाऊक, त्या प्रकाराशी संबंधित म्हणून अण्णाचं नाव सर्वतोमुखी झालं.

अण्णा नेहमी सकाळच्या प्रहरी मुसलमानवाडीवरून आपल्या शेतावर जात असे. परतताना वाटेतल्या कादिर खोताच्या दुकानावर तो थोडा वेळ बसे आणि मग घरी जाई. पण त्या दिवशी सकाळी अण्णा शेतावर गेलेला कुणाला दिसला नाही. ही गोष्टदेखील संशयास्पद ठरली. यावरून रात्रीच्या बैठकीत अण्णाची कारवाई उघडकीस येणार असंच

सगळ्यांना वाटू लागलं.

संध्याकाळचा म्हारकीचा म्हार गावभर ओरडत गेला, ''आज रातरी गावकीची बैठक सालंमंदी बसायची हाय होऽ...''

रात्रीची जेवणं झाल्यावर दरोबस्त घरांतील पुरुषमंडळी शाळेकडे निघाली. रात्रीचे पहाऱ्यावर असलेले निवडक जवान मात्र गस्त घालण्यासाठी निघून गेले. बाकीचे शाळेपाशी जमा झाले. दोन गॅसबत्त्या शाळेत भकभकू लागल्या. आपल्यावर काही तोहमत येते की काय म्हणून चिंतातुर झालेले म्हार कोंडाळं करून एका बाजूला बसले. जमावानं आलेली कुळवाडी मंडळी दुसऱ्या बाजूला बसली. राव मंडळीही येऊन बसली. ब्राह्मण नि मुसलमानही जमा झाले. कासमखान हातातली काठी टेकीत आले आणि बैठकीत मध्येच बसले.

ते येऊन बसले तेव्हा कोणी तरी येऊन त्यांच्या कानाला लागून म्हणाला, ''अन्ना अजून नाय अयलो तो?''

''हो. तो येयालाच व्होवा. नाय तर एवरा करून फुकट व्हायाचा.'' असं म्हणून कासमखानांनी म्हारकीच्या म्हाराला अण्णाला बोलवायला पाठवलं. म्हाराला त्यांनी सांगितलं, ''अन्नाला म्हनावं, तुज्यामुळं बैठक खोटी ऱ्हायली हाय.''

म्हार काही वेळानंच परत आला. अण्णानं सांगितलं होतं की, ''मला बरं नाही. आज खोकला जास्तच करतोय. मी यायला हवा का? तसं असल्यास पुन्हा येऊन कळव म्हणजे येतो.''

म्हारानं हा निरोप येऊन सांगताच कासमखान मनातल्या मनात हादरले. अण्णा शंभर टक्के गुन्हेगार आहे असं त्यांचं मन त्यांना सांगू लागलं. ते जोरानं किंचाळले, ''यायलाच हवा म्हंजे काय? यायलाच पायजे! हा बामण आमाला फसवायला बगतो काय?''

म्हार पुन्हा अण्णाला बोलावण्यासाठी गेला आणि इकडे बैठकीत कुजबूज सुरू झाली. अण्णा का येत नाही? तो घरी तरी नक्की आहे का? सकाळपासून तो दिसला का नाही?

तेवढ्यात कासमखानांनी एकेकाला शपथा घ्यायला सांगितल्यामुळे गलका कमी झाला. अण्णा न आल्यामुळे त्याच्या शपथेला एवढं महत्त्व आलं की, बाकीच्या लोकांच्या शपथांत कुणाला फारसा रस उरला नाही. इतरांच्या शपथांचा फार्स चटकन उरकला गेला.

आणि मग अण्णा आला. आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणं त्यानं मफलर गुंडाळला होता. त्याच्या हातात कंदील आणि काठी होती. त्याचे तीक्ष्ण घारे डोळे क्षीणपणे सगळ्या बैठकीवरून फिरले. शाळेच्या पडवीच्या भिंतीला असलेल्या खुंटीला हातातला कंदील टांगून त्यानं त्याची वात कमी केली. मग खोकून खोकून त्यानं बेडका बाहेर टाकला आणि खाकरत खाकरत आत येऊन तो कासमखानांच्या बाजूला येऊन बसला.

त्याबरोबर सगळ्यांच्या नजरा त्याच्यावर रोखल्या गेल्या. गोंधळ कमी झाला. लोक एकदम शांत झाले. अण्णानं संथपणे एकदा साऱ्यांवरून आपली दृष्टी फिरवली आणि तो विडी पेटवून तिचे झुरके मारू लागला. एक प्रकारची उत्सुकता, विचित्र कुतूहल सगळ्यांच्या

मनात एव्हाना निर्माण झालं होतं. आता पुढे काय होणार याचा कुणालाच अंदाज येत नव्हता. तोच कासमखान अण्णाला म्हणाले, ''अन्ना, सगल्यांच्या शपता घेऊन झाल्या. आता तुजी होऊ दे.''

पण इतरांप्रमाणे अण्णाला सरळ शपथ घ्यायला लावायची हा बेत हैदरला पसंत पडला नाही. तो एकदम ओरडला, ''नाय-तसा नाय! जरा थांबा मामू. माजा तुमाला अपोज हाय!''

आपल्या बोलण्यात मधून मधून इंग्रजी शब्द आणण्यासाठी हैदर नेहमी धडपडत असे आणि असलं काही तरी बोलून जात असे. आधी 'सपोर्ट'ला तो 'सपोज' म्हणत असे, आणि सपोज नि अपोज या शब्दांची अशी उलटापालट करून टाकीत असे. त्यामुळे त्याला काय म्हणायचे आहे ते अनेकदा ऐकल्यामुळे लोकांना कळून चुकलं आणि गंभीर होत गेलेल्या त्या बैठकीतली काही पोरं खदखदा हसली!

त्यांना दरडावून कासमखानांनी हैदरला विचारलं, ''काय म्हनना हाय तुजा?''

जमलेल्या मंडळीकडे तोंड करून हैदरनं आपल्या 'सुद्ध' भाषेत, अण्णाला आपण रात्री कुठं नि कसं पाहिलं ते सांगितलं. बैठक आता अधिकच गंभीर झाली.

आणि हे ऐकून अण्णा मात्र दचक्यानं काळाठिक्कर पडला! आपल्यावर सरळ सरळ असा कोणी आरोप घेईल अशी त्याला सुतरामदेखील कल्पना नसावी. हैदरचं बोलणं संपताच तो उठून उभा राहिला. संतापाने तो थरथर कापू लागला. आपल्या सवयीप्रमाणे आधी तो खोक खोक खोकला. मग बाहेर जाऊन त्याने पचकन बेडका टाकला आणि आत येऊन खोकत आणि खाकरत तो ओरडला, ''रांडेच्यांनो! माझ्यावर खोटे आळ घेता काय? रात्री मी घराबाहेर पडलो होतो खरा, पण माझ्या कामाला मी बाहेर पडलो होतो. पावट्यात रात्रीची कुणाची तरी गुरं येतात म्हणून मी शेतावर खेप टाकली होती.''

स्तब्ध झालेले लोक अण्णाचं बोलणं ऐकत होते. हैदरला यावर काही उत्तर देता आलं नाही. त्याला उत्तर देण्याची जरुरीच नव्हती. अण्णा रात्री घराबाहेर पडला होता, आपल्या शेतावर गेला होता, ही गोष्ट त्याच्याच तोंडून शाबीत झाली होती. आणि त्याच्या शेतावर जाण्याची वाट आहमद खोताच्या पेंढ्यांच्या उडवीजवळूनच जात होती.

तेवढ्यात सखारामराव उठून म्हणाले, ''पण अन्नाला शप्पत घेयास सांगावी.''

''हो. शप्पत होवंद्या. अन्नाची शप्पत होवंद्या!'' असा सगळ्या मुसलमान खोतांनी गलका केला.

ते बघून अण्णा उभ्या उभ्याच बोलला, ''सगळ्यांच्याबरोबर आग विझवायला मी पण होतो. मला बरं नव्हतं तरी मी जातीनं खपलो. त्यानं मला त्रास झाला. आज सकाळी उठवेना, म्हणून मी कुठं बाहेरही पडलो नाही. पण तुम्हाला माझाच संशय असेल तर मी शपथ घेतो. हो! कर नाही त्याला डर कशाला?''

''आम्हाला बारा गोष्टी नको सांगूस! शप्पत घे! पयल्यानं शप्पत घे!'' असं पुन्हा सगळे मुसलमान खोत ओरडले. तेव्हा अण्णानं कासमखानांच्या पुढ्यातला नारळ उचलून हातात घेतला आणि उभ्याउभ्याच तो मोठ्यानं म्हणू लागला,

''लक्ष्मीबायची शपथ घेऊन मी सांगतो की, आहमद खोताच्या उडवीला मी आग लावली नाही. जर मी आग लावली असेन आणि खोटी शपथ घेत असेन तर वर्ष, सहा महिन्यांच्या आत माझं पुरतं तळपट होऊन जाईल!''

अण्णाचं हे बोलणं ऐकून गोंधळ शांत झाला होता. अण्णाचा शब्द नि शब्द सगळ्यांना स्पष्टपणे ऐकू गेला होता.

शपथ घेऊन होताच अण्णा कासमखानांकडे वळून ''येतो मी-'' असं म्हणाला. झाल्या प्रकाराची चीड त्याच्या मुखावर दिसू लागली होती. बाहेर पडून त्यानं खुंटीवरला कंदील उचलला आणि वात मोठी करून खोकत खोकत तो घराच्या दिशेनं निघून गेला.

बैठकीत मात्र तो गेल्यावर एकच गोंधळ उडाला. आग लावली कुणी ते कळलं नाही ते नाहीच! एवढे केलेले खटाटोप फुकट गेलेले पाहून मुसलमानांपैकी काही लोकांना घुस्सा आला आणि ते कासमखानांवर उखडले. त्यांची समजूत करीत कासमखान त्यांना म्हणाले, ''आरडावरड अनी भांडनटंटा कशाला करायचा? कुनी आग लावली ती आज उद्या कवा तरी कलेलच. अन्नानं लावली असली तर त्याचा तलपट होयाला वेळ लागल काय?''

कासमखानांनी असे सांगितल्यावर त्यांच्यापुढं कोणी काही बोललं नाही. परंतु मनातून प्रत्येकाला वाटत होतं की अण्णा गुन्हेगार आहे, त्याच्याबद्दल काही तरी व्हायला पाहिजे होतं. निदान त्याला गावकीनं दंड तरी ठोकायला हवा होता. पण आता या बोलण्याचाही काही उपयोग नव्हता. सगळ्या गोष्टी महालक्ष्मीवर सोपविण्यात आल्या होत्या. वर्ष-सहा महिने तरी वाट पाहायला हवी होती. स्वत:चं असं जो तो समाधान करू लागला आणि बैठक समाप्त झाली. लोक घरोघर परतले.

पुष्कळ दिवसानंतर मग गाव शांत झाला. काही दिवस आगीचं रहस्य कळावं अशी लोकांना उत्सुकता वाटत होती. हळूहळू तीही कमी झाली. काही दिवसांनी लोक बहुतेक सारं विसरून गेले. काही दिवस जे संशयाचं वातावरण होतं तेही नष्ट झालं. आगीचा प्रसंग लोकांच्या स्मृतिआड झाला. महाडकडचे वातावरण निवळल्याच्या बातम्या आल्या, तसं गस्त घालणंही बंद झालं आणि गावातल्या लोकांचे व्यवहार सुरळीतपणे चालू लागले. व्यवहारात जोडलेली गावातली माणसं, हा मधला काळ सोडला तर, पुन्हा जोडली गेली.

आणि मग एक दिवस अण्णा मरण पावला. खोकून खोकून आणि झिजून झिजून मरण पावला. अण्णा मेल्याची बातमी कासमखानांना आहमद शफीनं सांगितली. कासमखानांनी ती शांतपणे ऐकून घेतली आणि मग एकदम त्यांना मागच्या गोष्टीचं स्मरण झालं. चटकन उसळून ते म्हणाले, ''मेलो? मला वाटलाच होता!''

आहमद शफीला त्याचं बोलणं आकलन झालं नाही. त्यानं विस्मयानं विचारलं, 'का? तो शीग होतो त्यावरना?''

कासमखान आवेशाने उत्तरले, 'छे:, छे:! शीग असलो म्हणून काय झायला? शप्पत! शप्पत नडली! म्हालक्सुमीची शप्पत घेतलान ना खोटी? तलपट व्होयाला वेल लागलो काय?''

# शेरणं

हसनखानची शादी होऊन दहा वरसं झाली, अजून त्याला अवलाद होत नव्हती. त्याच्या विसाव्या उमरीत बापानं त्याची शादी करून दिली; आणि तीन वर्षांनी हसनखानची अवलाद न बघताच तो इन्तेकाल झाला. आणि मग उरलेल्या सात वर्षांत अवलाद होण्यासाठी करायचे ते सारे उपाय हसनखान करून चुकला. बायकोला त्यानं नाना प्रकारची दवा खावविली. तिनं बिचारीनं हकिमाची पूड खाल्ली, वैद्याचं चाटण चाटलं, कैक पीर आणि वैदू लोकांचे गंडे-दोरे गळ्यात बांधले आणि एका हकिमानं दिलेली तावीजही कमरेला बांधून ठेवली. पण इतकं करूनही हसनखानला मूल झालं नाही. मग मात्र हसनखान नाराज झाला. सदानकदा दु:खीकष्टी दिसू लागला. स्वत:च्या आणि बायकोच्या कर्माला बोल लावू लागला. चारचौघांत ऊठ-बस करणं तो टाळू लागला. हिरमुसला होऊन तसबी-जपमाळ घेऊन पडवीतल्या फलाटीवर गमभीन होऊन बसू लागला.

त्याची ही हालत बघून चारचौघांना वाईट वाटे. पण उपाय कुणाच्याच हाती नव्हता. अवलाद झाल्याशिवाय हसनखान ताळ्यावर येणार नाही हे सगळ्यांनाच कळून चुकलं, तेव्हा एक दिवस गावातला रहीमखान येऊन त्याला म्हणाला, ''एक गोष्ट आता मला तुला सांगायची हाय.''

सचिंत हसनखान सावरून बसत म्हणाला, ''काय बाबा?''

''लेकरू हवा म्हणून तू किती लटपटी केल्योस! आता माजा ऐक.''

''काय?'' हसनखानने सावध चित्ताने विचारले.

''गावच्या लक्सुमीबायला अवंदा शिमग्यात शेरणा घाल. शेरणा निघू दे. अवलाद झाल्याबिगर ऱ्हायची नाय–''

हसनखाननं कुतूहलानं विचारलं, ''पन बोलू काय?''

रहीमखान उत्तरला, ''हां. बोल, हे लक्सुमीबाय, मना लेकरू होवंदे. शेरणा निघताच मी तुज्या नावावर बोकड सोडीन. अनी मूल व्हताच तुला अरपन करीन.''

''बरा!'' हसनखान उद्गारला. हातातली तसबीर त्यानं फलाटीवर ठेवली. दोन्ही हात जोडले आणि तो म्हणाला, ''हे परवरदिगार, माझी आरजू आता तरी पुरी कर!'' आणि मग आपले दोन्ही हात त्यानं तोंडावरून फिरवले. काही तरी पुटपुटत तो आपल्याशीच हसला.

त्याच वेळी शेरणं घालण्याचा बेत त्यानं पक्का केला.

महालक्ष्मी ही गावची देवी. शिमग्यात देवीच्या पालखीची मिरवणूक निघते. वाजतगाजत चिपळूणच्या बाजारात जाते. तिथं रात्रभर इतर पालख्यांबरोबर शहरभर फिरते आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा ठाणकावर परतते. याच वेळी देवीला शेरणी घालण्यात येतात. गेल्या अनेक वर्षांत कैक शेरणी देवीनं हुडकून काढली होती. अनेकांना देवी प्रसन्न झाली होती. त्यांचं मंगल तिनं केलं होतं.

शिमगा आला तसे ठाणकावर ढोल बडवले जाऊ लागले. नाच्येपोरे येऊन गावात नाचून गेले. रात्ररात्र तमाशाचे फड होऊ लागले. आणि मग एक दिवस देवीची पालखी ढोलांच्या तालात आणि सनईच्या सुरात नाचत, उडत, वाजतगाजत चिपळूणच्या बाजारात गेली.

आणि इकडे हसनखाननं रात्रीच्या काळोखात आपल्या गड्याला-विश्राम निवात्याला– बरोबर घेऊन पालखीच्या मार्गातल्या एका चोंडक्यात शेरण्याचा नारळ पुरला आणि तो मोठ्या उत्कंठेनं दुसऱ्या दिवसाची वाट बघू लागला.

रात्रीचा मुक्काम संपवून दुसऱ्या दिवशी पालखी ठाणकाकडे येण्यास निघाली आणि सायंकाळची, चारच्या सुमाराला गावच्या वेशीवर येऊन थडकली.

हसनखान तिथं उभा होता. बरोबर पुष्कळसे लोकही होते. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे ते देवीची पालखी पाहायला आले होते. पालखी पुढे पुढे येत होती. गुलाल उधळला जात होता. तेवढ्यात कुणीतरी पुढं येऊन हसनखानच्या अंगावर गुलाल उधळला. गुलालानं माखलेला हसनखान बरोबरच्या लोकांसह पालखीमागोमाग गावाकडे चालू लागला.

थोड्याच वेळात गावची शाळा लागली. पुढचा रस्ता खाचरातून नि चोंडक्यातून जात होता. पालखी रस्ता सोडून चोंडक्यात उतरली. हसनखानही मागोमाग जाऊ लागला.

दोन-तीन चोंडके ओलांडून झाले आणि एकदम काय झालं कुणास ठाऊक! पालखीला खांदा दिलेले जवान मटकन खाली बसले. ढोलांचा नाद बंद झाला. सनईचे सूर मंदावले. धडपडत ते जवान उठले. पण पालखी एकाएकी फार जड झाली! विलक्षण जड झाली. पुढं जाईना! जवान गडी पुन्हा सरसे मटकन खाली बसले. आणि मग ते एकदम उठून उभे राहिले. 'ठिच्योऽऽ बा ठिऽऽ च्योऽऽ'चा एकच गजर झाला. 'ढपाँव ढपाँव' करत ढोल ढुमढुमू लागले. पालखी एकदम वर उडाली आणि पुन्हा जवानांच्या हातावर येऊन चक्राकार घुमू लागली.

थोडा वेळ हे असं चाललं आणि मग गड्यांनी पालखी खांद्यांवर घेतली. ढोल पुन्हा पहिल्या तालात वाजू लागले. सनईचे सूर बदलले आणि त्यांच्या तालावर पालखीला घेऊन गडी संथ गतीनं साऱ्या चोंडक्यात नाचू लागले.

बरोबरच्या मंडळीत एकच बोंब उठली. कुणीतरी शेरणं पुरलं आहे. देवीला उमगलं आहे म्हणून ती पुढं जात नाही. आता शेरणं निघाल्याबिगर देवी पुढे ठाणकावर जाणार नाही.

सगळा जीव डोळ्यांत एकवटून हसनखान हे पाहत होता; ऐकत होता. देवीला ते शेरणं उमगलं आहे हे समजताच बेहोष झाल्यागत तो पालखीच्या घुमण्याकडे पाहू लागला.

सबंध चोंडक्यात झंझावाताप्रमाणे पालखी फिरत गेली. मध्येच जणू काय ती थबके आणि कुठे तरी एकदम घुसे. गड्यांवर गडी धडाधड कोसळत. अन् निराशेने सावकाश पालखी जागची उठे. ''होऽऽच्या होऽऽ'चा गजर मोठा होई. ढोलांचे आवाज द्रुतगतीनं घुमू लागत. सनयांचे सूर त्यात मिसळत. गुलाल उधळला जाई. पालखी वर्तुळाकार घुमू लागे. देवीची शांत मूर्ती गदगद हलू लागे. पुन्हा पालखी खाली खांद्यावर येऊन संथपणे डुलू लागे.

हे असं कैक घटका चाललं होतं. जमलेली मंडळी आणि हसनखानही हतबुद्ध झाला. शेरणं कुठं कुचंबलंय कुणाला कळेना आणि पालखीही शेरणं ओलांडून पुढे जाईना. नेण्याचा प्रयत्न करताच विलक्षण जड होई. जवानांचे खांदे तुटून पडत. पाय जणू भुईला चिकटून बसत.

सांज झाली. काळोख पडत चालला तरी शेरणं निघेना. पालखी नुसती साऱ्या चोंडक्यात घुमत होती आणि तिला घुमवता घुमवता जवानांच्या तोंडाला फेस येऊ लागला. खांदे मोडून पडले. पोटऱ्या वळू लागल्या. खांदा द्यायची शामत उरली नाही, असं म्हणत म्हणत जवान जवान गडी खांदा सोडून धापकन बांधावर बसून दम घालू लागले. बघता बघता रात्र पडली. कुणी तरी गॅसबत्त्या आणल्या आणि त्या उजेडात शेरणं काढायचं काम चालू राहिलं.

हे सारं बघून हसनखानाचा जीव उडून गेला. अखेरीस इतकं होऊन शेरण निघणार की नाही? त्याच्या नशिबात अवलाद आहे की नाही? त्यानं हात जोडले आणि तो आपल्याशीच पुटपुटू लागला, ''हे लक्सुमीबाय, माजा शेरणा काढ-माजा शेरणा काढ, मी तुज्या नावावर बोकड सोडीन. अवलाद झाल्याबराबर त्याला तुला अरपन करीन-''

आणि इतक्यात पालखी एकाएकी हुंदाडली. आकाशात एकदम उंच उडाली. गड्यांच्या खांद्यांवर येऊन अलगद बसली. पुन्हा ढोलांचा धडाका सुरू झाला. पुन्हा सनईचे सूर घुमू लागले. पुन्हा गुलाल उधळला गेला. पालखी स्वत:भोवतीच एकदम गरगर फिरली आणि तिचा दांडा चोंडक्यात एके ठिकाणी घुसला; पुन्हा मागे आला आणि पुन्हा अधिक वेगाने आदळला! त्या दणक्याने देवीची मूर्ती कोपायमान झाल्यागत जागच्या जागी हलू लागली. गड्यांचे खांदे विलक्षण रीतीने घसपटून निघाले. घटकाभराच्या या प्रकारानंतर, डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच एक नारळ बांधातून अलगद बाहेर पडला. 'महालक्ष्मी होऽ च्योऽऽ'चा गजर झाला! शेरणं निघालं. देवीनं शेरणं काढलं.

हसनखान बेहोषीत पुढं थांबला. पालखीपुढे जाऊन त्यानं लोटांगण घातलं. सर्वांग गुलालानं माखून घेतलं. त्या खुशीत तिथं तो जमिनीवर पडून गडबडा लोळला.

पालखी ठाणकावर पोचली तेव्हा दहा वाजले. गडीमाणसं घरोघर परतू लागली. पालखीला खांदा देऊन थकलाभागलेला विश्राम निवाते काळोखात ठेचाळत आपल्या खोपटाकडे निघाला. तेवढ्यात त्याला विसू बामनानं हाक मारली. विसूपाशी कंदील होता. विश्राम थांबला आणि विसू येताच त्याच्याबरोबर चालू लागला.

वाटेत विसूनं विचारलं, ''आज शेरणे निघायला देवीला लईसा वेळ लागला?''

''व्हय!'' विश्राम उत्तरला, 'तसा मला अंदाज होताच कुठं पुरलेलं हाय त्येचा? पण

येळेवर आठवंना. तेवढा आठवल्यापरीस देवीला येळ लागायचाच. आपन तरी काय सांगनार देवदेवतांबाबत?''

तेवढ्यात विसूचं घर आलं. तो निघून गेला आणि विश्राम काळोखात आपल्या घराकडे चालायला लागला.

या गोष्टीला पाच वर्षे होऊन गेली आहेत. हसनखाननं देवीच्या नावावर सोडलेला बोकड भारी माजला आहे. साऱ्या गावचं खाऊन माजोर झाला आहे. गावाचं निसंतान करतो आहे. देवीचा बोकड असल्यामुळे त्याला कुणी हात लावायलाही धजत नाही.

-आणि पस्तिशी उलटलेला पोक्त हसनखान आपल्या फलाटीवर बसून, कोणा आल्यागेल्याला, आपल्याला अवलाद झाली की तो बोकड देवाला 'अरपन' करण्याच्या गोष्टी सांगतोच आहे!

# बेकार (पण कलावंत) माणसाची गोष्ट

ज्या दिवशी माझ्यापाशी पैसा असतो (मग तो एक आण्यापासून एक रुपयापर्यंत असो) त्या दिवशी मी थोडाफार दु:खी होतो. हे ऐकून तुम्ही मला वेड्यात काढाल हे मला माहीत आहे. पण माझ्या दु:खाचं कारण वेगळं आहे. पैसा नाही हे गृहीत धरून मी जो माझा निष्क्रिय जीवनक्रम आखलेला असतो तो नेस्तनाबूद होतो म्हणून मला दु:ख होतं. पैसा नसूनही पैशाचं सुख भोगण्याची जी काल्पनिक तृप्ती एरवी आणता येते, ती त्या दिवसापुरती तरी नष्ट होते. खरोखर पैसा असलेल्या माणसासारखं मला त्या दिवशी वागावं लागतं. ठेवणीतले कपडे काढावे लागतात. गबाळेपणा टाकून व्यवस्थितपणा धारण करावा लागतो आणि चार बड्या लोकांच्या घरचे उंबरठे झिजवण्यासाठी बाहेर पडावं लागतं.

मग सकाळचे नऊ वाजले असताना त्या लोकांना साखरझोपेतून उठवावं लागतं. यामुळे ते अर्थातच माझ्यावर चिडतात व संतापून विचारतात, ''तुम्हाला काही काळवेळ कळते की नाही? आधी बाहेर व्हा बघू!'' मी शरमून बाहेर जाऊन उभा राहतो. काही वेळाने हे महाशय हात-तोंड धुऊन बाहेर येतात व मला आत बोलावतात.

मी बावळटपणे हसत पुन्हा आत प्रवेश करतो. आपला अपमान झाला आहे असे जे उगाचच वाटत असते ते विसरण्याचा प्रयत्न करतो. अपमानाच्या जखमेवर त्यांच्या नंतरच्या स्वागताची मलमपट्टी लावतो. एवढ्यात ते विचारतात, ''बोला. काय काम आहे?''

इथं मी खरं पाहता गोंधळतो. माझ्या कामाची त्यांना आधीच कल्पना असते. पुन्हा आठवण देण्यासाठी किंवा काम झालेलं असलं अथवा होणारं असलं तर विचारण्यासाठी म्हणून मी आलेला असतो. लाचारीच्या स्वरात मी बोलू लागतो, ''नोकरीच्या कामासाठी–''

पुढचं मला ते बोलूच देत नाहीत. हल्ली नोकऱ्या मिळणं किती कठीण झालंय ते मला रसभरित वर्णन करून ऐकवतात. 'टायपिंग येतं का? शॉर्टहँडचा क्लास तरी जॉईन करा! निदान एखादी ॲडीशनल क्वॉलिफिकेशन असली तरी बरं पडतं.' इत्यादी वाक्यांची फैर झडते. आमच्या क्वॉलिफिकेशनचा इथं उपयोग होणार नसल्यामुळे मी तिचा मुद्दामच उल्लेख करीत नाही. मग आजच्या तरुण पिढीच्या अकार्यक्षमतेवर हल्ला चढतो. 'बघू जमलं तर.' असं मोघम आश्वासन मिळतं. पुन्हा वर एक कप चहा! यापेक्षा आणखीन काय

हवं? मी खूष होतो. त्या महान माणसाविषयीच्या आदरानं माझं अंत:करण भरून येतं! आता थोड्याच दिवसांनी आपण नोकरीला लागणार असा विश्वास–वेडा विश्वास–वाटू लागतो!

आणि चालत निघालो की वाटेतच मी नोकरीला लागलेला असतो. माझ्या खिशात सारखे पैसे खुळखुळत असतात. शनिवारी दुपारी ऑफीस सुटल्यावर मी तडक घरी न येता एखादं इंग्लिश पिक्चर पाहायला जातो. मी एकटा नव्हे. मी व माझी मित्रमंडळी! त्यांची तिकिटंदेखील मीच काढलेली असतात. आणि एव्हाना माझं लग्नदेखील झालेलं असतं. माझी बायको मोठ्या उत्कंठतेनं माझी वाट पाहत असल्याची आठवण येऊन पिक्चर संपल्यावर घाईनं मी घरी येतो. ती दारातच उभी असते. मला पाहताच ती मला सांगते, ''तुमची कथा त्या ★★★ मासिकानं स्वीकारल्याचं पत्र आलंय हं.'' मी उत्तरतो! मी उत्तरतो!...

छे: मी काहीच उत्तरत नाही! मोटारीच्या कर्णकर्कश कर्ण्यानं मी दचकून भानावर येतो. रस्त्याच्या कडेला होतो. आता कुठं जायचं या विचारात पडतो. तोच एम्प्लॉयमेंट एक्सचेंजला जाण्याची आठवण येते. तिथं जाऊन माझं रजिस्ट्रेशन कार्ड रिन्यू करून घेतो. उगाचच दुसऱ्या खोलीत डोकावण्यासाठी धडपडतो. नोकरीची एखादी ऑर्डर आलेली असेल तर आपला नंबर लागेल अशी आशा वाटू लागते, म्हणून अधिक पुढं घुसण्याचा यत्न करतो. पण एवढ्यात तेथल्या पट्टेवाल्याचं लक्ष माझ्याकडे वेधतं. तो येऊन मला बाहेर हुसकून लावतो. तिरमिरी येऊन मी बाहेर कोलमडतो. मनाला एक विचित्र उद्वेग वाटू लागतो. पण एवढी सहनशीलता धारण करायलाच हवी असं वाटू लागतं. त्यानं कमरेत लाथ का घातली नाही याचं आश्चर्य वाटतं. त्याबद्दल मनातल्या मनात समाधान मानून मी बाहेर पडतो.

मग पुन्हा एका बड्या माणसाची आठवण येते! अ० रझाक बोहरी या बड्या असामीची. धावपळ करीत त्याच्या बंगल्यावर थडकतो. बंगल्यात खाली पेढी नि वर त्याचे निवासस्थान आहे. मी खालीच थांबतो. रझाकसाहेब जेवायला वर गेलेले असतात. नेमकी याच वेळी मला भूक लागली असल्याची जाणीव होते. हात खिशात जातो. पण त्यात फक्त पाचसात आणे शिल्लक उरलेले असल्यानं पुन्हा निराशेनं बाहेर येतो. वाटतं, समोरच्या हॉटेलात चहा-पाव खाऊन यावं. पण एवढ्यात त्यांचा गडी येऊन सांगतो, ''शेठनी तुम्हाला वर बोलावलं आहे.''

कसल्या तरी अपेक्षेनं मी वर जातो. दारातून डोकावतो. रझाकसाहेब दिवाणखान्यात जेवायला बसलेले असतात. मला पाहून म्हणतात, ''अरे आव, अंदर आव.'' मी संकोचानं आत जातो. तिथल्या खुर्चीवर अवघडून बसतो. मग भुकेनं वखवखलेल्या नजरेनं शेठजींच्या ताटातल्या पदार्थांकडे पाहतो. मुरगी-चावल, पुलाव, कबाब, कटलेस...असल्या नमुनेदार पदार्थांवरून माझी दृष्टी सरकत अखेर शेठजींच्या जबड्यावर स्थिर होते. त्यांच्या हाताच्या हालचालींनी पुन्हा अस्थिर होते. त्या हालचालीबरहुकूम जबड्यापासून ताटापर्यंत लंबकाप्रमाणं हलू लागते!

ते जेवता जेवता म्हणतात, ''खानेको आव.''

मी उत्तरतो, ''बिसमिल्ला, आप खाइये.''

ते पुन्हा आग्रह करतील असं मला वाटतं. त्या अपेक्षेनं मी त्यांच्याकडे पाहतो. पण ते पुन्हा आग्रह करण्याच्या फंदात पडत नाहीत. आपले खातच राहतात. या गृहस्थांना जेवल्याबरोबर चहा घेण्याची सवय असल्यानं आपल्याला आता फक्त चहाच मिळणार हे एव्हाना मला कळून चुकलेलं असतं. मग मी ते कसं जेवतात हेच पाहत राहतो आणि त्यांच्या मुखावरील तृप्ती न्याहाळता न्याहाळता मला माझंच पोट भरल्यासारखं वाटू लागतं. त्यांच्या मुखावरील तृप्ती मला तृप्त करते. अतृप्त तृप्तीनं मी समाधान पावतो!

काही वेळानं त्यांची मुलगी (वय वर्षे अदमासे अठरा) चहाचे दोन कप घेऊन येते. तिनं काही खायला आणलं असेल असं वाटतं, तेही व्यर्थच ठरतं. एका हातानं चहाचा कप घेत दुसऱ्या हातानं मी माझी कथा असलेल्या मासिकाचा अंक तिच्या पुढं करतो. तिला जेमतेम का होईना, मराठी वाचता येत असल्यामुळे ती भराभर माझी कथा आणि नाव वाचते. मग हलकेच आपल्या डोकीवरील पदर मागं सारीत मला विचारते, ''तुम्ही एवढं हे मराठीत कसं हो लिहिता?''

'हातानं!' असं उत्तर माझ्या ओठावर आलेलं असतं. पण तिच्या मुखावर माझ्याबद्दल चमकत असलेला अभिमान मला तसं उत्तर देऊ देत नाही. मोठ्या प्रयासानं मी ते दाबून दुसरं काहीतरी देतो. तिच्याकडे पाहत राहतो. शेठजी खाकरतात तसा दचकतो. तीही दचकते अन् अंक टाकून आत पळते!

मग मी मूळ विषयाला हात घालतो. नोकरीसाठी त्यांची विनवणी करू लागतो. ''कुठंही द्या. कसलीही द्या. मात्र जास्त त्रासाची नको. माझी ही प्रकृती अशी म्हणून!'' अशा प्रकारे बराच वेळ आळवणी केल्यावर ते सावकाश उत्तर देतात, ''आजकाल आपल्या लोकांना (म्हणजे मुसलमानांना) नोकऱ्या मिळणं फारच कठीण झालंय. सगळीकडे आपले दुष्मन भरलेले आहेत. शब्द तरी कुणाला टाकायचा?''

मी अडखळत म्हणतो, ''पूर्वीचं मुसलमानांचं परसेंटेज होतं ते आता कमी झालंय फाळणीनंतर. त्यामुळे...''

''गप्प बसा तुम्ही!'' ते माझ्यावर खेकसून म्हणतात, ''तुम्ही लोकांनीच सगळी घाण केली आहे. त्यांच्यात नाचता, त्यांच्या जबानमध्ये लिहिता. मग ते का नाही दाद घेत तुमची?''

'ते गेले झक मारीत! तुम्ही आमचे म्हणवता तर तुम्ही घ्या ना आमची दाद!' असं मी मनातल्या मनात म्हणतो आणि मग त्यांच्याशी बोलतो, ''अहो, पण सगळीकडेच मंदी आली आहे. उद्योगधंदे चालत नाहीत पूर्वीसारखे!''

''का मंदी आली आहे?'' ते मला सवाल टाकतात. ''पाकिस्तानात बघ. तिथं माझी बरान्च कशी झक्क चाललीय!''

मला अर्थकारण कळत नसल्यामुळे त्यांच्या मंदीच्या सवालाला मी उत्तर देऊ शकत

नाही. पण पाकिस्तानची हालत दिवसेंदिवस बिकट होत असूनही त्यांचा लुंग्यांचा धंदा तिथं बरकतीत चालावा यात नवल नाही, एवढं अर्थशास्त्र मला कळतं. वाटतं, त्यांना देऊ का उत्तर, 'मग जा ना आपलं चंबुगबाळं आटोपून पाकिस्तानात आणि इथला धंदा माझ्या हवाली करा.' पण मला कुठलं असं उत्तर देणं जमायला? आणि पुन्हा विचार येतो, 'ते चिडून खरोखरीच गेले म्हणजे? एवढा व्याप, एवढा पैसा! माझ्याच्यानं काय होणार? तो कोण संभाळणार? मला आपली एकशे-वीस रुपयांची नोकरी पुरे!' हे सगळे सुविचार माझ्या डोक्यात आल्यामुळे मी त्यांना म्हणतो, ''दुसऱ्या कुठं नाही तर नाही, पण तुमचे एवढे धंदे चाललेत, त्यात काही द्या ना काम?''

ते तिरस्काराच्या स्वरात मला विचारतात, ''तुमच्यानं काय होणार आहे काम? एकदा माणूस हे असं लिहायला लागलं की फुकट गेलंच म्हणून समजा. आमच्या धंद्याची आम्हाला ट्रॅजेडी करून घ्यायची नाही!'' आणि ते मोठमोठ्याने हसू लागतात.

मला ते ऐकू येत असतं. आणि तरीही त्यांच्या छोकरीच्या घरातल्या विलोभनीय हालचालींकडे मी पाहत असतो. आणि एकदम माझं मन हलकेच पुटपुटू लागतं, 'ही छोकरी तर तुझ्यावर फिदा झालेली आहे. तिच्या हालचाली बघ कशा तुझं लक्ष वेधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत! तिच्या रूपानं तुझं नशीब आज तुला साद घालीत आहे. मग बिचकतोस कशाला? दिरंगाई कसली? उचल तिला! पळव! उडव! काय हवं ते कर? रझाक साहेबांच्या अफाट संपत्तीचा वारस होण्याची ही आयती चालून आलेली संधी आहे. मग का दवडतोयस? निदान नशिबाचा हा डाव खेळायला तरी काय हरकत आहे? लागला लग्गा तर ठीक; नाही तर मग आहेच नेहमीचं वणवण भटकणं...'

पण माझं दुसरं मन त्याला उत्तर देतं, 'मूर्खच आहेस! अरे, ती कुठं, तू कुठं? ही सगाई तुला सहजासहजी पचनी पडेल काय? का उगाच नसत्या फंदात पडतोयस बाबा? तुला काही इज्जत, अब्रू आहे का नाही? लेखक म्हणून तुला थोडीफार कीर्ती मिळत आहे. एका प्रतिष्ठित घराण्यातला तू युवक आहेस. तुला ही पळवापळवी शोभेल काय? बेहत्तर आहे हालात दिवस काढावे लागले तरी!'

दोन मनांच्या या सुंदोपसुंदीकडे मी लक्षच देत नाही आणि देतो तेव्हा दुसऱ्याचीच बाजू मला पटू लागते. मी सभ्य असल्याची मला जाणीव होते आणि सगळेच सभ्य लोक लाचारीतदेखील आपला सभ्यपणा सोडीत नसल्यानं त्या लाचारीला म्हणजेच पर्यायानं सभ्यतेला मी चिकटून राहण्याचा निर्णय घेतो. शेठजींच्या छोकरीच्या हालचालींकडे सभ्यपणे कानाडोळा करतो. एवढ्यात ते उठून जायला निघतात आणि मीही माझ्या नोकरीचा प्रश्न तसाच अर्धवट टाकून चालायला लागतो.

एव्हाना दुपार टळलेली असते. भुकेनं माझा जीव जायला आलेला असतो. विलक्षण थकवा वाटू लागतो. मग वाटतं, महंमदकडेच जावं. महंमद माझा मित्र. एका शेठजींचा छोकरा! त्याच्याकडे अंधेरीला येतो. पण तो कुठं बाहेर गेलेला असतो. मी बसतो. एकदा मध्येच त्याच्या सैंपाकघरात उगाचच चक्कर टाकतो.

काही वेळानं महंमद येतो. त्याचा आचारी दोन कप चहा घेऊन येतो. तो चहा बघून मला मळमळल्यासारखं वाटतं. महंमदला मग दिवसाचा रिपोर्ट सांगतो. तो जेवायला थांबण्याचा आग्रह करतो. जेवायचं म्हणजे आणखी दोन तास थांबायला हवं. ते शक्य नसतं. मी घरी परततो.

दिवे लुकलुकत असतात. थोरला भाऊ कामावरून परत आलेला असतो. त्याच्या नजरेला न येईल अशा बेतानं घरात शिरतो. कपडे बदलतो. म्हातारी चुलती विचारते, ''काय रे? झालं काम?'' मी मानेनंच 'नाही' म्हणून उत्तर देतो.

मग आम्ही सगळे जेवायला बसतो. जेवताना थोरला भाऊ विचारतो, ''नाही ना जमत?'' मी उत्तरतो, ''नाही.'' मान खाली घालतो. जेवायला लागतो-पण का कुणास ठाऊक, घास घशातल्या घशात अडखळू लागतो. अन्नाची चव विचित्र वाटू लागते. एक तीव्र हुंदका येतो. मोठ्या प्रयासानं मी तो दाबतो. पण माझं मन अनावर होतं. कसेबसे दोन घास खाऊन उठतो. हात धुतो. त्या पाण्यात डोळ्यांतलं पाणी मिसळून जातं.

खिशातला पैसा संपलेला असतो. दुसऱ्या दिवसापासून निष्क्रिय दिनक्रम सुरू होतो. घरातच बसून राहायचं. आळशासारखं लोळायचं. जेवायच्या वेळी सगळ्यांच्या आधी हजर व्हायचं आणि मन लागलं की देहभान विसरून लिहू लागायचं!

मग रविवार येतो. रविवारचं अगत्य मला नाही. माझा प्रत्येक दिवस हा रविवारच असतो. पण त्या दिवशी चार लोक घरी असतात. वेळ बरा जातो. त्यांचे रेल्वेपास वापरायला मिळतात. भटकता येतं.

म्हणून मी रविवारी फिरायला जाणंच पसंत करतो. असेल त्या वेशात सरळ गाडीत जाऊन बसतो. एकदा वाटतं जुहूला जावं. पण स्टेशनपासून पुढं बसनं जायला पैसा नसतो आणि माझा वेषही तिथं जायला तितकासा धड नसतो. म्हणून मी चौपाटीवरच जातो.

चौपाटी माणसांनी फुललेलीच असते. आपल्या अंगावर समाजातल्या सगळ्या थरांना खेळवीत असते. भेळवाले आणि काळाबाजारवाले, वाळकेश्वरवाले आणि गिरणगाववाले, मुंबईवाले आणि सबर्बनवाले! अठरापगड जाती तिथं गोळा झालेल्या असतात. रंगीबेरंगी पाखरं भिरभिरू लागतात. मादक वातावरण निर्माण होतं आणि विचित्र मन:स्थितीत मी ते सगळं पाहू शकतो–फुकट पाहू शकतो!

इतक्यात मला मारलेली हाक ऐकू येते. ''हमीद-ए-हमीद!'' मी दचकून मागं पाहतो आणि निश्चिंत होतो. मेघा हाक मारीत असते. तिच्याबरोबर तिची छोटी चुलत बहीणही असते. दोघी येऊन माझ्या शेजारी बसतात.

मेघा माझी वर्गमैत्रीण. दोन वर्षांपूर्वी आम्ही एकत्र शाळेत होतो. पण मध्यंतरीच्या तिच्या अस्तित्वाची मला काहीच कल्पना नव्हती. डिसेंबर महिन्याच्या एका दिवशी तारापोरवाला ॲक्विरियममध्ये मला ती अवचित भेटली. आजच्यासारखी तिनं हाक मारली आणि आजच्यासारखाच तेव्हा मी दचकलो होतो. तिच्या हातात डिसेंबर महिन्याचा माझी कथा

असलेला एका मासिकाचा अंक होता. 'नाही तरी तुझा पत्ता या संपादकाकडून काढणारच होते. आणि कितीरे अश्लील लिहितोस?' तिनं मला स्पष्ट सुनावलं होतं!

त्या आठवणीतून मी भानावर येतो. तिच्याशी बोलू लागतो. ''तुला हल्ली ऐकायला येत नाही काय? कित्ती वेळ हाका मारीत होते? अन् असा एकदम दचकतोस काय?'' ती मला म्हणते. मी उत्तरतो, ''त्याचं असं आहे. ओळखीचं कोणी भेटू नये अशी इच्छा असते. त्यांना चहा द्यायला माझ्यापाशी पैसा नसतो; बरे, भेटल्यावर त्याला चहाचा आग्रह न करता पुढे सटकलो की माझी मलाच रुखरुख लागून राहते.''

''हं!'' ती एक उसासा टाकते. मग आपली चिमुकली पर्स उघडते आणि एकेक रुपयाच्या पाच कोऱ्या करकरीत नोटा काढून माझ्यापुढं करते. मी म्हणतो, ''राहू दे.''

ती केविलवाणा चेहरा करून म्हणते, ''घे ना!''

''मला नकोत. खरंच नकोत.''

''असं काय? घे ना. बघ!''

माझा नाइलाज होतो. ते पैसे मी मुकाट्यानं घेतो आणि खिशात टाकतो. तिचे पैसे घेऊ नयेत ही तीव्र इच्छा असते. पण माझ्या परिस्थितीमुळे ती कधीच सफल होत नाही. महंमदही मला पाच रुपये देतो. लेखनाचा पैसा अद्याप कोणीच देत नाही!...

काल एक तारीख होती. मला मग आठवण येते. मेघाचा पगार झालेला असणार. घरी भिक्षुक बाप आहे. त्याला तिला ठरावीक पैसे पाठवावे लागतात. इथं चुलत्याकडे राहते. पण तो पैसेवाला असूनही एवढा कंजूष आहे की, जेवणाचेदेखील पैसे तिच्याकडून घेतो. बाकीचे पैसे तिला खर्च होतात; म्हणजे कॉलेजच्या टर्म्सकरता आणि थोडे स्वत:ला. त्यातही माझा पाचाचा वाटा!...

''आपल्यापैकी कोणीच सुखी नाही हे बघून खरंच मला दु:ख होतं.'' मी म्हणू लागतो, ''महंमदलादेखील कॉलेज सोडावं लागणारसं दिसतंय!''

''परमेश्वराची इच्छा!'' ती हताशपणे उद्गारते.

मी उसळतो, पण तिला काहीच बोलता येत नाही. 'जाऊ दे' एवढंच पुटपुटतो. माझी नास्तिक मतं तिला माहीत आहेत. पण एका चित्पावनाच्या त्या मुलीवर झालेले संस्कार एवढे प्रबळ आहेत की त्या वादात ती माझ्यावरच संतापते!

''तुझी प्रकृती कशी आहे?'' ती मला विचारते.

''काय धाड भरलीय मला?'' मी म्हणतो, ''तुझं कॉलेज कसं चाललंय?''

''यंदाचं अखेरचंच वर्ष बाबा! मी कॉलेज सोडतेय.''

तिचं कॉलेज सोडण्याचं कारण मला माहीत आहे. पैसा नाही, नोकरी अन् कॉलेज असे श्रम तिला झेपत नाहीत म्हणून तिनं हा निर्णय घेतला आहे. मीही यावर अधिक बोलत नाही. कोपऱ्यावरील इराण्याच्या हॉटेलात तिथून उठून जातो. पावडरचा चहा गटागटा पितो. एका सिनेमाचा पास मिळाल्याची मला आठवण येते. मी मेघाला सांगतो, ''तुला सिनेमाला जायचं होतं ना? माझा पास घे हवा तर.''

तिची धाकटी चुलत बहीण मध्येच बोलते, ''बेबीताईनी सीऽनीमा बघितला बरं काऽ!'

''होऽय काऽ?'' मीही तिला वेडावतो. पण तेवढ्यावरच गप्प बसणारी ती मुलगी नव्हे! हातवारे करीत ती पुढं विचारते, ''काहो हमीदभाई? तुमची दाऽढी का वाढली आहे? पैशे नाऽयत होऽय?'

मला संताप येतो. ''मूर्ख आहेस!'' मी ओरडतो. पण मेघा मला आवरते, 'गप रे! नाही तर उगाच गळ्यात यायचं...''

अंधार पडायच्या आधी आम्ही उठतो. त्या गिरगावात जातात. मी जोगेश्वरीला परततो.

मेघानं दिलेले पैसे संपायला वेळ लागत नाही. फारतर दहा-बारा दिवसच निघतात. पुन्हा निष्क्रिय दिनक्रमाचं चक्र सुरू होतं. आणि तेच खरं सुखकारक ठरतं. कुठं जायला-यायला नको. कुणाला भेटायला नको. लाथा आणि शिव्या खायला नकोत. कोणी आगंतुकपणे भेटण्याची धास्ती करायला नको.

आणि अगदीच बसणं असह्य वाटू लागलं की, थोरल्या भावाजवळ पैसे मागण्याचा मी बेत करू लागतो. तो पक्का ठरायला दोन दिवस जातात आणि मागण्याइतपत मानसिक तयारी व्हायला आणखीन दोन दिवस! अशा रीतीनं चार दिवसांनी मी मागतो, ''मला दोन रुपये हवेत.''

तो काही न बोलता पाचाची नोट पुढं करतो. मी भकास मुद्रा करून बावळट हसतो आणि तिथून उठतो...

मग दिनचक्र बदलतं. पुन्हा एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज! अ० रझाक बोहऱ्याचं सुंदर निवासस्थान! त्याची तिरस्कारपूर्ण दृष्टी आणि त्याच्या पोरीची प्रेमार्त नजर! आणि दोघांची दृष्टी चुकवण्याचा माझ्या दृष्टीचा विचित्र लपंडाव सुरू होतो. त्याच्या शिव्या आणि तिचं लाघवी बोलणं सारख्याच मन:स्थितीत मी ऐकून घेतो.

महंमद मग एखादं पिक्चर दाखवतो. त्यातले ते उत्तान प्रणयप्रसंग पाहून माझं डोकं फिरू लागतं. मी मध्येच त्याला म्हणतो, ''पुरे झालं, चल घरी जाऊ!''

तो माझ्यावर उखडतो. ''तुझं आताशा मन ताळ्यावर नाही. तुला होतंय तरी काय?''

''काही नाही! या जीवनात काहीच अर्थ नाही असं मला वाटू लागलंय!''

''गाढव आहेस!'' तो म्हणतो, ''तुझ्यासारख्या माणसाला ही असली विफलता शोभत नाही!''

''जिंदगी तल्ख हुवी! जीनेसे बेजार हुवे!'' मी मध्येच कुठल्या तरी गाण्याचा चरण झोकून देतो!

''अरे! सगळ्यांचंच जीवन असं भग्न झालेलं आहे! आपण सारेच एका संक्रमणकाळाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. जुनी श्रद्धा पार धुळीस मिळाली आहे. विलक्षण गंभीर आर्थिक परिस्थितीनं सगळीच गांगरून गेली आहेत. एक विचित्र, भयानक पोकळी अवघ्या जीवनात निर्माण झाली आहे. अशा वेळी समाजाला, राष्ट्राला, नवीन श्रद्धा, नवा धीर

तुम्ही द्यायचा! तुमच्या लेखणीनं! तुमच्या कलेनं! ते सोडून, तुम्हीच रखडत बसता हे आश्चर्य आहे!''

महंमद ज्वलंत आशावादाचा नमुना आहे. मला त्याचं म्हणणं कळतं. मी त्याला समजावून देण्याचा प्रयत्न करतो आहे.

मेघाही भेटतेच आहे. एकदा चौपाटीवर मला भेळ खायचा तिनं आग्रह केला. भेळ, भजी असलं मी खात नाही. क्षयासारख्या चिवट रोगाबरोबर सामना देताना असल्या पथ्याची आयुधं बाळगायला हवीतच. पण ती म्हणते, ''तुझ्या लिहायच्या रोगाला हे फार चांगलं टॉनिक आहे हं! थोडंसं खा म्हणजे लिहायला बघ कशी स्फूर्ती येईल ती!''

''मला माझी प्रकृती संभाळायला हवी. एका रोगाचं जे टॉनिक तेच दुसऱ्या रोगाचं पथ्य आहे, त्याला काय करू?''

तिच्या आग्रहाखातर थोडी भेळ खातो. ती हसून विचारते, ''हा लिहायचा रोग तुला आधी लागला की क्षय आधी झाला?''

''कुणास ठाऊक? साहित्याचा रोग लागल्यावर क्षय झाला असेल किंवा क्षय झाल्यामुळेदेखील साहित्याचा रोग लागला असेल! बाकी या दोन रोगांचा एकमेकांशी दाट संबंध आहे खरा! तरी बेहत्तर, आणखीन एक रोग अद्याप लागलेला नाही म्हणून! चौपाटीवरील भेळीशी त्याचा दाट संबंध!''

माझ्या बोलण्यावर ती तोंड भरून हसते आणि एकदम दचकते. कोणीतरी ओळखीचा माणूस अचानक प्रकटतो. ती सावरून त्या माणसाचं स्वागत करते. माझी ओळख करून देते. लेखक–उदयोन्मुख लेखक म्हणून! तो नाक मुरडून विचारतो, ''काय करता?''

मी काळवंडून जातो. मेघाच मग मला सावरते, त्याला आर्जवानं म्हणते, ''यांच्यासाठी कुठं काम बघा ना.''

तो उपेक्षेने हसून उत्तरतो, ''यांना काय करायचं आहे काम? बसायचं आणि लिहायचं! घरबसल्या पैसा कमवायचा. बरंय येतो. नमस्कार!'' आणि तो निघून जातो. गर्दीत अदृश्य होतो.

मेघा मला सांगत असते, ''हे आपल्याकडचे जोशी. मुंबईत यांचे चार बंगले आहेत. बडी असामी आहे हो!''

एवढा वेळ आवरून धरलेला माझा संताप अनावर होतो. उसळून येतो. मी देहभान विसरतो. सभोवतालची माणसं जणू नाहीशी होतात. शेजारची मेघाही अदृश्य होते आणि जोरजोरात ओरडतो, ''आग लाव त्या चार बंगल्यांना! आम्हाला नको काही काम! नको पैसा! आम्ही उपाशी राहू, आमच्या इच्छा-आकांक्षा मारून जगू, पण जगू! महंमद म्हणतो ते खरं! यापुढं नुसते जगणार नाही! इतरांनाही कसं जगायचं ते शिकवू. तुम्ही राहा ऐषआरामात. दौलत कमवा! जग खरेदी करा! पण पुढं काय? पृथ्वीवरचे चार तुकडे तुमच्या मालकीचे असतील! पण हे अवघं विश्व आमचं आहे. त्यातल्या त्या चमकणाऱ्या दूरदूरच्या चांदण्या अन् तारे हे आमच्या प्रतिभेचे खेळ आहेत. अनंत काणेकरांनी कुणालासं उत्तर दिलं

होतं, 'आम्ही सुखदु:खांचे कारखानदार आहोत!' तेच खरं! आम्ही तुमच्या सुखदु:खांचे कारखानदार आहोत! होय! सुखदु:खांचे कारखानदार!!''

मेघा हलवते तेव्हा मी भानावर येतो. सभोवतालची चार माणसं माझ्याकडे टक लावून पाहत असतात. मी शरमतो. मेघा हळूच पुटपुटते, ''मला लाजल्यासारखं झालं. हा मध्येच झटका कुठनं आला तुला?''

''भेळ खाल्ल्याचा परिणाम!'' मी हसून उत्तरतो, ''आमच्या महंमद पैगंबरला जेव्हा ईश्वरी संदेश येत तेव्हा म्हणे असाच बेशुद्धीचा झटका येई. परमेश्वर त्याच्या तोंडून कुराण वदवी! इतर लोक ते मग काळजीपूर्वक टिपून घेत. मी आता जे बडबडलो ते तू लिहून नाही घ्यायचं?''

ती मोठ्यानं हसते, मग मी कडवट स्वरात तिला विचारतो, ''तू काय म्हणालीस मघाशी? तुला लाज वाटली, नाही का! पण मी असाच वागणार! माझ्या दुर्दशेला कंटाळून कित्येकांनी माझी संगत सोडली. आता तुम्ही दोघं-तिघं राहिलात. तुम्हीही मला नाही हाक मारलीत तरी हरकत नाही. मी एकटा राहीन. एकाकी या परिस्थितीशी लढेन!''

तिला ते ऐकून अत्यंत वाईट वाटतं. मला ती समजावण्याचा प्रयत्न करते, ''असं काय बोलतोस? तुझ्याविषयी मला आदर वाटतो. अभिमान वाटतो. माझ्या वर्गातला तू! माझ्या गावचा! तू मोठं व्हावंस! खूप मोठं व्हावंस! मोठ्ठा लेखक व्हावास असं वाटतं. तुला खोटं वाटतं माझं म्हणणं?'' आणि तिचं बोलणं संपल्यावर मी जेव्हा तिच्याकडे पाहतो तेव्हा तिचे डोळे पाण्यानं तरारलेले मला दिसतात.

मेघा फारच हळवी आहे. पण माझी वर्गमैत्रीण आहे. तिचा स्वभाव आता माझ्या अंगवळणी पडला आहे. हा दोष सोडला तर तिच्या गुणांना मोल नाही. तिचं भलं होवो, असं मी मन:पूर्वक इच्छितो.

मी तिची मग समजूत घालू लागतो. माझा आवाज चढू लागतो आणि ती माझं म्हणणं लक्षपूर्वक ऐकू लागते, ''कधी कधी मला ही नामुष्की सहन होत नाही मेघा, मग मी चिडतो. आतल्या आत धुमसू लागतो. मनात नाना विचार येतात आणि त्यांनी पेटून निघतो. स्वत:च्या दुबळ्या मनोवृत्तीची लाज वाटू लागते. अग, काय आपला हा मध्यमवर्गाचा अध:पात! एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजच्या पट्टेवाल्यानंदेखील आम्हाला दरडवावं आणि आम्ही मुकाट्यानं बाजूस सरावं! त्या पट्टेवाल्यावरही कदाचित अशी अवस्था येईल याची त्याला जाणीव देऊ नये? आमच्यावरील अन्यायाची आम्हाला अगदीच कशी ग चाड नाही? कशाला आमचे हे लोक राज्य करताहेत? राष्ट्रातली कर्तृत्ववान पिढी अशी विफलतेनं भारावली गेली आहे. तिला कार्यप्रवृत्त करण्याचं ज्यांना त्राण नाही ते राज्य करायला नालायक आहेत! पण आम्ही स्वस्थ का? आम्ही जनजागृती का करीत नाही? समाजाला आशा, धीर का देत नाही? आम्ही कलावंत ना? केवढी प्रचंड जबाबदारी आहे आमच्यावर? विफलतेने ग्रासलेल्या हजारो लोकांच्या कर्तृत्वाचा साठा झाला, आमच्या ज्वलंत साहित्याचं सरपण त्याला मिळालं तर केवढा प्रचंड स्फोट होईल! प्रचलित समाजव्यवस्था कोसळून पडेल. नवी...नवी...

समाजव्यवस्था निर्माण होईल! नवी समाजव्यवस्था!...''

मला बोलता बोलता दम लागतो आणि थांबून मी मेघाकडे पाहतो. तिला विचारतो, ''तुला आता लाजल्यासारखं झालं काय?''

ती खुदकन हसते अन् म्हणते, ''छे: तू असा बोलू लागल्यावर मी भारावून जाते. मला ऐकत राहावंसं वाटतं. पण काय रे, मोठ्ठा झाल्यावर तुला माझी आठवण राहील?''

ती असं बोलली की मला भडभडून येतं. जी ठरावीक माणसं आज माझ्या सान्निध्यात आहेत, त्यांना मी कधीतरी विसरणं शक्य आहे काय? पण ही पुढचं कशाला बोलते आहे? कशाला स्वप्नाचे इमले उभे करीत आहे?

मी 'चुकचुक' करतो! तिला म्हणतो, ''Trust no future however pleasant! कशाला उगाच शब्द उधळतेस!''

तिला ते पटतं, अंधार पडू लागलेला असतो. आम्ही उठतो. एकमेकांचा निरोप घेतो.

काळाचा ओघ विलक्षण वेगानं सरत असतो. ऋतुचक्राचा फेरा फिरतो आणि त्याच्या दात्याला अडकलेलं दिनचक्र फिरू लागतं. ते पूर्वीचे दिवस सरतात, स्मृतिरूप होतात. पावसाळा येतो. थंडगार हवा! थबथबणाऱ्या पागोळ्या! जीर्ण काळोखे दिवस! उदासवाण्या भेसूर रात्री! विमनस्क संध्याकाळच्या भिववत्या सावल्या...

माझ्याजवळ छत्री नसते. मी सहसा बाहेरही पडत नाही. जुना रेनकोट काढतो. पण त्याचं कापड ठिकठिकाणी फाटलेलं असतं. एकदा घालून गेलो तर पाण्यानं भिजून त्याला कसलीशी घाण येऊ लागली. मी तो वापरणं सोडून दिलं. बाकी मुंबईचा पाऊस दिलदार खरा! उगाच सारखा कुणाला त्रास देत नाही. कधी फोर्टमध्ये गेलो असताना पाऊस आलाच तर मेघाच्या ऑफीसचा आश्रय घेतो. तिच्याच चिमुकल्या छत्रीत सायंकाळचा चर्चगेटपर्यंत येतो.

घरी येईपर्यंत कपडे ओलेचिंब झालेले असतात. रात्री अंथरुणावर पडलो की, छातीत विलक्षण कळा मारू लागतात. क्षयासारखा रोग उलटणार तर नाही ना या कल्पनेनं धास्तावतो. कावून जातो. उपडा होतो. छातीवर हात दाबून धरतो आणि तशाच अवस्थेत कधीतरी झोपी जातो...

दिवस पुन्हा बदलले आहेत. नुकताच प्रताप नावाचा एक मित्र भेटला. फारा दिवसांनी आमची भेट झाली. म्हणाला, ''मला जरा शॉपिंगला जायचंय. थोडं कापड खरेदी करायचंय!'' माझ्या अंगातल्या फाटक्या शर्टकडे एकवार दृष्टी टाकून मी उठून त्याचेबरोबर जातो. तो कापड घेत असताना मी म्हणतो, ''मलाही घ्यायचं होतं चार शर्टांचं कापड! पैसे आणायला पण विसरलो!''

तो म्हणतो, ''मग घे ना. मी देतो आता. मागाहून दे मला!''

''अच्छा!'' मी म्हणतो. कापड महंमदच्या शिंप्याजवळ देतो. महंमदच्या बिलात बिल तयार होतं. पेढीवरून शिलाईचं बिल भरलं जातं. त्याला निदान एवढी सोय आहे हे नशीब!

त्यामुळे आमचीदेखील अशी सोय होते!...

दोन कथा आणखीन प्रसिद्ध होताहेत. मोबदला नाहीच. आमच्यासारख्यांची अपेक्षाच वेडेपणाची. एका मासिकात काम मिळण्यासाठीही धडपडलो. जमलं नाही!...

हल्ली कुठं जावं-यावंसंदेखील वाटत नाही. कुठं बसायला, गप्पा मारायलादेखील जात नाही!...

शेजारचा सदानंद खिशातल्या चार आण्यांचा खुळखुळाट ऐकून म्हणतो, ''आज बरेच पैसे खुळखुळताहेत!''

चार आणे काढून दाखवल्यावर मी म्हणतो, ''आज कुठले पैसे बाबा? आज तर वीस तारीख!''

तो उपहासानं हसून विचारतो, ''तारखेशी तुमचा काय संबंध?''

''आमचा नाहीच! तो कधी काळी येईल असंदेखील आता वाटत नाही. पण ज्यांचा आहे, त्यांच्याशी आमचा संबंध आहे ना?''

मेघाची पहिली तारीख! प्रतापच्या वडिलांची तीनशे रुपयांची मनीऑर्डर! महंमदचे पाच रुपये! चौपाटीवरची भेळ अन् भजी! अंधेरीची चिक्की अन् केळी! रझाकसाहेबांच्या शिव्या अन् त्यांच्या छोकरीची दर्दभरी साद...भेडसावणारा भयाण भविष्यकाळ! पुढं काय? खरंच, पुढं काय...

पुढं काय व्हायचं असेल ते होवो! आता तर मी चर्चगेट स्टेशनच्या बाहेरच्या आवारात उभा आहे. माणसांच्या लाटांवर लाटा स्टेशनात येऊन थडकत आहेत, गाड्यांत विरून जात आहेत. माझी दाढी अन् केस भरमसाट वाढले आहेत. मनातून हा वर्षभराचा चित्रपट सरकत आहे. आणि एका विवंचनेनं या क्षणी मला बेजार केलं आहे. माझ्या खिशात पैसा नाही. घरी कसं जायचं? निदान या चर्चगेट स्टेशनातल्या बंदिस्त दरवाजातून आत घुसण्यासाठी काय करावं? घुसावं का असंच आत? की एक आण्याचं मरीन लाइन्सचं तिकीट काढावं? पुढं कोण चेक करतोय म्हणा? पण आणा कुठला आणू? महंमद, प्रताप इथं थोडेच भेटणार आहेत? हो! मेघाचं ऑफीस सुटायची वेळ झाली आहे. जावंच तिच्या ऑफिसात आणि म्हणावं, ''एक आणा दे बघू घरी जायला! माझ्या डोक्यात एक सुंदर कथा घोळते आहे, जातो आणि लिहायला बसतो!''

# माणूस आणि गाढव

दरवर्षी हिवाळ्याच्या दिवसात गावातला दरोबस्त माणूस मुळ्याची भाजी करतो. खाडीकाठच्या मळ्यातून भाजीचं अमाप पीक येतं. चिपळूणची बाजारपेठ जवळच असल्यानं तिथं बरा खप होतो. भाजावणीचं काम सुकर होतं. मानेवर आलेला आगोठीचा बोजा थोडासा हलका वाटू लागतो.

ही झाली गरीबाची कथा. पण ज्याचा भाऊ आफ्रिकावाला आहे, केपचे पौंड ज्याच्या घरी खुळखुळताहेत, त्याला मुळ्याच्या भाजीवर विसंबून राहण्याचं वास्तविक काहीच कारण नव्हतं. पण माणसाचे दिवस फिरले म्हणजे त्याला कसली उस्तवारी करावी लागेल याचा नेम सांगता येणार नाही.

म्हणजे अबदुल्ल्याचे दिवस काही इतके फिरले नव्हते. याजी लावलेल्या रकमांवरील याज खाऊन तो चांगलाच गबरगंड झाला होता. आता तिरदळ झाली असली तरी कुळांकडून मक्त्याचं पाच खंडी भात येतच होतं. एका व्यापाऱ्यानं दहा हजारांची रक्कम साफ बुडवली असली तरी व्याजाच्या रूपानं अबदुल्ल्यानं तिची कधीच परतफेड करून घेतली होती. एका रकमेवरील व्याजाचं व्याज बंद झालं असलं तरी घरखर्च काही त्यामुळे अडून बसला नव्हता. तो व्यवस्थित चालूच होता. पण अबदुल्ल्याच्या दृष्टीनं चिंतेची बाब अशी की, मूळ रक्कम वाढत नव्हती आणि घरखर्च मात्र चालू होता; नव्हे एकसारखा वाढत होता. प्रथम त्याच्या नीटसं लक्षात आलं नव्हतं. एके दिवशी त्याला संशय आला. लागलीच त्यानं हिसाब करून पाहिला तो उत्पन्नातून खर्च वजा जाता नगद पाचशे रुपये तूट वरसाला त्याला येत होती. पाचशे रुपये! आणि असंच बसून खायचं म्हटलं म्हणजे केवढीही रक्कम असली तरी उडून जायला या महागाईच्या दिवसांत काय वेळ लागणार होता?

किमान पाचशे रुपये तरी हमखास निघतील असा काहीतरी धंदा करावा आणि आपली रक्कम त्यात गुंतवावी असा बेत अबदुल्ल्या करू लागला. मुंबईस त्याच्या फुफूचा मुलगा होता. त्याला कागद लिहून त्यानं सलाय घेतली. त्यानं लिहिलं की, 'हटेलसारखा धंदा नाही. एक कोप 'च्या'त तीन पैशे नफो! इचार असल्यास कलव म्हणजे होटल हेरून ठेवता!' अबदुल्ल्याला हा बेत एकदम पसंत पडला आणि होटल पाहण्याविषयी त्यानं लागलीच कळवून टाकलं.

एकदम अलोट पैसा मिळण्याचा तो राजमार्ग दिसताच अबदुल्ल्याचं मन दिपून गेलं. पैशाच्या चकचकत्या ढिगाऱ्यावर बसून त्यानं शेखमहंमदासारखी, त्याचे पैसे बुडवणाऱ्या व्यापाऱ्याच्या कमरेत हजारदा एक सणसणीत आणि काल्पनिक लाथ हाणली! काही लोकांना पैसे याजी देऊन तो पुन्हा याजाचे याज खाऊ लागला. आणि त्या याजाचे याजाचीही रक्कम त्याला बिनबोभाट मिळू लागली! तो अधिकच गबरगंड झाला!

पण सगळं प्रत्यक्षात व्हायला अद्याप दोन महिन्यांचा अवधी होता आणि हे वर्ष जर असंच रिकामं गेलं तर वीस हजारांचे साडेएकोणीस हजार व्हायला अवकाश राहणार नव्हता. पुन्हा वर्षानं आणखीन पाचशे घटणार! पुन्हा पाचशे! पुन्हा पाचशे–अशा रीतीने काही वर्षांनी तो पुरताच कफल्लक होणार होता. एकदम कफल्लक! मग त्याचं पुढं कसं होणार? काय होणार?

नेमका तेव्हाच हिवाळा सुरू झाला. काही लोकांचे मळे वांग्याच्या रोपांनी डुलू लागले; मुळ्याच्या भाजीनं बहरून गेले. अबदुल्ल्याच्या मनात वांग्याचा मळा करण्याचे घोळू लागले. अहमद शफीला जाऊन त्यानं विचारलं, ''गुदस्ता तुला भाजीत काय फायदो झयलो?''

''इशेष नाय. पण भाजावन आटपली.''

त्याबरोबर अबदुल्ल्यानं वांग्यांचा धंदा करण्याचं निश्चित ठरवलं. लगेच तो त्या कामास लागला. त्यानं मळा नांगरून घेतला. खाडीच्या डोहात रहाट लावला. बारा हजार वांग्यांची रोपे लावली. अन् उरलेल्या जागेत मुळ्याची भाजी पेरली. भोवताली लांबच लांब काटेरी कुंपण घातलं. राखणेस एक गडी ठेवला आणि आपणही अधूनमधून खेपा टाकू लागला...

वांग्यांच्या रोपांना वांगी लटकली. हारे भरून वांगी अन् भाजी चिपळूणच्या बाजारात जाऊ लागली. वांग्यांचा पहिला भर अशा रीतीनं बऱ्या भावानं विकला गेला. पण तिसऱ्या-चवथ्या दिवसापासून काय झालं कुणास ठाऊक, वांग्यांना हवा तसा भाव येईना. पुढे तर दर एकदम कोसळला. अबदुल्ल्याचे वांग्यांचे हारे तसेच पडून राहिले. त्यातच अहमद शफी येऊन त्याला म्हणाला, ''यंदा सगळ्या धंद्याचो तुमी नास केलाव.''

''मी? मी काय केला बावा?''

''तुमी नाय तर कुनी? बारा हजार रोपा कशाला लावलीत? अनी ह्यो धंदो करण्याची तुमाला काय जरूर होती?''

''का र बावा? मना पोट नाय काय?''

''पन आमचा पोट तुमी मारून टाकलाव ना?''

अहमद शफी असा तणाणून गेला तेव्हा अबदुल्ल्याला संताप आला. 'धंदा काय, कुणीही करावा. ती काय अमक्याचीच मिरास आहे? आम्हाला पण मुलंबाळं आहेत! त्यांनी काय खावं? त्यांना अहमद शफी पुरवणार आहे वाटतं!' अशा रीतीनं बराच वेळ तो बडबडत राहिला.

पण दुसऱ्या दिवसापासून भाव अधिकच घसरला. बाजारात वांग्याला कुणीदेखील विचारीना. हारेच्या हारे संध्याकाळपर्यंत तसेच पडून राहिले. मग मात्र अबदुल्ल्या हादरला.

मिरजोळीच्या पुलाच्या कामावर वडाऱ्यांनी तळ दिला होता. तिथं काही माल त्यानं पाठविला. पण चटणीशी भाकर खायची सोडून अबदुल्ल्याची वांगी विकत घेऊन खपवण्याची त्यांना काही आवश्यकता वाटली नाही.

दुसऱ्या दिवशी त्यानं सगळ्या खर्चाचा हिसाब केला. एकंदर दोनशे रुपये वांग्यापायी खर्च पडले होते. शिवाय राखणेच्या गड्याची मजुरी रोज जातच होती. आणि विकल्या गेलेल्या वांग्यांचे फक्त बारा रुपये त्याच्या हाती लागले होते! म्हणजे जवळ जवळ सगळा मूळ खर्च अद्यापि वसूल व्हायचा होता. एवढा पैसा कसा वसूल करावा ही त्याला 'रात-दिस' चिंता वाटू लागली. त्याच्या मनानं तोच ध्यास घेतला. डोक्यात वांग्याशिवाय दुसरं-तिसरं काही उरलं नाही.

आणि अशा चिंतेत असतानाच एक दिवस सकाळचा भाजी काढण्यासाठी म्हणून तो मळ्याकडे गेला. लांबवर असतानाच तो थबकून उभा राहिला. कुंपणाच्या एका बाजूच्या दिशेनं डोळे फाडफाडून तो पाहू लागला. एके ठिकाणी कुंपण मोडूनतोडून पार झालं होतं. त्या मोडलेल्या कुंपणातून संतापलेला अबदुल्ल्या तावातावानं आत शिरला. आणि मोडलेल्या, तोडलेल्या, खाल्लेल्या, उपटून पडलेल्या त्या वांग्यांच्या रोपांतून हिंडत, राखणी झोपत असलेल्या माचापाशी येऊन थडकला.

रात्री कुणाचं तरी जनावर येऊन मळ्याची नासधूस करून गेलं होतं आणि हरामी राखण्याला त्याचा पत्ताच नव्हता. अबदुल्ल्याच्या अंगाची लाही लाही झाली. राखण्याला त्यानं शिव्यांची लाखोली वाहिली. त्याच्या सतरा पिढ्या उद्धारल्या. कधी नव्हे तो चार पैसे मिळवण्याच्या आशेनं हा धंदा केला आणि नेमका तेव्हाच वांग्यांना दर नाही! त्यात पुन्हा हा काय भानचोद नवा त्रास? हे गाववाले कुणाला सरळ मीठमिरची मिळवू द्यायचे नाहीत!

त्यानंतर दिवसभर गावात भटकून अबदुल्ल्यानं कसोशीनं तलास केला आणि त्याला कळलं की पुलावरच्या वडाऱ्यांची गाढवं रात्री-बेरात्री सगळा तळ आडवा घालतात.

त्या रात्री तो स्वत: राखणेस गेला. सर्व तयारीनिशी माचात दबा धरून बसला. नऊ वाजले...दहा वाजले...अकरा! दहिंवर पडू लागलं. माचव्याचं गवत ओलावून गारवा सर्वांगाला बिलगू लागला. झोपेची धुंदी अन् गारव्यातली मादकता यांचा त्याच्यावर आस्ते आस्ते अंमल बसला. त्याला डुलकी येऊ लागली. अन् इतक्यात कुठंतरी गाढवं ओरडली. तो टाणकन उडाला. हातात कंदील घेऊन वेड्यासारखा सैरावैरा धावत सुटला. त्या कंदिलाच्या हलत्या-धावत्या प्रकाशात नीट न दिसून एका गाढवावर जाऊन आदळला. त्याबरोबर त्या गाढवानं अबदुल्ल्याला चार-पाच सणसणीत लाथा हाणल्या! अबदुल्ल्या धाडकन आडवा कोसळला आणि गाढवं निघून गेली.

धडपडत तो उठला. माचात परत आला. रात्रभर मग डोळे ताणून राखण करीत बसला. पण त्यानंतर मळ्याकडे कोणी फिरकलं नाही.

दुसऱ्या दिवशी गाढवं पकडायचीच या निश्चयानं तो रात्री मळ्यात गेला आणि जेव्हा गाढवं मळ्यात आली, तेव्हा राखण्याच्या मदतीनं त्यानं ती शिताफीनं पकडली. रात्रभर बांधून

ठेवली आणि सकाळी कोंडवाड्यात रवाना केली.

सतत आठ दिवस त्यानं हा उद्योग केला. रात्रीची तो पकडीत होता. रात्रभर डांबून ठेवीत होता आणि सकाळी कोंडवाड्यात पाठवून देत होता. पण नवव्या दिवशी त्याच्या या निरर्थक उद्योगात अकस्मात खंड पडला. खुद्द वडारीच त्याच्याकडे आले.

ते आले तेव्हा अबदुल्ल्या गाढवं कोंडवाड्यात नेण्याच्याच तयारीला लागला होता. वडाऱ्यांनी येऊन अदबीनं लवून रामराम केला, तेव्हा जरा घुश्श्यातच त्यानं तो स्वीकारला. शेवटी वडाऱ्यांच्यातला एक जण त्याला विनंती करता झाला, ''तुमच्याशीच आलो नवं का? आवो? गाढवं कोंडवाड्यात कशापाय धाडतावं? तथं जबर दंड बसतुया गाढवास्नी! तुमीच पकडून का ठेवीत नाय? आमी तुमालाच दंड द्येव!''

च्च्या! सगळंच मुसळ केरात! या गाढवांपायी अखेरीस आठ दिवस आपण पुरताच गाढवपणा केला असं अबदुल्ल्याला वाटलं. गेली कुठं आपली अक्कल? आपल्याला हे अगोदर कसं सुचलं नाही? मूर्खासारखी, ही चालून आलेली रोजी आपण हातची कशी घालवली? आणि तीही लागोपाठ आठ दिवस! अबदुल्ल्यानं स्वत:ची भरपूर निर्भर्त्सना केली.

पण अजून चानस गेलेला नव्हता. आज तर गाढवं अजूनही त्याच्या दारातच होती. त्यानं हिशेब केला, निदान गाढवामागं दोन रुपयांप्रमाणं पाच गाढवांचे दहा रुपये यायला काहीच हरकत नाही! अल्लाच्या मेहेरबानीनं ही गाढवं जर अशीच रोज यायला लागली, तर काय मजा होईल? यंदाची आगोठ मजेत जाईल! बिलकूल मजेत जाईल!

वडारी त्याच्या तोंडाकडे एकटक पाहत होते. पण मनातले विचार चेहऱ्यावर उमटू न देण्यात अबदुल्ल्या वाकबगार होता. गाढवं रात्री-अपरात्री तळात सोडल्याबद्दल आधी तो त्यांच्यावर संतापला आणि तोंडाला आलं ते बरंच काहीतरी बोलून, या सौद्यावर आपण मुळीच खूष नाही असा आविर्भाव चेहऱ्यावर आणून त्यानं दहा रुपये घेतले व गाढवं सोडून दिली. सरकारच्या पन्नास रुपयांऐवजी इथं दहा रुपयांवर भागलं म्हणून वडारी खूष झाले आणि वांग्यांच्या धंद्यात नाही तर नाही, निदान या वडाऱ्यांच्या गाढवांच्या धंद्यात दहा रुपये प्राप्ती झाली म्हणून अबदुल्ल्या खूष झाला. इतकेच नव्हे तर, तो दुसऱ्या रात्रीही मळ्यात बसून गाढवांची अत्यंत उत्सुक मनानं प्रतीक्षा करू लागला. अल्लानं अशीच मेहरबानी केली तर दोन-तीनशेंची कमाई व्हायला काहीच हरकत नाही, असं त्याला वाटू लागलं.

आणि काय आश्चर्य? अल्लाही त्याच्या मदतीला धावला. रोज दोन-तीन गाढवं त्याच्या मळ्यात येऊ लागली. अबदुल्ल्या त्यांना पकडून ठेवू लागला आणि गाढवामागं रोख दोन रुपये घेऊन त्यांना सोडून देऊ लागला. दिवसाकाठी पाच-सहा रुपयांची नगद कमाई होऊ लागली. वांग्यांचा थोडाफार पैसा येत होताच; पण तो आला नाही तरी त्याला आता फिकीर नव्हती. गाढवं पकडता यावीत म्हणून तो धंदा करायचा; यापलीकडे आता वांग्यांच्या धंद्यात काही अर्थ नव्हता.

पण काही दिवसांनी गाढवांची संख्या घटू लागली. आणि मागाहून तर त्यांनी आपला

रोखच बदलला! अबदुल्ल्याच्या मळ्यात यायच्या ऐवजी ती बाजूच्या अहमद शफीच्या मळ्यात घुसू लागली. एक-दोन दिवस अबदुल्ल्यानं हे मुकाट्यानं सहन केलं, पण स्वत:च्या नुकसानीच्या आणि अहमद शफीच्या नफ्याच्या अशा दोन्ही कल्पनांनी त्याला हैराण केलं. तो एका रात्री हळूच अहमदच्या मळ्यात गेला आणि तिथली गाढवं हाकलून त्यानं आपल्या मळ्यात आणून बांधली. पुन्हा त्या दिवशी त्याला एकदम दहा रुपये मिळाले. दुसऱ्या दिवशीही असाच गाढवं आणण्याचा त्याचा गुप्त कार्यक्रम पार पडला. पण तिसऱ्या खेपेला अहमद शफीच्या सावधानतेमुळं त्याला ते जमलं नाही. उलट तो अहमदच्या मळ्यातली गाढवं रोजच्या रोज हाकलून आपल्या मळ्यात नेतो, एवढी गोष्ट मात्र शाबीत झाली. अहमद शफी भडकून ओरडला, ''गाढवचोर कुठचे!'' अबदुल्ल्यानं दंड चढवले. दोघांनीही मारामारीचा अभिनिवेश आणला आणि दोघांनाही लगेच कळून चुकलं की, वडाऱ्यांच्या गाढवांवरून आपण मारामारी करण्यात काय अर्थ आहे? त्यांनी अशी तडजोड केली की, दोघांनी दोघांच्या मळ्यातली गाढवं पकडायची आणि येईल तो पैसा सारखा वाटून घ्यायचा. गाढवं पकडायचीच तर सगळ्या तळातली का पकडू नयेत असा रास्त आणि व्यापक युक्तिवाद अबदुल्ल्यानं केला; पण ''अपुन हे पाप करणार नाय'' असं 'तोबा तोबा' करून अहमद शफीनं उत्तर दिल्यामुळे अबदुल्ल्याला तो व्यापक विचार तेवढ्यापुरता तरी सोडून द्यावा लागला.

आणि भागीतही हा धंदा तेज चालला! इतका तेज की, गाढवामागं दोन रुपये सहज फेकून देणारे वडारीही आता चिंताक्रांत दिसू लागले. परभारे तळात गाढवं सोडल्यानं इतरांची धूळधाण होण्याऐवजी त्यांच्याच कमाईची धूळधाण होऊ लागली! आणि अबदुल्ल्यानं गाढवं पकडण्याचं सत्र सुरू केल्यापासून हा रोग दरोबस्त मळेवाल्यांत झपाट्यानं पसरू लागला. किंबहुना गाढवं पकडून दंड वसूल करण्यासाठी त्या साऱ्यांनी एखादी गुप्त संघटना सुरू केली असा देखावा मात्र निर्माण झाला!

वडारी हवालदिल झाले खरे. पण हवालदिल होऊन ते काय करणार होते? गाढवांना आपल्या पालापाशी बांधून ठेवून खायला घालण्याचं त्यांच्या बापजाद्यांनाही कधी ठाऊक नव्हतं. आणि गाढवांकडून कामं करून घ्यायची म्हटली म्हणजे त्यांना काहीतरी खायला हे द्यायलाच हवं होतं. आता काही दिवस, मातीचं काम आहे तोवर हा दंडाचा त्रास काय होईल तो सहन करावयालाच हवा असा सुज्ञ विचार करून वडाऱ्यांनी गाढवांना तसंच मोकाट सोडलं. अखेर गाढवं ती गाढवंच! बाकीचे मळे सोडून ती पुन्हा पुन्हा येऊन अबदुल्ल्याच्याच मळ्यात घुसू लागली आणि गबरगंड अबदुल्ल्याला अधिकच गबरगंड करू लागली! या काही दिवसांतच अबदुल्ल्याला एकूण दोनशेचार रुपये एवढा प्रचंड नफा वडाऱ्यांच्या गाढवांवर झाला होता.

पण एक दिवस...एक दिवस अगदीच अनपेक्षित गोष्ट घडली. त्या रात्री अबदुल्ल्याच्या मळ्याकडे एकदेखील गाढव फिरकलं नाही; इतकंच नव्हे तर सबंध तळात त्याला औषधालाही गाढव आढळलं नाही. गेल्या काही दिवसांच्या कमाईवरून भावी प्राप्तीचे काही

आडाखे त्यानं मनाशी बांधले होते, ते पाहता पाहता पार धुळीला मिळाले. गाढवांनी अखेरीला गाढवपणा केला! अद्याप त्याला दीडशेची तरी तूट येत होती. तेवढी भरून यायला हवी तर पंधरा दिवस तरी गाढवं अशीच त्याच्या मळ्यात न चुकता यायला हवी होती.

दुसऱ्या रात्री हवालदिल मनानं तो मळ्यात बसला. गाढवं आता येतील, मागाहून येतील, असं सारखं त्याला वाटे. कुठं जरा कसला आवाज झाला की तो गाढवांच्या ओरडण्याचाच आहे असा भास होई. आणि जेव्हा गाढवांची नेहमीची येण्याची वेळ टळून गेली तेव्हा त्याचा धीर सुटला. तो सावकाश जागचा उठला. एक जाडशी काठी त्यानं हातात घेतली. दुसऱ्या हातात कंदील घेतला आणि अनवाणीच अहमद शफीकडे चालत जाऊन त्याला त्यानं विचारलं, ''वडाऱ्यांची गाढवं कुठं असतात?''

''मिरजोळीच्या पुलावर'' त्याच्या प्रश्नाचा रोख न समजून अहमद शफी उत्तरला, ''पण का?''

''त्यांना मळ्यात हनया जाताय!''-एवढेच शब्द संथपणे अबदुल्ल्या बोलला आणि पाचशेची खोट भरून यावी म्हणून थंडीत सर्वांगाला कापरं सुटलेला, हातात कंदील आणि काठी घेतलेला अबदुल्ल्या, आपल्या मळ्यात घालण्यासाठी म्हणून गाढवं शोधण्यासाठी तळ तुडवीत अनवाणी मिरजोळीच्या पुलाच्या दिशेने चालू लागला...

# महफिल

तो गाव एका खोऱ्यात बसला होता. धनधान्याची तिथे विपुलता होती. मुबलक पाणी मिळत होते आणि सुख तिथे नांदत होते. त्यामुळे फारसा कामधंदा न करण्याची त्या गावच्या लोकांना सवय झाली होती. ते लोक आळशी बनले होते. सकाळी दहा वाजेपर्यंत झोपा काढीत होते. खात होते, पुन्हा अंथरुणात लोळत होते. शहर गावापासून दूर असल्यामुळे करमणुकीचे काही साधन त्यांना उपलब्ध नव्हते. त्यांना कसले खास शहरी शौकही जडले नव्हते.

असे ऐद्यासारखे जीवन व्यतीत करणाऱ्या त्या गावच्या जवान लोकांना आपला वेळ कसा घालवावा हे कळत नसे. ते रोज रात्रीचे जेवण होताच आपल्या दारातून बाहेर पडत आणि गावापासून फर्लांगभर अंतरावर रस्त्याला बांधलेल्या पुलापाशी गोळा होत. त्या पुलावर ते बसत आणि गप्पा ठोकत. रात्रीच्या काही घटका व्यतीत करीत.

रोज रात्री पुलावर बसून गप्पा मारण्याचे फक्त एक व्यसन त्यांना जडले होते. या गप्पा मारल्याखेरीज त्यांना रात्रीची चैन पडत नसे, त्यांना खरंच झोप लागत नसे, बरे वाटत नसे. या गप्पांची अशी मोहिनी त्यांच्यावर पडली होती की, आपल्या बायकांचीदेखील त्यांना तमा वाटत नसे.

गप्पांच्या त्या ओघात अर्थात अनेक विषयांचे चर्वितचर्वण होई. गावातल्या अनेक बातम्या कळत, अनेक रहस्ये उलगडली जात; आणि कित्येक गुप्त गोष्टींवर प्रकाश पडे. त्याचबरोबर एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्यादेखील काढल्या जात. एकमेकांची वेळप्रसंगी टिंगलदेखील केली जाई. पण गप्पांची ती जालिम अफू त्यांना तिथे सतत गुंगवून ठेवीत असे.

अर्थात सारे काही तिथे बोलत नसत. काही नुसते बोलत राहत आणि उरलेले फक्त ऐकत! काही जण प्रेक्षकांची भूमिका पार पाडीत. आपल्यापाशी सांगण्यासारखे असलेले काही जण त्यात असत. तसेच स्वत: त्या कुणाच्या सांगण्याचा विषय बनलेलेही त्यात असत. त्या बोलणारातले मात्र काही थोडेच आरंभापासून अखेरपर्यंत आपला प्रभाव पाडीत असत.

दिलावर हा या रात्रीच्या 'महफिल'चा एक प्रमुख सूत्रधार होता. अशी 'महफिल' गाजवावयाचे एक खास कौशल्य त्याने हस्तगत केले होते. त्याच्यापाशी विनोदी कथांचा फार सुकाळ होता. आणि सतत बडबडत राह्यची हातोटी त्याने साध्य केली होती. लोकांच्या

व्यंगावर नेमके बोट ठेवायची कला त्याला चांगली अवगत झाली होती. तो कसला उद्योग करीत नव्हता. त्याच्यावर कसली जबाबदारी नव्हती. त्याचे दोन भाऊ मुंबईला नोकऱ्या करीत होते आणि लागेल तेवढा पैसा त्याला पाठवीत होते. त्या पैशावर तो मजा मारीत होता. सिगारेट ओढीत होता. गप्पा मारीत होता.

आता त्याला दैववशात प्राप्त झालेल्या या सुखावर त्याने आपल्या मगजाने एक विनोदी कथा रचली होती.

त्या कथेप्रमाणे त्याच्या संसाराच्या गाडीला दोन बैल जोडलेले होते. ते गाडी ओढीत होते आणि तो ती गाडी हाकीत होता. लगाम घट्ट धरून बसला होता आणि जोवर ते बैल ओढत होते तोवर त्याला काळजीचे काही कारण नव्हते. या कथेतले बैल म्हणजे त्याचे दोन भाऊ होते!

स्वत:वर रचलेल्या त्याच्या या कथेचा सारांश त्याच्या भावांच्या कानापर्यंत जाऊन पोहोचला होता. परंतु त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्यावर असा काही जबरदस्त प्रभाव पडला होता की, स्वत:च्या अपमानास्पद स्थानाची लाज वाटण्याऐवजी त्यांना उलट त्याच्या विनोदी वृत्तीचे कौतुक वाटले होते. तेही त्या विनोदावर खूष होऊन इतरांबरोबर हॅऽ हॅऽ करून हसले होते.

आपल्या भावांना हे कळावे ही गोष्ट खुद्द दिलावरला मात्र तितकीशी रुचली नव्हती. त्यांच्या कानावर ती घालणाऱ्या लोकांवर त्याने यथेच्छ तोंडसुख घेतले होते. भावाभावांत बेबनाव करावयाची त्या लोकांची ही वृत्ती असल्याचा त्या लोकांवर त्याने आरोप केला होता. आणि या गोष्टीचे त्याने पुढे बरेच दिवस भांडवल केले होते. स्वत: केलेल्या विनोदाच्या कथनाने हा मनुष्य एवढा चिडावा याचे त्या लोकांना आश्चर्य वाटले होते. त्याचा त्यांना रागही आला होता. परंतु त्यांनी त्या गोष्टीला फारसे महत्त्व न द्यावयाचे ठरवले होते. नेहमीसारखे ते पुलावर जमत होते. आणि त्याच्या नवनव्या कथा रंगून जाऊन ऐकत होते.

एके रात्री ते सारे असेच पुलापाशी जमले होते. ती काळोखी रात्र होती आणि पायाखालचा रस्तादेखील धड दिसत नव्हता. येताना कोणी टॉर्च घेऊन आला होता. कोणी काठी ठोकीत चालत आला होता. आपल्याला कुणी दिसले नाही तरी निदान समोरून येणाऱ्याला काठीचा आवाज ऐकू येईल असा त्यामागचा त्याचा हिशेब होता. आणि हाच हिशेब मनाशी करून कोणी विड्या फुंकीत फुंकीत आले होते.

परंतु सगळे आले तरी दिलावर मात्र आला नव्हता. आणि तो न आल्यामुळे तिथे गोळा झालेल्या लोकांना गोळा झाल्यासारखे वाटत नव्हते. त्या महफिलचा प्राण आल्यासारखे त्यांना वाटत नव्हते. त्या पुलावर ते एकट्याने आणि अशा रीतीने बसून राहिले होते की, इतरांचे अस्तित्व त्यांपैकी प्रत्येकाला जणू जाणवतच नव्हते. जणू पुलाच्या त्या कठड्यावर निष्प्राण पुतळेच बसून राहिले होते!

अखेर बऱ्याच उशिराने दिलावर प्रकट झाला. त्याने चालण्यासाठी टॉर्चचा आधार घेतला नव्हता. काठीचा खडखडाट त्याला पसंत नव्हता. शिवाय त्यावेळी त्याच्या तोंडात पेटती

सिगारेटही नव्हती. वास्तविक ती असायला हवी होती आणि टॉर्चच्याऐवजी काळोखात त्याने रस्त्याने चाचपडत येणे अधिक संभवनीय होते. पण तो आला हेच अधिक महत्त्वाचे होते. तो सावकाश आपल्या झुकत्या चालीने चालत पुलापाशी आला आणि त्या जमलेल्या लोकांना म्हणाला, ''काय? तुम्ही लोक केव्हा आलात?''

त्याला पाहून त्या लोकांना एकदम हुरूप आला. त्यांच्यातला निघून गेलेला प्राण जणू परत आला. त्यांना सुरसुरी वाटू लागली. ते हुशारीने बसले. नाराजीने दिलावरला म्हणाले, ''किती उशीर केलास!'' आधी तो काही बोललाच नाही. नुसता खोकला. मग सावकाश आपल्या खिशातल्या सिगारेटच्या पाकिटातून एक सिगारेट काढून ती त्याने शिलगावली आणि तिचा झुरका मारून किंचित हसल्यासारखे करीत तो उद्गारला, ''आज एक गंमत झाली.''

लोकांमध्ये औत्सुक्य निर्माण करण्याचे हे त्याचे एक खास कौशल्य होते आणि त्याचा तसा तात्काळ परिणामदेखील होत असे. त्या सगळ्यांनी ते ऐकून कान टवकारले. आता आपल्याला कुणाचे तरी कुलंगडे ऐकावयास मिळणार, या आशेने त्यांनी आपले चित्त एकवटले.

''मी जेवण होताच लागलीच इकडे यावयास निघालो आणि सरळ आलो असतो तर केव्हाच इथे येऊन पोहोचलो असतो. पण एक तर माझ्यापाशी टॉर्च नव्हता, काठी आवडत नसल्यामुळे मी ती घेतली नव्हती आणि रस्त्याने चालू लागल्यावर सिगारेट पेटवण्याचा विचार करीत होतो, तेवढ्यात मला कुणाचा तरी धक्का लागला. धक्का एवढ्या जोराने लागला की, मी कोलमडलो. पण सावरून उभा राहिलो तेव्हा कमऱ्याची खतीजा समोर उभी दिसली.''

तिचे नाव तोंडातून बाहेर निघताच साऱ्याचे श्वास रोखले गेले. नाडीचे ठोके वाढले. रक्त जोराने वाहू लागले. मनात नाना तर्क सुरू झाले.

कमऱ्याची खतीजा कुठे गेली होती?

कुठे जात होती?

इतक्या रात्री?

अपरात्री?

कुणाला भेटायला?

हे काय गौडबंगाल आहे?

''हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटल्याचे मला दिसत आहे.'' दिलावर म्हणाला. ''पण त्यात अशक्य काय आहे? कमऱ्याची खतीजा कुणाला भेटायला जाऊ शकत नाही काय?''

''नाही. आम्हाला हे पटत नाही.'' त्या साऱ्यांनी म्हटले.

''आपणाला हे पटवून घेतले पाहिजे.''

''का बरे?''

''ती रस्त्याने चालली होती आणि काळोखात तिला माझा धक्का लागला. मी तिला ओळखले. तेव्हा ती म्हणाली, 'दिलावर दादा, मी तुमला रस्त्यात भेटलू ती कुणाला सांगू नुको हां-''

''मग तू काय म्हणालास बरे?''

''नाही सांगणार! मला लोकांना सांगायची काय जरुरी पडली आहे?''

''कसम खा...सांगणार नाही म्हणून कसम खा.'' ती म्हणाली.

''कसमेची काय जरुरी आहे? तू मला माझ्या भयनीपरमाने आहेस. मी तुझे गुपित कुणाला बोलून दाखवणार नाही.''

''पण ते गुपित तरी काय?''

''ते मी तिला विचारले नाही. पण ते आपल्याला तर्काने ओळखणे सोपे आहे. ती कुणाला तरी भेटायला गेली असणे शक्य आहे.''

पण या त्याच्या उत्तरावर कोणी सहजासहजी विश्वास ठेवायला तयार झाले नाही. तो तिला ते न विचारण्याची गफलत करील ही कल्पनाच कुणाला पटली नाही. ''आम्हाला पटत नाही. तिला तू विचारले नाहीस?''

''विचारणार होतो. पण तेवढ्यात कोणीतरी आल्याची चाहूल लागली तेव्हा ती चटकन निघून गेली.''

त्या लोकांनी त्याला अधिक प्रश्न विचारणे यानंतर थांबविले. एकूण साऱ्या प्रकाराचा ते आपल्या मनाशी विचार करू लागले. शक्याशक्यतेचा अदमास घेऊ लागले. तिचा प्रियकर कोण असावा याचा अंदाज करू लागले.

दिलावरने त्या रात्री त्या लोकांना असे गोंधळात टाकले. ते आपापल्या घरी गेले आणि सरळ झोपी न जाता आपापल्या बायकांना विचारू लागले, ''काय गो? ती खतीजा कैशी मुलगी हय!''

''का बरा?''

''राती ती मला रस्त्यात दिसली. रस्त्यानी जात होती. एकटी होती आनी घाबरलेली दिसत होती. इतक्या रात्री खय गेली होती?''

''तुम्ही हटकले नाही?''

''नाही. ती थोपली नाही. लगेश नायशी झयली.''

''काय म्हायेत?'' त्या बायका उत्तरल्या. परंतु मनात त्यांनी या प्रकरणाचा छडा लावण्याचा निश्चय केला. नवऱ्याने सांगितलेली कथा त्यांनी इतर बायकांना सांगितली, तेव्हा प्रत्येकीच्या नवऱ्याने खतीजाला त्या रात्री पाहिले असल्याचे कळून आले. खतीजा नक्कीच कुणाला तरी भेटायला गेली असली पाहिजे, याबद्दल त्यांची खात्री पटली.

पण कुणाला तसा नेमका सुगावा मात्र लागला नाही. खतीजाचा प्रियकर कोण असावा हे कुणाला सांगता आले नाही. त्यांच्या महफिलमध्ये लागोपाठ अनेकदा तो विषय चर्चिला गेला. दिलावरने पाहिलेल्या प्रसंगावर विनोद झाला. तिच्याविषयी थोडं अश्लीलही बोलले

गेले. पण मग लोक इतर विषयांकडे वळले. दुसरे विषय त्यांना मोहवू लागले. खतीजाच्या प्रियकराचा विषय मागे पडला, विसरला गेला.

परंतु काही दिवसांनीच खतीजा 'पोटाशी' असल्याची गावात अफ़वा पसरली. लोकांना बोलायला नवा विषय सापडला. बायकांचे थवे दिवसभर त्या अफवेवर काथ्याकूट करीत राहिले. रात्रीची या लोकांची महफिल त्या अफवेच्या आधारे पुन्हा ताजीतवानी झाली. दिलावरने काही दिवसांपूर्वी सांगितलेल्या त्या प्रसंगाची त्यांना आठवण झाली. त्या अफवेत तथ्य असले पाहिजे असे त्यांना वाटू लागले.

परंतु तरीही काही धागेदोरे सापडत नव्हते. तिला पोटाशी असल्याचे कुणी पाहिले होते? ती (निदान दिवसाची तरी) घराबाहेर कुठे पडत होती? कुणाकडे कुठे जात होती? तिच्या घरी तरी कोण गेले होते? खरे कुणा लेकाला माहीत होते?

मग ती पोटाशी असल्याची माहिती मिळवली तरी कुणी?

''पण त्यात माहिती मिळवायची ती काय? त्या महफिलच्या एका सदस्याने-इसाकने-म्हटले, ''ती घराबाहेर पडायला कशाला पाहिजे? माझ्या मते ती बाहेर पडत नाही हाच ती पोटाशी असल्याचा पुरावा आहे!''

''पण ती केव्हाच घराबाहेर पडत नव्हती.''

''रात्रीची पडत होती.''

''आताही कदाचित पडत असेल. आपल्याला काय माहीत? काय रे दिलावर?''

त्यांच्या नजरा दिलावरकडे वळल्या. गावातल्या अवघ्या बित्तंबातम्यांचे केंद्र असलेल्या या माणसाला यातली कितपत माहिती आहे?

''मला माहिती नाही.'' त्याने सांगितले. ''त्यानंतर मला ती कधी दिसली नाही. दिसल्यास मी सांगितले नसते का?''

''मग हे कळायचे कसे?''

''एक उपाय आहे.'' दिलावर म्हणाला, ''या इसाकच्या सासूला त्या घरी पाठवणे. तिला तशी खास पाठवायची जरुरी नाही. फक्त तिच्या कानावर ही बातमी घातली की पुरे! ते कार्य इसाकने करावे म्हणजे आपल्याला बसल्या जागी बित्तंबातमी कळेल.''

त्याच्या या सूचनेप्रमाणे इसाकने खरोखरच आपल्या सासूच्या कानावर ही बातमी घातली. पण तिला ती आधीच कळली होती. आणि आपल्या मनाची खात्री करून घेण्यासाठी ती कमऱ्याच्या घरी जाणारही होती. तिने मग अधिक वेळ दवडला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळीच ती खतीजाला प्रत्यक्ष पाहायला गेली.

तिच्या घराचा पुढचा दरवाजा बंद होता. इसाकच्या सासूने तो जोराने खडखडावला. खतीजाच्या आईच्या नावाने ती हाका मारू लागली.

बऱ्याच वेळाने खतीजाच्या आईने येऊन दार उघडले. इसाकच्या सासूला पाहताच ती चमकली. पण बोलली, ''इतक्या सकलुजची का गो आयलीस?''

''खालाच्या जात होतू. जाता जाता तुजो याद आयलो. वाटला भेटून जावा. मला तान

लागलेय. जरा पाणी दे बघू.''

नाइलाजाने खतीजाच्या आईला दरवाजातून बाजूला व्हावे लागले. इसाकची सासू सरळ घरात घुसली आणि स्वयंपाकघरात गेली. खतीजा तिथे भाकऱ्या थापत असलेली तिच्या दृष्टीस पडली.

इसाकच्या सासूने तिचे शरीर लक्षपूर्वक न्याहाळले. आणि तिच्या आईला विचारले, ''काय गो? खतीजाला अगदी भायेर धाडत नाय?''

''घरात काम असते.''

''मोप काम सांगतेस तिला वाटते? तबीयत खराब झयलेय तिची!'' आणि असे म्हणून ती खतीजाच्या जवळ गेली. तिचे हात, पाय, डोके आणि सारे अवयव तिने जवळून पाहिले. मग तिच्या आईकडे वळून विचारले, ''पोरीला झालेय तरी काय?''

''वाताची बेमारी झयली आहे.''

''मंग दवा करा. ऐशी डोळे झाकून बसू नुकोस. नायतर गल्यात येल!''

त्या बाईचे हे अखेरचे शब्द ऐकून तिची आई एकदम ओक्साबोक्सी रडू लागली. इसाकच्या सासूच्या गळ्याला लागली आणि म्हणाली, ''मला यातनं सोडव. मी तुझ्या पाया परते-''

''मग अजून चीप कैशी बैसलीस? कुणाला बोलली का नाहीस? दवापाणी का केले नाहीस?''

''कुणाला बोलवू? कुणाला सांगू?''

''कुणाचे हे काम?''

''मला कैसा कळणार?''

''तुझी पोर काय बोलते?''

''काही बोलतच नाय.''

''तुला कुनाचो संशय येतो?''

''माझी अक्कल नाय चालंत!''

''ठीक आहे. ऐशी घाबरून जाव नको. आपुन यातनं मारग कारू.'' असे म्हणून ती तिथून निघून आपल्या घरी आली आणि आपल्या जावयाला तिने सविस्तर कथा निवेदन केली.

इसाकने सांगितलेली ही कथा पुलावर साऱ्यांनी शांतपणे ऐकून घेतली.

आता पुढे काय करायचे? साऱ्यांनी भावी मार्गदर्शनासाठी दिलावरच्या तोंडाकडे पाहिले.

''मला वाटते, आपण त्या बाईला मदत करावी.'' दिलावरने उत्तर दिले.

''पण तो हरामखोर कोण? कुणी तिला फंदात पाडले?''

''ते आपण मागाहून बघू.'' दिलावर म्हणाला, ''पण आधी तिची यातून सुटका करावी असे मला वाटते.''

तो हे सारे अत्यंत गंभीरपणाने बोलत होता. त्याचा नेहमीचा अश्लीलपणा त्याला त्या क्षणी

तरी सोडून गेला होता. त्याचे अंत:करण त्या बाईविषयीच्या करुणेने ग्रासून गेल्यासारखे त्याच्या शब्दांवरून वाटत होते. त्याच्या शब्दांचा त्यामुळे त्या लोकांवर अतिशय परिणाम झाला. त्यांनी विचारले, ''आपण कशी मदत करणार तिला? कोणत्या मार्गाने?''

''मार्ग मी सांगतो. इसाकच्या सासूलाच आपण सारे करायला सांगू झाले!''

''पण काय करायला सांगायचे?''

''काय? काय सांगायचे?'' थोडा वेळ थांबून तो म्हणाला, ''पोर पाडायचे!''

''पोर पाडायचे?'' त्या लोकांनी दचकून विचारले.

''अर्थातच! पाडायचे नाही तर काय ती बाळंत होईपर्यंत थांबायचे? चार गावात बोंब होईपर्यंत डोळे मिटून बसायचे? हा आपल्या गावच्या इभ्रतीचा सवाल आहे!''

दिलावरच्या या बोलण्याने त्याच्या बेताला असलेला काही लोकांचा विरोध मोडून पडला. पुन्हा पूर्वीसारखे इसाकच्या गळ्यात त्या बेताचे उत्तरदायित्व येऊन पडले.

इसाकची सासू दुसऱ्या दिवशी सकाळीच धापा टाकीत खतीजाच्या घरी गेली आणि तिच्या आईला म्हणाली, ''हे बघ, मी सारा बंदोबस्त केलो हाये. आज राती आपुन काम करून टाकू.''

''पन माझ्या पोरीच्या जीवाला काय अपाय होनार नाही ना?''

''नाय. तू कसली काळजी करू नुको. रातची तयार राहा. मी येते.''

''बरा बरा.'' खतीजाची आई उद्गारली. त्याशिवाय तिला गत्यंतरच नव्हते!

त्या दिवशी दिवसभर इसाक, त्याची सासू आणि दिलावर एकमेकांशी खलबते करीत राहिले. कुणाला सुगावा लागू न देता सारे गुप्तपणे कसे पार पाडायचे याच्या त्यांनी मसलती केल्या. त्यांनी कुठून तरी कसले तरी गावठी, जालिम औषध पैदा केले.

रात्र होताच सारे इसाकच्या घरी जमले आणि काळोखाच्या आवरणाखाली तिथून खतीजाच्या घरी गेले. दबकत दबकत आणि सावधपणे चालत ते चटकन त्या घरात शिरले. आणि एका खोलीत जाऊन बसले. इसाकची सासू आत गेली. खतीजाला तिने एका खोलीत घेतले आणि आतून दरवाजा बंद करून टाकला.

त्या बाहेरच्या खोलीत बसलेल्या लोकांच्या हळूहळू गप्पा सुरू झाल्या. अनेक विषय चघळण्याचा प्रयत्न ते करू लागले. पण त्यांना ते जमेना. मनातल्या मनात ते विलक्षण अस्वस्थ होऊन गेले होते. आतल्या खोलीकडे त्यांचे कान लागले होते आणि खतीजाच्या कण्हण्याचा आवाज तेव्हा त्यांना ऐकू येऊ लागला, तेव्हा तर ते बोलायचेदेखील बंद झाले. तो कण्हण्याचा आवाज ऐकत राहिले.

त्या आवाजाने त्या लोकांना विलक्षण अस्वस्थ करून सोडले. त्यांची मने गांभीर्याने भरून गेली. तिच्या दुर्दशेबद्दल ते हळहळू लागले.

परंतु दिलावरला तशा स्थितीत एकाएकी विनोद करण्याची लहर आली. तो दबत्या आवाजात पुटपुटला, ''बघा, बघा कशी बकऱ्यासारखी ओरडते आहे!''

''असे बोलू नकोस, विनोद करू नकोस.'' इसाकने म्हटले. त्या कण्हण्याने त्याला

खरोखरच वेदना होत होत्या! दिलावरचा विनोद त्याला रुचला नाही.

''मग काय करू? तिची तारीफ करू? अरे, मजा करताना तिला कळले नाही?''

''गप्प बैस. गप्प बैस म्हणतो ना!'' ते सारे चिडून त्याला म्हणाले, ''तूच तिला यातून सोडवावयाचा बूट काढलास आणि आता तूच टिंगल करतो आहेस?''

''मी फक्त तिच्या चुकीबद्दल बोलतो आहे.''

''ते आता कशाला?''

पण तेवढ्यात खतीजाचा अधिक जोराने कण्हण्याचा आवाज त्यांच्या कानी आला आणि ते बोलायचे बंद झाले. लागोपाठ इसाकची सासू तिथे आली आणि म्हणाली, ''सारेच मुसळ केरात!''

''का? काय झाले?'' त्यांनी विचारले.

''अरे पोरानू? असले औषध घेतल्यानंतर त्या बाईने आपल्या याराचा नाव घ्यायचा असते! पन ही बया काय नाव घ्यायला तयार नाही आणि तिची सुटका काही होत नाही. बरे, आता दवाचा तिच्यावर अयसो परिनाम झाला आहे का सुटका झाल्याशिवाय गत्यंतर नाही. नाहीतर माझी मान अडकेल!''

ते ऐकून ते सारे एकमेकांच्या तोंडाकडे बघू लागले. असल्या काही अडचणींची त्यांनी कल्पनाही केली नव्हती.

''पण तिला नाव घ्यायला काय हरकत आहे?'' इसाकने म्हटले.

''पण ती घेत नाही त्याला काय करायचं?''

''नाही घेत तर राहू दे! मरू दे सालीला!'' तो संतापून म्हणाला. कुठून आपण या फंदात पडलो असे त्याला वाटू लागले.

''ती मेली तर आपल्या गळ्याला नख लागेल ना पण!'' दिलावर म्हणाला, ''यातूनही काहीतरी मार्ग आपल्याला काढला पाहिजे.''

पण इसाकला दिलावरचाही आता राग आला होता. तो म्हणाला, ''तूच आम्हाला या फंदात पाडलेस!''

''मला काय माहीत ती नाव घेणार नाही!'' दिलावर त्याला उत्तरला. इसाकलाही ते पटले. यात बिचाऱ्या दिलावरचा काय दोष? ''मग आता काय करावे?'' त्याने विचारले.

''हे बघ.'' दिलावर त्याला समजावीत म्हणाला, ''यातून तिची सुटका झाली नाही तर आपली मान आता त्यात अडकणार आहे. तेव्हा शहरातून रातोरात डॉक्टर आणवू या. जो काही खर्च येईल तो आपण सारे सोसू! पण मला दुसरा मार्ग दिसत नाही.''

''दिलावर बोलतो ते बरोबर हाये. लगेच दागतरला हनवा. नाय तर पोरीची जीव जायेल आनी आपुन फाशी जावू!'' इसाकच्या सासूने त्याला सुनावले.

ते ऐकताच इसाकने आणखी एकाला आपल्याबरोबर घेतले आणि तो लागलीच सायकलवर बसून शहरात गेला. तासाभरात डॉक्टरला घेऊन तो परतला.

डॉक्टर खोलीत शिरण्याआधी दिलावर त्याच्या कानाला लागला आणि सारी परिस्थिती

त्याने त्याला निवेदन केली. डॉक्टरला त्याने ती केस हातात घ्यायला कसेतरी प्रवृत्त केले. तो खोलीत शिरला आणि इसाकची सासू बाहेर पडली.

सुमारे तासाभराच्या अवधीत सारे बिनबोभाट पार पडले. खिशात पैसे टाकून डॉक्टर पहाटेच्या अंधारात शहरात पसार झाला! मग ते सारे हळूहळू उठले आणि खतीजाच्या आईला दोन धीराचे शब्द सांगून बाहेर पडले. आपापल्या घरी जाऊन आडवे झाले.

त्यानंतर दोनतीन दिवस लागोपाठ जमून त्यांनी खर्चाचा हिशेब केला. आणि त्यांनी तो आपल्या अंगावर सारखा घेतला. मनातल्या मनात चरफडत, दिलावरला शिव्या घालीत त्यांनी ते पैसे इसाकच्या स्वाधीन केले. तो हिशेब आटोपल्यानंतर मग त्यांना त्या घटनेवर विनोद सुचू लागला आणि खतीजाच्या विव्हळण्यावर ते बोलू लागले. त्या साऱ्याच घटनेवर काही काळ बोलत राहिले. काही दिवसांनी बोलायचे बंद झाले!

परंतु कशी कुणास ठाऊक, ती बातमी साऱ्या गावात सावकाश पसरत गेली आणि आश्चर्य असे की, त्या संदर्भात दिलावरचे नाव घेतले जाऊ लागले. त्या लोकांच्या कानापर्यंत ही बातमी जाऊन थडकली, तेव्हा ते थक्क होऊन गेले. असे कसे होईल? त्यांना ते खरे वाटेना!

त्यांनी एके रात्री सहज दिलावरला म्हटले, ''गावात लोक काय म्हणतात तुला माहीत आहे काय?''

''काय म्हणतात?''

''लोक तुझे नाव घेतात. आणि तुला मदत आम्ही केली असे म्हणून आम्हासही दोष देतात!''

''मग काय झाले? लोक म्हणतात ते खरेच आहे!'' त्याने अत्यंत थंड सुरात उत्तर दिले.

''खरे आहे?'' त्या साऱ्यांनी ओरडून त्याला विचारले. त्यांना आता तर पराकाष्ठेचा धक्का बसला होता.

''अलबत! खरेच आहे.''

ह्या उत्तराने ते लोक मूढ बनून गेले. मग त्यांना त्याचा विलक्षण संताप आला. त्याच्याविषयी तिरस्कार वाटू लागला. आपल्याला फसवल्याबद्दल तीव्र चीड त्यांच्या मनात निर्माण झाली.

''असे होते तर तू आम्हाला त्यात कशाला ओढलेस? आमची मान कशाला अडकवलीस?'' त्यांनी बेभानपणे त्याला विचारले.

''माझी मान अडकू नये म्हणून!''

''असे? आणि आता अब्रू गेली ती?''

''ती जाऊ दे रे! या गावात साला अब्रूदार आहेच कोण? त्याला मी डरत नाही. लोक घेत ना आत्ता आपलं नाव? आपले काय जाते?''

''तू याकरता आम्हाला चूतिया बनवलेस!'' ते सारे किंचाळले. ''चल, चालता हो! यापुढे तू आमच्या महफिलीत येऊ नकोस. आमच्याबरोबर बसू नकोस. आमच्याशी बोली-

भाषा करू नकोस.''

''बरे आहे!'' दिलावर थंडपणे उत्तरला, ''मी तुमच्यात येऊन बसणार नाही.'' आणि तो सरळ चालू लागला. आपल्या झुकत्या चालीने सिगारेट फुंकत तो त्या अंधारात नाहीसा झाला.

तो गेला हे पाहून लोकांना बरे वाटले. त्याला यापुढे आपल्या 'महफिल'मध्ये घ्यायचा नाही असाच त्यांनी आपल्या मनाशी निश्चय केला. तो जाताच यांना आनंद वाटला. त्या आनंदात नव्या हुरुपाने ते रोज रात्री पुलावर येऊन बसू लागले.

दिलावर काही दिवस पुलाकडे अजिबात फिरकला नाही. पुलावर न जाणाऱ्या काही लोकांनी जेव्हा त्याला याबद्दल विचारले, तेव्हा तो म्हणाला, ''माझ्या भावांना मी बैल म्हणतो असे हे लोक म्हणतात. पण माझेच भाऊ बैल आहेत असे थोडेच आहे? हे लोकही बैलच आहेत की! आता त्या खतीजाच्या भानगडीत सारे बैलच बनले नाहीत काय?''

त्याचा हा विनोद पुलावर बसणाऱ्या लोकांच्या कानावर गेला. त्या लोकांच्या अंगाचा तिळपापड झाला. परंतु काही लोकांना मात्र त्यात तथ्य आहे असे वाटले. ते म्हणाले, ''तो म्हणतो ते थोडे खरे आहे. आपल्या हुशारीने त्याने आपल्याला बैल बनवले हे काय खोटे आहे?''

''असेल! असेल!'' इसाक म्हणाला. कारण मनातून त्यालाही ही गोष्ट पटली होती.

''पण म्हणून त्याने मला असे बोलून दाखवावे काय? ते काही नाही. त्याला इथे घ्यायचा नाही.''

''पण आता पूर्वीसारखी इथे बसायला मजा येत नाही.'' कोणी तरी म्हणाले आणि साऱ्यांनी त्याला साथ दिली. आता नवनवे विषय त्या महफिलमध्ये निघत नव्हते. शिळ्या कढीलाच ऊत येत होता. नव्या भानगडी कळत नव्हत्या. कुणाची कुलंगडी बाहेर निघत नव्हती. मग तिथे बसायला रंग येणार कसा? मजा येणार कशी?

पण 'त्याला बोलवावा' असे मात्र कोणी बोलू शकले नाही. इसाकला आपली सूचना आवडणार नाही, दिलावरविषयीचा त्याचा संताप अद्याप पुरता ओसरलेला नाही हे पाहून ते मूग गिळून स्तब्ध बसले.

हळूहळू ते पुलावर यायला आळस करू लागले. त्यांचा उत्साह ओसरला. हळूहळू ते पुलावर यायचे बंद पडू लागले. जमणाऱ्या लोकांची संख्या रोडावू लागली. इसाकच्याही लक्षात हा फरक आला आणि अखेर पुलावर भरणाऱ्या 'महफिल'ला आपण एकटेच राहणार असे त्याला वाटू लागले. त्याला नमते घ्यावे लागले. दिलावरला त्याने बोलावणे पाठविले.

त्यांचे बोलावणे दिलावरला अनपेक्षित नव्हते. त्याने हा अंदाज केव्हाच केला होता. परंतु त्याने सुरुवातीला मात्र थोडे आढेवेढे घेतले. मानभावीपणे तो म्हणाला, ''मी कशाला येऊ? बनवाबनवी करणारा मी मनुष्य! माझे काय काम?''

''असू दे रे!'' ते लोक म्हणाले, ''आता ते सारे कशाला काढतोस?''

"मी तुम्हाला बैल बनवणारा!"

"असू दे! त्याबद्दलही आमची काही हरकत नाही! पण तुझ्याबिगर आम्हाला मजा येत नाही. पुलावर बसायला उत्साह वाटत नाही!" आणि त्यांनी त्याच्या दंडाला हात घालून त्याला उठवले आणि ओढत घेऊन चालवले.

अशा रीतीने दिलावर पुन्हा 'महफिल' गाजवू लागला; पुन्हा लोक मोठ्या उत्साहाने त्या ठिकाणी गोळा होऊ लागले. आपल्या मूर्खपणाची रसभरित कथा त्याच्या तोंडून ऐकण्यात दंग होऊ लागले.

# खुदा हाफिज

म्हातारा उबेदुल्ला एकटाच आपल्या आसनावर बसलेला असे. गुडगुडी ओढत. मागच्या आठवणी काढत. त्याच्यासमोर मागचे वैभव उभे राही. भविष्यकालाचा तो विचार करू लागे. अशा वेळी कधी कधी तो आपल्या बायकोला बाहेर बोलावी आणि तिच्याशी सुखदु:खाच्या गोष्टी बोलत बसे.

उबेदुल्लाचे घर फार मोठे होते. अवाढव्य. तो, त्याची बायको आणि मुलगा, शिवाय दोन-चार नोकर अशी त्या घरात वावरत होती. पूर्वीएवढी माणसे आता घरात राहिली नव्हती. जहागिरीचे पूर्वीसारखे उत्पन्न येत नव्हते. एक दिवस दिल्ली सल्तनतचे रणगाडे संस्थानात शिरले आणि त्याच दिवशी उबेदुल्लाचे सारे वैभव, सारा दिमाख लयाला गेला. त्याचा थोरला मुलगा रझाकारांबरोबर भारतीय सैन्याचा प्रतिकार करताना प्राणास मुकला. कुळे मुजोर बनली. घरातले नोकर भराभर कमी होऊ लागले. धाकट्या मुलालाही त्याने कॉलेजातून काढून घरी बसवले. मुलाला घरच्या परिस्थितीची काही दिवस पुरती कल्पना नव्हती. उबेदुल्लाने त्याला नीट समजावून सारे सांगितले.

''हे बघ'' तो म्हणाला, ''आजपर्यंत आम्ही मोठ्या दिमाखाने दिवस काढले. ऐष आरामात राहिलो. चैन केली. पैसे उधळले आणि कमावले. परंतु आता त्यातले काही राहिले नाही. लोकांचे जोडे उचलायची वेळ आता आली आहे! या वयात ते मला जमणार नाही. पुढे तर यापेक्षा कठीण दिवस येणार आहेत. काहीतरी केले पाहिजे. हात-पाय हलवले पाहिजेत. असे ऐद्यासारखे स्वस्थ बसून चालणार नाही.''

सद्रुद्दीनलाही काहीतरी जाणवू लागले होते. तो हैदराबादला राहत होता, तरी तिथेही ते खुपू लागले होते. पूर्वीसारखे जगता येत नाही. पूर्वीसारखा सन्मान होत नाही. पूर्वीसारखा दिमाख दाखवता येत नाही. उतरती कळा! त्यांच्या वैभवाला सारखी उतरती कळा लागली होती. घसरगुंडी चालली होती. सतत घसरगुंडी!

''हैदराबादला कुठं कामधंदा मिळाला तर बघ.'' उबेदुल्लाने त्याला आज्ञा केली. तेव्हापासून तो शिक्षण संपवून घरी राहिला होता. दर महिन्याला एकदा हैदराबादची निष्फळ वारी करीत होता.

हैदराबादला अनेक खेपा मारूनही त्याला कामधंदा मिळाला नाही. उबेदुल्लाने कंटाळून

त्याला सांगितले, ''पुरे कर! कशाला खेपा मारायच्या उगाच! पूर्वीचे हैदराबाद आता राहिले नाही, पूर्वीची सल्तनत आता उरली नाही. आपले काहीच शिल्लक राहिलेले नाही.''

बापाचे म्हणणे सद्रुद्दीनला पटले. ''तुम्ही म्हणता ते खरे आहे. पूर्वीचे हैदराबाद आता राहिलेले नाही. आमचे नामोनिशाण शिल्लक ठेवायचे नाही, असा या सल्तनतने चंग बांधला आहे. आमची कौम, आमची जबान, आमचे कल्चर-सारे कसे भराभर उद्ध्वस्त होत आहे. जाणूनबुजून केले जात आहे. पूर्वीसारखे आता एकमेकांचा निरोप घेताना कोणी 'खुदा हाफिज'देखील म्हणत नाही.''

''मग काय म्हणतात?''

''नमस्ते! नमस्ते म्हणतात!''

''काय करायचे! आपली सद्दी आता संपली आहे. आता कधी काळी खुदाची मर्जी होईल तेव्हा खरी! तोपर्यंत आपल्याला हे असे डुकराचे जिणे जगावे लागणार! त्याला काहीच इलाज नाही!''

''काही इलाज नाही!-का? भांडले पाहिजे, आमच्या हक्कांसाठी झगडले पाहिजे. याचा मुकाबला केला पाहिजे.''

''मुकाबला?'' उबेदुल्लाने आपली गुडगुडी खाली ठेवली. त्याचे हात कापू लागले. चेहऱ्यावर आडव्या-उभ्या रेषा उमटल्या. डोळ्यांत कटुता चमकू लागली. सद्रुद्दीनकडे भेदरलेल्या नजरेने पाहत तो म्हणाला, ''याचा मुकाबला होणार नाही. याला रोकणारे कोणी नाही.''

''आहे! आम्ही आहोत! आम्ही रोकू! मी रोकीन!''

''हं! एकदा तसे झाले! तेव्हा काय झाले तुला माहीत नाही? आमचे शेकडो नौजवान त्यांच्या रणगाड्याखाली चिरडले गेले. माझा रहीम त्यात होता. रणगाड्यांसमोर आडवा पडला होता. त्याच्या शरीराच्या चिंधड्या उडवीत दिल्लीचे रणगाडे पुढे निघाले.''

उबेदुल्लाची बायको त्या क्षणी थरथरत आपल्या पडदानशीन खोलीतून बाहेर आली. बापलेकांचे संभाषण तिला ऐकू येत नव्हते. मुलाच्या उल्लेखानं तिला आत बसणे अशक्य झाले. ओझ्याने वाकल्यासारखी धापा टाकीत नवऱ्यासमोर ती आली आणि भारावलेल्या कंठाने म्हणाली, ''कुणी काढले त्याचे नाव?''

''माझ्या तोंडातून निघाले.''

''कशाकरता? का मला उगाच आठवण दिलीत?''

घळघळ रडत ती तिथल्या आसनावर बसली.

''या सद्रुद्दीनला मी समजावीत होतो. तो वेड्यासारखा काहीतरी बडबडत होता. मुकाबल्याच्या गोष्टी मला सांगत होता!''

''मुकाबला? कसला मुकाबला? झाला तेवढा सत्यानाश कमी झाला? आणखीन करायचा आहे? काय आहे तुझ्या मनात? आपल्याला या गोष्टींशी काय करायचे आहे? दोन वेळचे जेवण मिळेल की नाही याची फिकीर करू या.''

''तेच चालले आहे. जेवायचे तरी कसे? कुठल्या आधारावर? सारे हळूहळू जात चालले आहे. उद्या यातले काहीच उरणार नाही.''

''उद्याचे उद्या बघू. तुला कशाला काळजी हवी? आम्ही आहोत अजून! आम्ही बघू. तू स्वस्थ राहा. घरात पडून राहा. तुम्ही याला नीट समजावून सांगा. तो अजून अनजान आहे. काही कळत नाही त्याला! नसता अनर्थ करील.''

''त्याची काळजी नको. आता तो इथेच राहणार आहे. यापुढे हैदराबादला जाण्याचे कारण नाही. काय मिळेल ते खायचे, नाहीपेक्षा उपाशी राहायचे. याखेरीज तिसरा मार्ग नाही.''

सद्रुद्दीनने आईबापांचे म्हणणे मुकाट्याने ऐकून घेतले; काही वेळ तो मान खाली घालून उभा राहिला. मग सावकाश चालत आपल्या खोलीत निघून गेला. बानो नवऱ्याजवळ बसून राहिली.

ती सहसा आपल्या खोलीतून बाहेर पडत नसे. तिचे आता वय झाले होते. शिवाय थोरल्या मुलाच्या मृत्यूने ती खचल्यासारखी झाली होती. मात्र तिचा तजेला कायम होता. सतत घरात वावरल्याने तिची त्वचा वाजवीपेक्षा जास्त गोरी झाली होती. पंडुरोगी माणसासारखी! देह मात्र धष्टपुष्ट होता. तिच्या चालण्यात, वागण्यात आणि बोलण्यात जन्मजात ऐदीपणाच्या खुणा सहज उमटत होत्या.

ती बसून राहिलेली बघताच उबेदुल्लाने गुडगुडीला हात घालीत म्हटले, ''कशाला बाहेर येऊन बसली आहेस? जा, आत जा. पडून राहा!'' पण ती काही न बोलता तशीच बसून राहिली. काही वेळाने गार वारे वाहू लागले. हवेत गारठा आला. तिला खोकल्याची किंचित उबळ आली. जागची उठून ती झपाझप पावले टाकीत आपल्या खोलीत गेली. उबेदुल्ला तिथेच गुडगुडी ओढीत बसला.

हैद्राबादच्या वाऱ्या बंद झाल्यापासून सद्रुद्दीनला घरात बसण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. दिवसभर तो आपल्या खोलीत बसून राहू लागला. सतत काहीतरी वाचू लागला. हातात काहीच सापडले नाही की शून्यपणे विचार करीत बसलेला राहू लागला. आरामखुर्ची तो अशा वेळी खिडकीपाशी घेई आणि बाहेर बघत राही. क्षितिजापर्यंत पसरलेली काळीभोर, अफाट जमीन तिथून त्याच्या दृष्टीस पडे. मधूनमधून खुरटी उगवलेली झुडपे आणि पुंजक्यापुंजक्यांनी वसलेली घरे यांचे त्याला दर्शन होत राही; पण एकदा घरात बसून राहायचा त्याला कंटाळा आला. तो आरामखुर्चीवरून उठला आणि नेहमी लांबून दिसणाऱ्या त्या सपाट, अफाट जमिनीवरून चालू लागला. मागाहून नेहमी जाऊ लागला.

त्या वर्षी फार कमी महसूल उबेदुल्लाच्या घरात येऊन पडला. नवरा-बायकोंनी एकमेकांशी सल्लामसलत केली. मग घरातले काही नोकर कमी केले. खर्चात अधिक काटकसर केली आणि कसेबसे ती भागवू लागली. बानोने एक दिवस सद्रुद्दीनच्या लग्नाचा विषय नवऱ्यापाशी काढला. लग्न उरकून टाकावेसे त्यालाही वाटू लागले. त्याने मुलाला

आपल्यासमोर बोलावले. बानो होतीच. तो मुलाला म्हणाला, ''तुझी शादी उरकायचा आमचा इरादा आहे.''

''शादी? माझी शादी?'' त्याने आश्चर्याने विचारले.

''होय. का? शादी करायची नाही?''

''करायची ना! पण इतक्यात कशाला? धांदल काय आहे? सध्याच्या या दुर्दशेत–''

''दुर्दशा नेहमीचीच आहे! म्हणून काय शादी करायची नाही? शादी लांबणीवर टाकण्याने काय आपली दुर्दशा टळणार आहे? पुढे माझ्याने तुझे भले होईलसेही मला वाटत नाही.''

''सद्रुद्दीन, बहस करू नको. आमची आरजू पुरी कर. आपले पहिल्यासारखे असते तर केव्हाच तुझी शादी उरकली असती!''

आईबापांना दुखवणे त्याला शक्य झाले नाही. त्यांच्या इच्छेपुढे त्याने मान तुकवली. धीमी पावले टाकीत तो आपल्या खोलीत गेला आणि नवरा-बायको लग्नाच्या गोष्टी बोलण्यात दंग झाली.

चारपाच दिवसांनी उबेदुल्ला जवळच्या शहरात गेला आणि दोन दिवसांनी परत आला. तिथल्या कोणा नबाब घराण्यातली मुलगी त्याने बघितली. सगाई केली. ती नक्की केली. थोडीशी जमीन विकून पैसा उभारण्याचा बेतही त्याने केला. मुलाने ते ऐकून कडवटपणे हसून म्हटले, ''ठीक आहे. एके काळी निझामाला छोकरी अर्पण करून आपण जमीन मिळवली. आता घरात मुलगी आणण्यासाठी तीच जमीन विकायची पाळी आपल्यावर आली आहे.''

बानोने संतापून त्याच्याकडे पाहिले. ''तू हे काय बोललास? असल्या बेहिदायत गोष्टी तू कधीपासून करायला लागलास?''

''मला कळले तेव्हापासून. अब्बाजान, हे खरे आहे ना?''

''खरे आणि खोटे. तुला काय करायचे आहे? या गोष्टीला अनेक वर्षे होऊन गेली. हैदराबादमधल्या सगळ्याच नबाबांची ही कहाणी आहे. आम्हीच तेवढे काही वाईट केलेले नाही!''

''पण याला या पंचायती कशाला?'' बानोने त्याच्यावर डोळे वटारले. तो जड पावले टाकीत तिथून बाजूला झाला.

थोड्याच दिवसांत त्याच्या लग्नाचा सोहळा पार पडला. थोडक्यात आणि कसलाही डामडौल न करता. शहरातली मुलीकडची आणि उबेदुल्लाच्या नात्यातली माणसे काही दिवस त्यांच्याकडे येऊन राहिली. पंधरा दिवसांनी ती सारी परत गेली. काही दिवस गजबजलेले हे घर पुन्हा पूर्ववत शांत, ओसाड वाटू लागले.

सद्रुद्दीनची बायको बानोसारखीच देखणी आणि गोरी होती. पंडुरोग्यासारखी त्वचा आणि पुष्ट शरीर हा नबाबी घराण्यातला वारसा तिच्याही वाट्याला आला होता. काही दिवस तिचे

दर्शनसुद्धा कुणाला झाले नाही. आपल्या खोलीत झोपून राहत तिने बरेच दिवस काढले. मग केव्हा तरी ती आपल्या खोलीतून बाहेर पडू लागली. संध्याकाळच्या वेळी त्या अवाढव्य, ओसाड घराच्या पाठीमागे ती एकटीच जाऊन उभी राहू लागली. तिचा चेहरा ओढगस्त दिसू लागला. तिची प्रसन्नता लोप पावली. तजेला नाहीसा झाला. आणि एक दिवस तिने सासूच्या कानांवर आपले दु:ख घातले.

''ते रात्ररात्र कुठं बाहेर असतात. कधीकधी दोनदोन दिवस त्यांचा पत्ता नसतो. विचारलं की रागावतात. माझ्यापाशी धड बोलतसुद्धा नाहीत!''

बानोने विचारले, ''केव्हापासून हे असे चालले आहे?''

''मी या घरात आल्यापासून पाहते आहे. त्यांचे कशात लक्ष नाही.''

''त्याला तू बोललीस?''

''बोलले—अनेकदा बोलले. नेहमी बोलते. ते ऐकत नाहीत. त्यांची सारी कामे मी करते आहे. रात्री-बेरात्री दार उघडून त्यांना आत घेते आहे. त्यांच्या भोवताली सारखी वावरते आहे. पण त्यांना माझ्या अस्तित्वाची जाणीवही नाही. मी असून नसल्यासारखीच आहे.''

''तो जातो तरी कुठं? करतो काय?''

''कुणाला माहीत? काही सांगत नाहीत. विचारलं की संतापतात. म्हणतात उगाच चांभारचौकश्या करू नकोस! निमूटपणे सांगेन ते काम कर!''

''बरं. तू काळजी करू नकोस. उगाच जिवाला घोर लावून घेऊ नकोस. मी यांना सांगते. सारे ठीक करते.''

बानोने नवऱ्याच्या कानावर या गोष्टी घातल्या. नवरा-बायकोंनी चिंताग्रस्त होऊन आपसांत विचार केला. उबेदुल्ला त्या दिवशी पहिल्या प्रथम हादरला. तो जागचा उठून मुलाच्या खोलीत गेला. सून तेव्हा पलंगावर झोपली होती. त्याला पाहताच ती उठून एका कोपऱ्यात जाऊन पाठमोरी उभी राहिली. उबेदुल्लाने खोलीभर नजर टाकली. मुलाच्या खोलीत केवढा तरी फरक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. पूर्वीचा भपका तिथे राहिला नव्हता. भिंतीवरले रंग उडून गेले होते. छताला लटकलेल्या हंड्या आणि झुंबरे काढली गेली होती. फर्निचर नाहीसे झाले होते. आणि भिंतीवर एकदोन नवीनच साधी छायाचित्रे लटकली होती. त्याने बराच वेळ त्या छायाचित्रांकडे निरखून पाहिले. परंतु त्यांची त्याला ओळख पटेना. त्याने बाहेर पडताना सुनेला सांगितले, ''तो आला की त्याला माझ्याकडे पाठव.''

परंतु जेव्हा सद्रुद्दीन त्याच्यापुढे येऊन उभा राहिला तेव्हा त्याला काय विचारायचे, हे उबेदुल्लाला समजेना. त्याच्या मनाचा गोंधळ उडाला. त्याने सद्रुद्दीनवर नजर टाकली.

सद्रुद्दीनची प्रकृती पहिल्यासारखी राहिली नव्हती. त्याचे फुगीर गाल आत गेले होते. शरीर कल्पनातीत वाळले होते. केस निबरट झाले होते. पूर्वीचा त्याचा तजेला नाहीसा झाला होता आणि गोरा चेहरा काळवंडला होता.

''कुठल्या कामात एवढा गुंतला आहेस?'' उबेदुल्लाने गुडगुडी खाली ठेवली.

''बायकोशी बोलायलादेखील तुला फुरसद नाही? मला, बानोला हाक मारायलादेखील सवड नाही? कुठं जातोस? काय करतोस? काय खातोस? काय-विचारायचे तरी काय तुला? कसली अवदसा आठवली आहे?''

सद्रुद्दीनने संथपणे बापाला उत्तर दिले, ''अब्बाजान, या दुर्दशेने मी बेचैन झालो आहे. या दुर्दशेतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधतो आहे.''

''बाहेर भटकून कसला मार्ग शोधणार आहेस?''

''बाहेर भटकून मला मार्ग सापडला आहे. मी काय करतोय ते कळतेय मला! त्यामुळे ही दुर्दशा नष्ट होणार आहे. पुन्हा पूर्वीचे वैभवाचे दिवस आपल्याला लाभणार आहेत!''

''पुन्हा पूर्वीचे दिवस? वैभवाचे दिवस? हे कसे शक्य आहे?''

''शक्य आहे! सारे काही शक्य आहे! ही सल्तनत नेस्तनाबूद झाली तर तेही शक्य आहे. ह्या सल्तनतला बरबाद करायचे आहे. तिला नेस्तनाबूद करायचे आहे. तिचे तीन तुकडे करायचे आहेत. तेच आम्ही करतो आहोत!''

''तुम्ही? तू? तुला हे कुणी सांगितलं? ही बगावत आहे माझ्या जिवा! तुला माहीत नाही. काही कळत नाही. ते चिरडून टाकतील! वरवंटा फिरवतील! आपल्या सर्वांचा खातमा करतील!''

बानोने जागची उठून त्याला मिठी मारली!

''ते शक्य नाही. तुला काही माहीत नाही, अम्मी! पूर्वीसारखी ही रझाकारी चळवळ नाही. आपल्यापुरती मर्यादित नाही. असंख्य माणसे यात शरीक झाली आहेत. ह्या वेळेला फार वेगळं घडणार आहे.''

''काय आहे?'' उबेदुल्लाने विचारले, ''आहे तरी काय? काय चाललं आहे? आणि आम्हाला कसं कळलं नाही?''

''कळेल! तुम्हालाही ते लवकर कळेल! गावंच्या गावं स्वतंत्र होतील. सरकारी कारभार सारा संपुष्टात येईल. दिल्ली सल्तनत उलथून पडेल. आपण पूर्वीसारखे आझाद होऊ. पूर्वीसारखं आपल्याला शानमध्ये राहता येईल!''

''खरंच? खरंच असं घडेल?''

''का नाही? घडलं पाहिजे. केवढ्या मोठ्या प्रमाणात सारं चाललं आहे. मग का घडणार नाही?''

उबेदुल्लाचे डोके भणाणून गेले. त्याला काहीच समजेनासे झाले. मुलाचे म्हणणे खरे व्हायला हवे होते. पण तो भीत होता. सरकारचा रोष ओढवून घ्यायची त्याची तयारी नव्हती. स्वत:च्या आणि मुलाच्या जीविताची त्याला चिंता वाटत होती.

हळूहळू त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. मुलाच्या खोलीतले छायाचित्र त्याला आठवले. आसपासच्या गावांहून ऐकू येणाऱ्या बातम्यांनी त्याच्या मनात गर्दी केली. त्याची चर्या गंभीर झाली.

''कम्युनिस्ट लोक?''

''होय.''

''त्यांच्यात आपण शरीक व्हायचं? त्यांचा खुदावर भरोसा नाही.''

''नसेना का! आपल्याला काय करायचं आहे? त्यांची आपल्यावर सक्ती नाही. ते आपले दुश्मन नाहीत. दिल्ली सल्तनतचे दुश्मन आहेत. आपल्या दुश्मनांचे दुश्मन ते आपले दोस्त! आपल्याशी ते चांगले वागतील! आपल्याला पुन्हा वैभवाने, सन्मानाने राहता येईल!''

समोर पसरलेल्या क्षितिजाकडे उबेदुल्लाची नजर लागली. मुलाच्या बोलण्याने तो गोंधळात पडला. त्याने उभ्या केलेल्या चित्राचे रंग पाहण्यात दंग होऊन गेला. सद्रुद्दीन तिथून केव्हा निसटून गेला हे त्याला समजलेही नाही. बानोने जवळ येऊन त्याला हलवले तेव्हा तो भानावर आला.

''त्याला आवरा, वेळीच आवरा. तो वेडा झाला आहे. काहीतरी बरळतो आहे. मला त्याची भीती वाटते. भीती वाटते. फार भीती वाटते!''

''तुला कळत नाही. तो बोलतोय ते मलाही पटू लागलं आहे. काहीतरी होऊ घातलं आहे.''

''काही होत नाही. काही होणार नाही. आणि आपल्याला त्यात काही भाग घ्यायचं कारण नाही. आपण आपल्या व्यवहारात लक्ष घालू या. खुदा अजून आपल्याला सुखात ठेवील.''

पण उबेदुल्लाने तिला उत्तर दिले नाही. तो गुडगुडी ओढू लागला होता. हताश नजरेने ती त्याच्याकडे पाहू लागली.

सद्रुद्दीन तेव्हापासून अधिक अनियमितपणे वागू लागला. केव्हातरी बाहेर पडू लागला. रात्री-बेरात्री बायकोला हाक मारून उठवू लागला. मित्रांना बरोबर आणू लागला. तिची अधिकाधिक कुचंबणा होऊ लागली. निराश झाल्यासारखी, कुढल्यासारखी, ती खिन्न मनाने वावरू लागली.

एकदा त्याने आपल्या मित्रांना खोलीत बोलावले. त्यांचे ओसाड, अवाढव्य घर गुप्ततेच्या दृष्टीने त्यांना सोयीचे वाटले. ते आले आणि खोलीत बसून खलबते करू लागले. त्याच्या बायकोला त्यामुळे खोलीत जाता आले नाही. दरवाजापाशी तिने जमिनीवर अंग टाकले, तिथेच ती झोपी गेली.

मित्रांना खोलीबाहेर घालवून सद्रुद्दीन परत आला तेव्हा त्याला बायकोची आठवण आली. तिला शोधीत तो दरवाजापाशी आला. तिथे जमिनीवर तिला अस्ताव्यस्त झोपलेली त्याने पाहिली. खाली वाकून त्याने तिला उचलली आणि पलंगावर आणून ठेवली. मग आपण तिच्या शेजारी झोपून तिला तो जागी करू लागला.

त्याने जमिनीवरून उचलताच ती जागी झाली होती. त्याचा हात पकडून तिने विचारले, ''मला असे का छळता? तुमचे माझ्यावर प्रेम नाही? तुम्हाला मी पसंत नाही?''

''कोणी सांगितले तुला हे? मला तू हवी आहेस.''

''मग का असे वागता? कशाला मग लग्न केलेत? माझ्याशी चांगले वागायचे नव्हते तर तसे आधी का सांगितले नाही?''

''ऐक! माझ्या मनात लग्न करायचे नव्हते. मी लग्न केले आईसाठी. बाबांच्या मर्जीखातर. केवळ नाइलाजाने. त्यांना दुखवू नये म्हणून!''

''त्यांना दुखवू नये म्हणून लग्न केलेत. पण माझ्या मनाचा विचार केला नाहीत. मला दुखवायला तुम्हाला काहीच कसे वाटत नाही?''

तो काही बोलला नाही. तिला त्याने जवळ ओढली. त्याची इच्छा तिला समजली. तिने त्याला विरोध करीत म्हटले, ''खोटे. सारे खोटे! तुमचे माझ्यावर प्रेम नाही. तुम्हाला फक्त मी हवी आहे. तुम्हाला माझा उपभोग तेवढा हवा आहे. तुमची बटीक म्हणून मी वागावे अशी तुमची इच्छा आहे. मी तुमचा काय गुन्हा केला आहे?''

''जास्त बोलायची आवश्यकता नाही. आमच्या खानदानातल्या बायका पुरुषाला कधी काही विचारीत नाहीत! ते ठेवतील तशा त्या वागतात. तुलाही तसेच वागले पाहिजे!''

''तुम्हाला स्वत:च्या जीवाची पर्वा कशी नाही? बघा, तुमचे काय झाले आहे? तुमचा चेहरा कसा काळाठिक्कर पडला आहे. कशाला नसत्या फंदात पडला आहात? तुम्ही बाहेर जात जाऊ नका. मी तुमचे सारे करीन. आपण सुखानं राहू–''

तो पुन्हा स्तब्धच बसला. हाताने त्याने तिला पुन्हा जवळ ओढली. ती प्रतिकार करू शकली नाही. भीतीने ती त्याच्याजवळ सरकली.

दुसऱ्या रात्री तो बाहेर जायला निघाला, तेव्हा ती त्याचा हात पकडून म्हणाली, ''आज माझं ऐका. तुम्ही बाहेर जाऊ नका.''

''मग काय करू?'' त्याने तिचा हात झिडकारला. तो दरवाजाकडे वळला. ती जाऊन त्याच्या मार्गात उभी राहिली. त्याला तिने दरवाजापाशी अडविले.

''नका जाऊ. माझ्यासाठी–मला तुम्ही हवे आहात.''

''बाजूला हो! मला जाऊ दे!'' त्याने संतापाने म्हटले.

''कशाला जाता आहात? काय काम आहे?''

त्याने आपली निखाऱ्यासारखी नजर तिच्यावर रोखली. तिला त्याने अलगद बाजूला ढकलली. कोलमडत ती बाजूला झाली. तो बाहेर पडला. निमूटपणे तिने पलंगावर अंग टाकले आणि मुसमुसून ती रडू लागली.

एक दिवस संध्याकाळच्या सुमाराला पोलिसांनी उबेदुल्लाच्या घराला गराडा घातला. दोन पोलीस अधिकाऱ्यांनी आत येऊन उबेदुल्लाला विचारले, ''तुमचा मुलगा कुठे आहे?''

उबेदुल्लाला धडकी भरली. त्याने कापत सांगितले, ''आहे. इथंच आहे. घरात. पण का? काय काम आहे?''

त्याच्याकडे लक्ष न देता ते आत घुसले. सारे घर त्यांनी पालथे घातले. त्याच्या खोलीत ते

शिरले. तिथल्या सामानाची, कागदपत्रांची, भिंतीवरच्या छायाचित्रांची त्यांनी उलथापालथ केली. काही कागदपत्रे आणि छायाचित्रे जप्त केली. रात्र होताच त्यांनी घराभोवतालचे पोलीस काढून घेतले आणि त्याच्या खोलीतच ते दबा धरून बसले.

सद्रुद्दीनची बायको धडधडत्या अंत:करणाने त्यांच्याकडे बघत होती. एकदोनदा त्यांनी तिला खोलीतून बाहेर जायला सांगितले. पण ती जागची हलली नाही. आपला नवरा रात्री केव्हा तरी येईल. नेहमीसारखा दरवाजावर थाप मारील आणि अनायासे पोलिसांच्या सापळ्यात सापडेल हे तिला उमगले. तो येताच आपण चटकन जाऊ, त्याला सावध करू- त्यामुळं तरी तो आपल्याशी चांगला वागू लागेल.

पण पहाटे जेव्हा त्याने दरवाजावर थाप मारली, तेव्हा पोलिसांनी तिला मध्येच अडवले. दरवाजा उघडताच रिव्हॉल्व्हरच्या नळ्या आपल्यावर रोखलेल्या सद्रुद्दीनला दिसल्या. हतबुद्ध होऊन तो पोलिसांच्या स्वाधीन झाला.

त्याला पोलिसांनी नेले आणि उबेदुल्ला, बानो दु:खाच्या भाराखाली वाकल्यासारखी त्याच्या खोलीत आली.

''आता मी काय करू? कशी जगू? माझी दोन्ही पोरं गेली. तुम्ही जाऊ दिलीत!'' बानो दु:खार्त सुरात ओरडली. उबेदुल्लाची आधीच वाकलेली मान अधिक वाकून गेली. त्याच्या पायांचे बळ गेले. झालेला प्रकार आता कुठे त्याच्या पुरता लक्षात आला. असहायपणे, अपराधी नजरेने त्याने बायकोकडे पाहिले. मुलाची सुटका करण्याच्या तरतुदीला त्याचे मन लागले.

पण तेही त्याला शक्य झाले नाही. सद्रुद्दीनला सुरक्षा कायद्याखाली पकडण्यात आले होते. त्याच्यावर खटला भरण्यात येणार नव्हता. त्याला जामिनावर सोडण्यात येणार नव्हते. बेमुदत तो कैदेत राहणार होता.

दु:खाच्या भाराने उबेदुल्ला पिचून गेला. त्याला पोक आले. गुडगुडी हातात घेऊन ती न ओढताच तासनतास तो वेड्यासारखा कुठेतरी बघत आपल्या आसनावर बसू लागला. मुलाकडे त्याचे मन ओढ घेऊ लागले. त्याला भेटायला तो अधीर झाला. त्याने शहरात जायचा बेत केला.

त्याच्यापाशी आता पैसेही उरले नव्हते. होते-नव्हते ते एव्हाना निकालात निघाले होते. बानोजवळही काही उरले नव्हते. त्याने सुनेजवळ जाऊन पैसे मागितले. त्याची लाचार मुद्रा बघून ती आपले दु:ख विसरली. तिचे डोळे भरून आले. आपल्या गळ्यातील दागिना तिने सासऱ्याच्या हवाली केला.

रखडत रखडत उबेदुल्ला संध्याकाळचा शहरात जाऊन पोहोचला. रात्रभर कुठेतरी राहिला आणि दुसऱ्या दिवशी मुलाला भेटायला तुरुंगात गेला. तुरुंगात त्याची प्रथम कुणी दखलच घेतली नाही. 'माझा मुलगा कुठं आहे? कुठं आहे माझा मुलगा?' असे वेड्यासारखे तो ज्याला त्याला विचारू लागला. पोलिसाने वेडा समजून त्याला बाहेर काढले. अखेर एका

अधिकाऱ्याला त्याची दया आली. त्याने भेटीची व्यवस्था केली. त्या अधिकाऱ्याने सांगितलेल्या जागी तो सद्रुद्दीनची वाट बघत बसला.

सद्रुद्दीन समोर येऊन उभा राहिलेला पाहताच त्याची गाळण उडाली. सद्रुद्दीनला त्याने चटकन ओळखले नाही. त्याची प्रकृती अधिकच खालावली होती. त्याचे डोळे खोल गेले होते. चेहरा भकास झाला होता. गालाची हाडे बाहेर निघाली होती. त्याने बापाकडे पाहिले आणि मान खाली घातली.

''कसा आहेस?''

''बरा आहे–बरा आहे. तुम्ही कशाला आलात इतक्या लांब?''

''तुला बघायला–तुला बघायला आलो माझ्या जिवा! काय झालेय हे तुझे? मी पहिल्यापासून सांगत होतो. अखेर तेच झाले ना? दिल्ली सल्तनत आहे तिथंच आहे.''

''आमचे चुकले. थोडेसे चुकले-नाही तर-नाही तर-''

''नाही तर काय? वेडा! तू वेडा आहेस! मलाही प्रथम तुझ्यासारखेच वाटले, पण त्यात अर्थ नव्हता! आता हे बदलणार नाही. कधीच बदलणार नाही. नाहक आपण आपली सत्यानाशी करून घेतली.''

सद्रुद्दीनने अधिक युक्तिवाद केला नाही. त्याने विचारले, ''आई कशी आहे?''

''आहे. बरी आहे. तुझ्या काळजीने रात्रंदिवस खंगत चालली आहे. काय सांगू तिला? कधी सुटशील म्हणून सांगू?''

''सुटण्याची सध्या काही आशा नाही.''

''माफी माग-म्हणावं, मला माफ करा. मी चुकून या बाबतीत सापडलो. कम्युनिस्टांनी मला त्यात ओढलं. माझा काही अपराध नाही. मी काही गुन्हा केलेला नाही. हवं तर तसं लिहून देतो तुम्हाला!''

''त्याचा काही उपयोग नाही. सारं शांत झाल्याशिवाय आमची सुटका होणार नाही.''

वेळ संपल्याची शिपायाने वर्दी दिली, तेव्हा उबेदुल्ला मागे वळला. तेवढ्यात सद्रुद्दीनने त्याला हाक मारली, ''अब्बाजान!''

''काय?'' उबेदुल्ला परत फिरला.

सद्रुद्दीनचा कंठ दाटून आला. तो पुटपुटला, ''ती कशी आहे?''

''ती-ती होय? आहे, आमच्यासारखीच तुझ्या काळजीत बसली आहे. तिने दागिना मोडला तेव्हा माझे येणे झाले!''

''माझी तिला सलाम सांगा! मी बोलावलं आहे म्हणून सांगा!''

''सांगतो-सांगतो.'' उबेदुल्लाने डोळे पुसत तिथून पाय काढला. बाहेर पडून तो घराकडे यायला निघाला.

संध्याकाळचा तो घरी पोहोचला तेव्हा बानो बाहेर अंगणात उभी राहून त्याची वाट बघत होती. तो अंगणातच उभा राहिला. धापा टाकीत त्याने तिला मुलाचे वृत्त कथन केले. मग धावपळीने तो घरात गेला. सुनेजवळ जाऊन त्यानं तेच पुन्हा तिला ऐकवलं. विलक्षण

निर्विकारपणे तिने ते ऐकून घेतले.

"त्याने तुला बोलावले आहे. एकदा जा. त्याला भेटून ये. कधी जातेस? मी बरोबर येईन तुझ्या-"

"कशाला बोलावले आहे?" तिने मान वर करून म्हटले, "आता भेटून काय उपयोग? माझ्या आयुष्याची त्यांनी केव्हाच राखरांगोळी केली. आता काय इरादा आहे?"

"असे काय बोलतेस? तो नवरा आहे तुझा! त्याची तुझ्यावर–"

"काही नाही. माझ्यावर त्यांचा लोभ नाही. प्रेमाने मला एकदाही हाक मारली नाही. सुख असे माझ्या वाट्याला केव्हा आले नाही. त्यांनी माझ्या आशा, आकांक्षा चिरडून टाकल्या. माझे मन मारून टाकले. आता माझ्या मनात त्यांच्याबद्दल जरासुद्धा मोहब्बत उरलेली नाही. मला त्यांची नफरत वाटते, नफरत!"

उबेदुल्ला गप्प राहिला. तिला अधिक आग्रह करायला त्याला शब्द सुचले नाहीत. मुकाट्याने तो खोलीबाहेर पडला.

काही दिवसांनी तिचा बाप तिला न्यायला आला. बापाबरोबर ती जायला निघाली, तेव्हा उबेदुल्ला तिला अडवू शकला नाही. त्याने असहायपणे तिला जायची संमती दिली. ती निघताना सासू-सासऱ्यांच्या पाया पडली. मग सासऱ्याला आपल्या खोलीत एकांतात बोलावून तिने आपले दागिने त्यांच्या हवाली केले.

"हे तुमच्याजवळ असू द्या. माझे म्हणून ते मी तुम्हाला देत आहे. माझ्या हातून तुमची सेवा झाली नाही. तुम्ही माझे भले करू शकला नाहीत. पण त्याला तुमचा आणि माझा इलाज नाही. माझ्या किस्मतीत जे होते ते झाले. त्याबद्दल मी तुम्हाला दोष देत नाही. मी आता जात आहे. माझ्यावर नाराज होऊ नका. खुषीनं मला निरोप द्या. खुदा हाफिज!" तिने खाली वाकून सासऱ्याच्या पायाला स्पर्श केला.

"खुदा हाफिज–खुदा हाफिज!" उबेदुल्ला थरथरत कसा तरी पुटपुटला. लटपटत तिथून बाहेर पडला.

ती गेली आणि घरातले उरलेसुरले चैतन्यही निघून गेले. दोघे नवराबायको तासनतास एकमेकांशी शब्दही न बोलता बाहेर बसलेली राहू लागली. नेहमीसारखे संध्याकाळच्या वेळी गार वारे वाहू लागल्यावर खोकल्याची आलेली उबळ बानो आतल्या आत दाबू लागली. गुडगुडीत तंबाखू नसल्याचे माहीत असूनही उबेदुल्ला ती ओढण्यात दंग राहू लागला. त्यांना सतत सान्निध्यात राहावेसे वाटू लागले, त्याचबरोबर एकमेकांशी काही बोलायचीही भीती वाटू लागली. घरातल्या एकदोन नोकरांचे पगार थकताच तेही निघून गेले. बानो रखडत घरातली कामे करू लागली आणि उबेदुल्ला रांगत तिला मदत करू लागला. मधूनमधून मुलाच्या आठवणींनी व्याकुळ झाला की, शहरात जाऊन त्याला भेटून येऊ लागला.

एकदा असाच मुलाला भेटून तो संध्याकाळचा शहरातून परतला. रस्त्याने चालू लागला.

कुणीतरी मागून ढकलल्यासारखी कशीतरी त्याची पावले पडू लागली. थकलेले शरीर तो भराभर पुढे ढकलण्याचा प्रयत्न करू लागला. चालता चालता रस्त्यातून एक लग्नाची वरात जाताना त्याला दिसली म्हणून तो जागच्या जागी थांबला. वरातीमधून सावकाश जाणाऱ्या मोटारीमध्ये आपल्या सुनेला सजून बसलेली पाहताच दचकला! तिचे आपल्याकडे लक्ष वेधू नये म्हणून रस्त्यामधल्या गर्दीत मिसळला. डोळ्यांपुढे अंधारी आल्यासारखा एकटाच त्या गर्दीत उभा राहिला. काही वेळाने आपण एकटेच रस्त्यात उभे असल्याची त्याला जाणीव झाली. वरात गेली त्या दिशेने त्याने तोंड केले. मनातल्या मनात आपल्या सुनेला शुभ चिंतिले आणि मग ओझ्याने वाकल्यासारखा तो रखडत घराच्या दिशेने चालू लागला.

# लाट

एक दिवस एका साहित्यविषयक समारंभात माझी आणि सुमित्रा गोखलेची अकस्मात ओळख झाली. समारंभ संपल्यावर ज्या अनेक लोकांनी अहमहमिकेने माझी ओळख करून घेतली, त्यात सुमित्रा गोखले ही एक होती. निवडक लोकांच्या घोळक्यात बसलेलीच तोंपर्यंत मी तिला पाहत होतो. तिच्या हातातल्या चारदोन मासिकांच्या अंकांनी माझं कुतूहल चाळवलं होतं. इतर वक्त्यांची भाषणं न ऐकता ती एका मासिकात डोकं खुपसून बसली होती. मधूनच पुढं येणाऱ्या केसांच्या बटा आपल्या हातांनी मागं सारीत होती. वाचता वाचता थबकून, मनगटातले बिल्वर उगाचच कोपरांपर्यंत मागं सारीत होती. आणि व्यासपीठावरून तिचे हे आविर्भाव मी निर्विकारपणे पाहत होतो.

पण मग मी बोलायला उठताच झालेल्या टाळ्यांच्या कडकडाटानं भानावर येऊन तिनं हातातलं मासिक मिटलं. माझं भाषण संपेपर्यंत एकाग्रतेनं ती माझ्याकडे पाहत राहिली. समारंभ संपताच मी तिथून बाहेर पडल्यावर हसत हसत ती समोर आली आणि नि:संकोचपणे तिनं माझी ओळख करून घेतली. माझ्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या कथासंग्रहाची भरमसाट स्तुती करण्यास तिने आरंभ केला. असल्या औपचारिक बोलण्याला सरावलेला मी नुसता हसलो! बोलता बोलता माझ्याशी साहित्यावर खूपशी चर्चा करण्याची आपली इच्छा तिने माझ्यापाशी व्यक्त केली. माझा पत्ता मागून घेतला. मी घरी कधी असतो ते विचारून घेतले आणि निरोप घेऊन हसत हसत ती निघून गेली.

यानंतर सुमित्रा गोखले नेहमी माझ्या घरी येऊन माझ्याशी बोलत बसू लागली. लेखकाशी वैयक्तिक ओळख असणारा वाचक ज्या आपुलकीनं, आदरानं लेखकाविषयी, त्याच्या साहित्याविषयी बोलत असतो, त्या आदरानं सुमित्रा गोखले माझ्याशी रोज येऊन बोलू लागली. माझ्याशी साहित्याचा वाद ती उकरून काढू लागली. साहित्याखेरीज इतर विषय तिला वर्ज्य नव्हते. संगीताचं चांगल्यापैकी ज्ञान तिनं संपादन केलं होतं. नवकलेच्या उन्मेषावरील तिचे विचार एखाद्या अव्वल दर्जाच्या नवकलाकारानं व्यक्त करावेत अशा अभिरुचीचे होते. रागदारीवर बोलताना मधूनच तिला गायची लहर येई आणि ती गाऊनही दाखवी. अशा वेळी नि:स्तब्धपणे मी ते ऐकत असे आणि क्वचित वेळी तिची प्रशंसाही करीत असे. आणि नवकलेतलं काहीच कळत नसल्यामुळे त्यावर बोलायचं शक्य तितकं

टाळीत असे. अशा रीतीनं लेखक आपल्या परिचयाच्या वाचकांशी जितक्या अलिप्तपणे समरस होतो, तितक्या अलिप्तपणे मी सुमित्रा गोखलेशी समरस होत असे. अशा परिचयाच्या वाचकांशी जसं एक अलिप्तपणाचं, औपचारिकपणाचं नातं निर्माण होतं, तसं ते सुमित्रा गोखलेच्यात आणि माझ्यात निर्माण झालं होतं.

परंतु एक दिवस या नात्याच्या मर्यादा झुगारून देण्याचा तिनं प्रयत्न केला. त्या दिवशी मी फोर्टमध्ये आपल्याच तंद्रीत रस्त्यानं चाललो होतो. इतक्यात ती समोरून आली. हसत हसत आडवा हात धरून तिनं मला अडवलं आणि विचारलं, ''कुठं निघालात?''

तिनं हात आडवा करून अडवावं, हे मला आवडलं नाही. तरीही हसून औपचारिकपणे मी म्हणालो, ''सहज इकडेच.'' आणि बाजूच्या शोकेसेसमध्ये ठेवलेल्या रंगीबेरंगी कपड्यांकडे बघू लागलो.

माझ्याकडे रोखून पाहत तिनं पुन्हा विचारलं, ''काही खरेदीबिरेदी?''

मोठ्यानं हसून मी उत्तर दिलं, ''आम्ही कसली खरेदी करणार सुमित्राबाई? इतरांच्या खरेदीवर आमची कामं होतात!''

त्याबरोबर तिनं चटकन विचारलं, ''तुम्हाला खरंच काही घ्यायचं आहे का?''

तिचं हे विचारणंही मला आवडलं नाही. अशा रीतीनं माझ्याशी ओळख करून घेणारी, माझ्याशी ओळख वाढवणारी आणि माझ्या पुढं पुढं करणारी सुमित्रा गोखले काही पहिलीच नव्हे. अशा पुष्कळांना मी आपल्या जीवनाचा स्पर्शही होऊ दिला नव्हता. माझ्या कलेच्या विश्वात वावरणारी ही माणसं माझ्या जीवनाचा भाग होऊच शकत नव्हती.

सुमित्रा गोखलेला मी उत्तर दिलं, ''छे: छे: आता मी जे काही म्हणालो त्याचा अर्थ तुम्ही काही खरेदी करून द्यावी असा नाही हं! माझ्या बोलण्यातील ती एक लकब, इतकंच!'' आणि 'बरंय, येतो-' असं म्हणून आपल्याच तंद्रीत मी पुढं चालू लागलो.

या प्रसंगानंतर सुमित्रा गोखले माझ्याकडे नेहमीप्रमाणं येत राहिली. आपल्या सवयीप्रमाण माझ्याशी बोलत राहिली. साहित्य, संगीत, चित्रपट इत्यादी विषयांवर आमचा अप्रतिहतप वाद होत राहिला. असंच बोलता बोलता एक दिवस तिनं मला विचारलं, ''तुम्ही 'जॉन बेलिंडा' पाहिलात का हो?''

'जॉनी बेलिंडा' हा चित्रपट तेव्हा मुंबईत लागला होता. मी नकारार्थी मान हलवली.

त्याबरोबर तिनं चटकन विचारलं, ''आपण पाहू या का?''

तिच्या स्वरात एक वेगळीच आर्तता मला जाणवली. तिचे घारे डोळे कसल्या तरी जिव्हाळ्याने चमकू लागले. मला ते सगळं विलक्षण, विचित्र वाटू लागलं. मी लगेच उत्तरलो, ''नको! चित्रपट पाहण्याचा मला फारसा शौक नाही.''

ती स्तब्ध राहिली. थिजल्यासारखी बराच वेळ बसून राहिली. मग हळूहळू ती इतर विषयांवर बोलू लागली. 'ती अमकी कथा वाचलीत का हो?' असं तिनं मला विचारलं. त्याबरोबर मध्येच थबकलेली संभाषणाची गाडी पूर्ववत चालू झाली. तन्मयतेनं मीही त्या कथेवर तिच्याशी बोलू लागलो.

परंतु दुसऱ्या दिवशी ती आली तेव्हा भरकटलेल्या मनानं मी नुसता पडलो होतो. मनात कसल्या तरी भावनांना कढ आले होते. मनातल्या उसळत्या भावनांचा कुणाजवळ तरी स्फोट करावासं वाटू लागलं होतं. अशा ऐन वेळी सुमित्रा गोखले आली. येताच नेहमीप्रमाणे हसत हसत तिनं विचारलं, ''हॅलाव्? कसला विचार चालला आहे?''

मी सावरून बसत म्हणालो, ''कसला नाही.'' आणि पुन्हा विचारमग्न होऊन बाहेर पाहू लागलो.

असं यापूर्वी कधी घडलं नव्हतं. सुमित्रा गोखले आल्याबरोबर मनातले विचार बाजूला फेकून देऊन मी तिच्याशी हव्या त्या विषयावर बोलू लागलो होतो. माझ्या मनातल्या उलथापालथीची दाददेखील लागू दिली नव्हती. परंतु त्या दिवशी मनानं इतका अस्वस्थ झालो होतो की, एरवी ती आली असताना आपोआप येणारा औपचारिकपणा निर्माण होऊ शकला नाही.

माझी वेगळी, विचित्र मन:स्थिती तिनंही ओळखली आणि नेहमीच्या जिव्हाळ्याच्या स्वरात तिनं मला विचारलं, ''तुम्हाला बरं नाही का?''

तिनं असं विचारावं याचं मला आश्चर्य वाटलं नाही. तथापि माझ्या जीवनात ती डोकावू पाहत असल्याची मला जाणीव झाली. आजवरचा परकेपणा तिच्या दृष्टीनं संपवून टाकल्याचं मला जाणवलं. तिला काही तरी कडवट उत्तर देऊन हा परकेपणाचा पडदा तसाच घट्ट पकडून ठेवावा असं तीव्रतेनं मला वाटलं.

पण मग माझं मलाच वाटू लागलं, आता एखादा माझा मित्र आला असता तर त्याच्याशी मी माझं मन मोकळं केलं नसतं का? मग बिचाऱ्या सुमित्रा गोखलेनंच आपलं असं काय घोडं मारलं आहे की, आपण सदानकदा तिच्याशी इतक्या तुटकपणे वागावं? ज्या माझ्या मित्रांशी मी माझं मन मोकळं करतो तेही माझे एकाएकी मित्र बनले नव्हते. कालांतराने त्यांच्यात आणि माझ्यात जिव्हाळा निर्माण झाला होता. एक प्रकारचा विश्वास वाटू लागला होता. सुमित्रा गोखलेच्या इतक्या परिचयानंतर आता तिच्याविषयी इतका विश्वास निर्माण व्हायला काय हरकत होती?

बाहेर शून्यपणे पाहत मी म्हणालो, ''आज सकाळी गळफास लावून आत्महत्या केलेली एक मुलगी मी पाहिली—गळफासाला लटकलेली.''

बराच वेळ ती काही बोलली नाही. नुसती माझ्याकडे पाहत राहिली. मग मीच पुढं म्हणालो, ''तिचं एका तरुणावर प्रेम होतं.''

''मग? मग झालं काय?'' तिनं अस्वस्थपणं विचारलं.

''कुणास ठाऊक! तिला त्याच्याशी लग्न करायचं होतं. कदाचित दुसऱ्याच कुणा मुलीशी त्यानं जमवलं असेल. तिला बिचारीला फसवलं असेल!''

''त्याला तिच्या प्रेमाची कल्पना होती का?''

तिचा हा प्रश्न मला पोरकट वाटला. मी उत्तरलो, ''असेल किंवा नसेल. मला त्याची कल्पना नाही. तिचं त्याच्यावर प्रेम होतं इतकंच मला माहीत आहे. बाकीचे माझे तर्क आहेत.

पाहिलेला तो प्रसंग सारखा मला आठवतो आहे.''

सुमित्रा गोखले चित्रासारखी स्तब्ध बसून माझं बोलणं ऐकत होती. थोडा वेळ कोणी काहीच बोललं नाही. मग तिनं शुष्क स्वरात मला विचारलं, ''तुम्ही तिचा इतका विचार का करता आहात?''

तिच्या स्वरातल्या तटस्थपणाच्या भावनेची मला चीड आली. मी आवेगानं म्हणालो, ''प्रेमासाठी एक माणूस आपला जीव गमावतो, स्वत:ला गळफास लावून घेतो, यात विचार करण्यासारखं काहीच नाही का? तिच्या दिव्य प्रीतीनं मी दिपून गेलो आहे. मृत्यूला मिठी मारणाऱ्या तिच्या उत्कट प्रीतीवर मी प्रेम करू लागलो आहे. वाटतं की, तिच्या प्रियकराच्या दृष्टीनं तिच्या या विलक्षण कृत्याचा अर्थ लावावा. तिच्या जीवनात डोकावून पाहावं.''

''तिच्या प्रियकराच्या दृष्टीनं?'' सुमित्रा गोखलेनं चमकून विचारलं.

तिला माझं बोलणं कळावं म्हणून मी पुन्हा म्हणालो, ''मला वाटतंय की, ती आता माझीच चालतीबोलती प्रेयसी बनली आहे आणि तिनं आत्महत्या केली आहे. अशा वेळी माझ्या मनात कोणते विचार उसळतील याचा मी अंदाज घेतो आहे. एक सुंदर कथा घडवण्याचा मनातल्या मनात प्रयत्न करतो आहे.''

इतकं बोलून मी स्तब्ध झालो. त्या मुलीचाच विचार करीत राहिलो. पाहिलेला तो प्रसंग सारखा पुन्हा पुन्हा आठवू लागलो. आणि सुमित्रा गोखले माझ्याकडे पाहत राहिली. चित्रासारखी स्तब्ध बसून राहिली. आज तिनं इतर विषय काढले नाहीत. कुठल्याही कथेवरील वाद उकरून काढला नाही आणि संगीताचा विषय काढून एखादं गाणंही ती गुणगुणली नाही. मी माझ्याच तंद्रीत असताना ''बरंय, येते.'' असं ती म्हणाली आणि निघून गेली.

दुसऱ्या दिवशी ठरावीक वेळेला ती आली तेव्हाही त्या आत्महत्या केलेल्या मुलीचाच मी विचार करीत होतो. तिचं गळफासाला लटकणारं, हेलकावणारं प्रेत मला दिसत होतं. सुमित्रा गोखलेची मी नीटशी दखल घेतली नाही. हातानंच तिला बसायला सांगून मी पूर्वीसारखा बाहेर पाहू लागलो. हे बघून शुष्क स्वरात तिनं विचारलं, ''अजूनही त्या मुलीचाच विचार करता आहात का?''

''होय.''

आणि मी तिच्याकडे पाहिलं. ती भकासपणे आता बाहेर पाहू लागली होती. कसला तरी विचार करू लागली होती. मी आश्चर्यानं विचारलं, ''तुम्ही कसला विचार करता आहात?''

''त्या मुलीचा.'' ती खिन्नपणे माझ्याकडे पाहत म्हणाली, ''खरंच, माणूस प्रेम का करतो?''

मी हसून म्हणालो, ''सुमित्राबाई, या प्रश्नाचं उत्तर आजतागायत कुणाला सापडलेलं नाही.''

ती शांतपणे ऐकत होती. काही वेळ ती तशीच स्तब्ध बसली. मग एकाएकी माझ्याकडे वळून तिने विचारलं, ''तुम्ही कधी कुणावर प्रेम केलं आहे?''

तिच्या प्रश्नानं मी एकदम दचकलो. तिच्या प्रश्नामागील जिव्हाळ्यानं चमकलो. पण मग उत्तर दिलं, ''कालपासून त्या आत्महत्या केलेल्या मुलीवर मी प्रेमच करतो आहे.''

मला एकदम मध्येच अडवून ती म्हणाली, ''तसं नव्हे! खरंखुरं प्रेम-''

''मग हे काय खोटं आहे? तिनं आपल्या प्रियकरावर खरंखुरं प्रेम केलं नाही काय? त्या खऱ्याखुऱ्या प्रेमावरच मी–''

''नव्हे! ते नको!'' पुन्हा तिनं मध्येच अडवलं. ''तुम्ही कुणा मुलीवर केलेलं प्रेम-''

मी उलट तिलाच विचारलं, ''तुम्ही हा प्रश्न मला का विचारता आहात?''

तिनं चटकन उत्तर दिलं नाही. पूर्वीप्रमाणं ती शून्यपणे बाहेर बघत राहिली आणि मग काही वेळानं माझ्याकडे दृष्टी वळवून विलक्षण आवेगानं पुटपुटली, ''कारण–कारण मीही एकावर प्रेम केलं आहे.''

सुमित्रा गोखलेच्या या शब्दांबरोबर तिच्याविषयीचा आजवरचा परकेपणा जळून खाक झाला. एखाद्या कथेतल्या नायिकेविषयी जो जिव्हाळा संचारतो तो सुमित्रा गोखलेविषयी माझ्या मनात संचारला. तिच्या जीवनात डोकावून पाहण्याची अनिवार इच्छा माझ्या मनात उत्पन्न झाली. कुतूहलानं मी तिला विचारलं, ''मग पुढं काय झालं?''

''पुढं काहीच झालं नाही.'' ती शुष्कपणे उत्तरली, ''माझं त्याच्यावर प्रेम होतं. फार फार प्रेम होतं. मी त्याच्याशी लग्नदेखील करणार होते. आरंभी त्याचाही माझ्यावर फार लोभ होता. पण पुढं तो मला विटला; टाळू लागला. एका दुसऱ्याच मुलीशी त्यानं जमवलं. तिच्याशी लग्न करून तो आता मोकळा झाला आहे.''

सुमित्रा गोखले बोलायची थांबली आणि तिच्याविषयीच्या सहानुभूतीची एक लाटच्या लाट माझ्या मनात उसळली. तिचं आणि माझं आजवरचं औपचारिक नातं संपुष्टात आलं आणि तिच्याविषयीच्या जिव्हाळ्यानं माझं मन दाटून गेलं. तिच्या संथ शब्दांनी माझ्या मनाचा कोपरा आणि कोपरा व्यापून टाकला. आयुष्यात फटका खाल्लेल्या त्या तरुण मुलीविषयी मला करुणा वाटू लागली. माझं मनच सुमित्रा गोखलेमय झालं. व्यथित मनानं मी एकेरीवर येऊन तिला म्हणालो, ''तू हे मला आधीच कां सांगितलं नाहीस?'' परंतु ती काहीच बोलली नाही. भकासपणे मला न्याहाळू लागली; मग गोरीमोरी होऊन बाहेर बघू लागली.

रडवेली, गोरीमोरी झालेली सुमित्रा गोखले त्या दिवशी प्रत्यक्षात निघून गेली तरी ती माझ्याचबरोबर होती आणि तिच्यात आता एक वेगळाच कायापालट झाला होता. ती स्वैरपणे वेड्यासारखी माझ्याशी कितीतरी बडबडत होती, माझ्याशी लगट करू पाहत होती, माझ्या अधिकाधिक जवळ येत होती. आणि मी तिच्या प्रत्येक कृतीला प्रतिसाद देत होतो. मग ती लाजत लाजत माझी प्रेमयाचना करू लागली; लग्न करण्यासाठी माझी मनधरणी करू लागली; आणि मी शब्दांची खोटी आश्वासनं देऊन तिला चकवू लागलो. माझ्या शब्दांवर भोळेपणानं विश्वास ठेवून ती प्रेमभराने माझी चुंबनं घेऊ लागली, त्याचबरोबर सुखदु:खांच्या लाटांवर लाटा माझ्या मनात उसळू लागल्या...

आणि मग फसल्याची जाणीव झाल्यानंतर गळफास लावून घेऊन आत्महत्या करणारी

सुमित्रा गोखले!...फासाला लटकलेल्या त्या प्रेताऐवजी, सुमित्रा गोखलेचा लटकणारा, हेलकावणारा देह मला दिसू लागला. आणि मी शहारून गेलो! तिचा तो निर्जीव, भेसूरपणे हलणारा देह पाहून दु:खावेगानं माझं मन फाटून गेलं. पश्चात्तापानं पोळलेल्या अंत:करणानं सुमित्रा गोखलेच्या नावानं मी मनातल्या मनात टाहो फोडू लागलो...

त्या रात्री स्वत:ला आवरणं मला अशक्य झालं. मी टेबलापाशी बसलो आणि समोरचे कागद पुढं ओढले. आणि मग मनातल्या भावनांच्या समुद्रातून भाषेचा ओघच्या ओघ कागदावर वाहू लागला. शब्दांचा सैरावैरा लोंढाच्या लोंढा आला आणि त्यातून सुमित्रा गोखले आकार घेऊ लागली. तिचं भोळंभाबडं व्यक्तिमत्त्व त्यातून साकार होऊ लागलं. त्या मुलीच्या आत्महत्येपासून अंधुकपणे मनात वावरत असलेली ती कथा एखाद्या चित्रासारखी कागदावर उतरू लागली. आणि किरकोळ, सर्वसामान्य माणसांप्रमाणं दुबळं प्रेम करणाऱ्या सुमित्रा गोखलेच्या व्यक्तिमत्त्वाला, प्रेमासाठी आत्महत्या करणाऱ्या धीरोदात्त नायिकेच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाचा मुलामा चढू लागला...देहभान विसरून रात्रभर मी लिहीत होतो. पहाटे थकून मी टेबलावर डोकं टेकलं...

सुमित्रा गोखले दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे आली. तेव्हा थकल्यासारखा मी लोळत पडलो होतो. येताच टेबलावर लिहून ठेवलेले कागद तिने पाहिले. माझ्याशी एक शब्दही न बोलता कुतूहलानं ती ते वाचू लागली. ती वाचत असताना मी तिच्याकडे पाहत राहिलो. वाचता वाचता तिचा चेहरा किंचित फुलला. वाचून होताच हातातले कागद तिनं पुन्हा होते तसेच टेबलावर ठेवले आणि संथपणे तिथंच खुर्चीवर बसत तिनं विचारलं, ''हे सगळं तुम्ही काय लिहिलं आहे?''

''तुला कळलं नाही काय?''

''कळलं थोडंसं. त्यातला माझ्याविषयीचा भाग तेवढा कळला. माझ्या जीवनात लिहिण्यासारखं असं काय आहे?''

''काहीच नाही?'' मी आश्चर्यानं विचारलं.

''ठीक आहे. कथा कधी पुरी होईल?''

मी खिन्नपणं उत्तरलो, 'कुणास ठाऊक? खरं सांगू का? रात्री देहभान विसरून मी हे लिहिलं. परंतु त्या कथेला हवा तो आकार आलेला नाही. त्या शोकांतिकेत आवश्यक तो आवेग येत नाही. पश्चात्तापानं पोळलेल्या नायकाच्या अंत:करणाचं दु:ख त्यात प्रकर्षानं प्रकट होत नाही. माझ्या मनातला हवा तो आशय कागदावर उतरलेला नाही. असं का व्हावं? मी तुझ्या भावनाशी पुरता समरस झालो नाही की काय? की तुझं दु:खच पुरतेपणी मला कळलं नाही? की माझं शब्दसामर्थ्यच लंगडं पडलं? माझी प्रतिभाच पंगू आहे का? सुमित्रा गोखलेचं दु:ख, तिच्या वेदना साकार करण्याइतकंही सामर्थ्य तिच्यामध्ये नाही?''

बोलता बोलता धडपडत मी उठून उभा राहिलो आणि असहायतेनं तिच्याकडे पाहू लागलो. माझ्या प्रतिभेच्या कक्षेत ती मावत नसल्याची जाणीव मला असह्य झाली. माझ्या

प्रतिभेच्या दौर्बल्याच्या कल्पनेनं मला रडू कोसळलं...

सुमित्रा गोखले टक लावून माझ्याकडे पाहत होती. थक्क झाल्यासारखी मला न्याहाळीत होती. मग एकाएकी तिचा चेहरा केविलवाणा दिसू लागला. क्षणार्धात ती गोरीमोरी झाली. कसले तरी कढ तिला अनावर आले. आवेगानं तिचे डोळे भरून आले. संथ शब्दांत ती म्हणाली, ''तुम्हाला मी एक सांगू का?''

तिचं काहीही ऐकण्याच्या मन:स्थितीत मी नव्हतो. तरी विचारलं, ''काय?''

ती घुटमळली. काही वेळ काहीच बोलली नाही. मग त्याच संथ स्वरात पुन्हा म्हणाली, ''तुम्ही रागावणार तर नाही?''

तिच्या बोलण्यानं मी व्यथित झालो. मी तिच्यावर रागावण्याची कशी शक्यता होती? ''सांग ना काय ते!'' असे म्हणून मी तिच्याकडे पाहू लागलो.

चित्रासारख्या स्तब्ध असलेल्या सुमित्रा गोखलेनं जागच्या जागीच किंचित चाळवाचाळव केली. तिचे डोळे पुन्हा भरून आले आणि काही वेळानं तिचे संथ शब्द उमटले, ''मी तुमचा एक फार मोठा अपराध केला आहे–तुमची उगाच फसवणूक केली आहे-''

आता मी तिच्याकडे विस्मयानं पाहू लागलो. तिच्या विचित्र, गूढ बोलण्यानं बुचकळ्यात पडलो. वाटू लागलं, सुमित्रा गोखले आपल्याला अजूनही समजली नाही की काय? आत्यंतिक जिव्हाळ्याच्या स्वरात मी तिला म्हणालो, ''तुला काय म्हणायचं आहे? काही सांगायचं आहे का? तुला माझा अजूनही कसला संकोच वाटतो आहे?...''

''नाही, तसं नव्हे! तुम्ही उगाचच गैरसमज करून घेता आहात. मला काही दुसरंच सांगायचं आहे-''

''मग सांग ना.''

सुमित्रा गोखले काही क्षण स्तब्ध बसली आणि मग मनाचा हिय्या करून घाईघाईनं म्हणाली, ''मी तुम्हाला परवा जे सांगितलं ना, ते सगळं खोटं आहे. मला कुणी फसवलेलं नाही. तशा कुणावरही मी कधी प्रेम–प्रेम केलेलं नाही. मी उगाचच वेड्यासारखं काहीतरी तुम्हाला सांगितलं.''

तिचं हे बोलणं ऐकून मला विलक्षण धक्का बसला. मी ओरडून विचारलं, ''तू हे काय बडबडते आहेस?''

''बडबडत नाही. खरंच! ते सगळं खोटं आहे. साफ खोटं.''

माझं डोकं ते ऐकून फिरून गेलं. संतापून मी विचारलं, ''पण का? तू मला खोटं का सांगितलंस?''

ती अडखळत उत्तरली, ''मला–मला खरं–खरं बोलायचं धाडस झालं नाही.''

''खरं?-खरं काय?''

माझ्या या अवतारानं ती भांबावली; आणि मग पुन्हा अडखळत म्हणाली, ''मी तुमच्यावर–तुमच्यावरच–अगदी तुमच्या ओळखीच्या आधीपासून–आधीपासूनच प्रेम...''

मी हे काय ऐकत होतो? सुमित्रा गोखलेच्या प्रेमभंगाची कथाच खोटी होती? तिचं दु:खच

खोटं होतं? तिच्या वेदनाच तकलुपी होत्या? तिच्या स्वरातला भावनांचा आवेगच उसना, कृत्रिम होता? आपल्या भावना उघड बोलून न दाखवता तिनं त्यांना खोटं नाटकी रूप दिलं होतं?

मला काहीच समजेनासं झालं. मी गोंधळलो; भांबावून गेलो. जागच्या जागी थिजून उभा राहिलो. सुमित्रा गोखले आपल्या कृत्रिम भावनाप्रवाहात मला फरपटत कुठं तरी ओढून नेत आहेसं मला वाटू लागलं. तिच्या खोट्या कथेची जाणीव मला गुदमरून टाकू लागली. आणि पाहता पाहता माझ्या मनाची एकदम उलटी क्रिया सुरू झाली. तिच्याविषयी गेले दोन दिवस अकस्मात आलेली सहानुभूतीची लाट तितक्याच गतीनं मागं फिरली; विरून जाऊ लागली. गेले दोन दिवस तिच्याविषयी संचारलेला जिव्हाळाही क्षणार्धात ओसरून जाऊ लागला. गेले दोन दिवस संचारलेला आवेशही एकाएकी संपून गेला. भावना पूर्णपणे थंडावल्या. मन ओकं ओकं झालं. सुमित्रा गोखले मला पुन्हा पहिल्यासारखी परकी वाटू लागली. हाताच्या अंतरावर दोन्ही हातांनी तोंड झाकून बसलेली सुमित्रा गोखले, त्या दिवशी साहित्य-समारंभात दाटीवाटीनं बसलेल्या अनेक श्रोत्यांपैकीच एक वाटू लागली. कोरड्या, शुष्क स्वरात आणि निर्विकारपणे मी तिला म्हणालो, ''हे कसं शक्य आहे सुमित्रा? कसं शक्य आहे?''

# आम्हां चौघांची बाई

४२च्या चळवळीत भूमिगत असताना शिवाला आम्ही आमचा पुढारी मानला होता आणि त्याच्या नेतृत्वाखाली दरोडे घातले होते, विजेच्या तारा तोडल्या होत्या, तुरुंगातून पळालो होतो. खजिने लुटले होते आणि कधी कधी काही बायांचे उंबरठेदेखील झिजवले होते.

चळवळ संपली. आम्ही उजळमाथ्याने वावरू लागलो आणि इतस्तत: पांगलो गेलो. दैनंदिन सहवासाला मुकलो. अझीम पुन्हा आपल्या भेंडीबाजारातल्या कुणा नातेवाइकाकडे राहू लागला. मी जोगेश्वरीला पळालो. रायबाने लालबागला मुक्काम ठोकला आणि शिवाने समाजवादी पक्षाच्या ऑफिसातच आपले बिस्तर टाकले.

परंतु या ना त्या निमित्ताने आम्ही एकमेकांना नेहमी भेटू लागलो आणि आमच्या गत आयुष्याच्या आठवणींना उजाळा देऊ लागलो. आम्हाला भेटलेल्या त्या असंख्य बायांच्या आठवणीदेखील चघळू लागलो.

त्या अनेक बायांतील एक काळी बाई तेवढी आमच्या चांगली स्मरणात राहिली होती. तिच्याविषयी शिवा नेहमी आठवणी काढू लागला होता. तिच्याकडे पुन्हा जायचा विचार बोलून दाखवीत होता.

त्याचा हा विचार आम्हालाही आवडत होता. मोठा आकर्षक वाटत होता. कारण ती बाईच मुळी तशी आकर्षक होती. भरदार अवयवांची आणि बांधेसूद शरीराची होती. तिची त्वचा काळी कुळकुळीत होती. एखाद्या पॉलीश केलेल्या शिसवी लाकडासारखी ती आम्हां साऱ्यांना एकजात भासली होती. आणि मुख्य म्हणजे शिवाची आणि तिची फार चांगली ओळख होती. त्याच्याशी आणि आमच्याशी ती नेहमी फार अदबीने वागत होती. त्यामुळे शिवाने एकदा आपला जायचा विचार बोलून दाखवताच आम्ही साऱ्यांनी तत्काल संमती दिली आणि एक दिवस ठरवून तिच्याकडे गेलो.

त्या दिवशी पुष्कळ दिवसांनी आम्हाला आलेले पाहताच काळीला बराच विस्मय वाटला. ती किंचित चपापली. आश्चर्यचकित झाली. अदबशीरपणे नेहमीसारखे तिने आमचे स्वागत केले आणि तिच्या खोलीत बसलेल्या एकदोन लोकांना नजरेच्या इशाऱ्याने पिटाळून लावले.

त्या दिवशी पुष्कळ दिवसांनी तिच्यात झालेल्या बाह्य बदलाने आम्हालाही स्तंभित केले.

पूर्वीपेक्षा तिचा नोकझोक बराच वाढला होता. काळ्या तुकतुकीत चेहऱ्यावर तिने उगाच सफेत पावडर थापली होती. त्यामुळे ती काहीशी विचित्रच भासत होती आणि कसले तरी भडक अत्तर अंगाला आणि सवंग तेल डोक्याला चोपडू लागली होती. तिच्याभोवती पूर्वीपेक्षा अधिक माणसेदेखील गोळा झालेली होती.

''तिने जोरात धंदा सुरू केला आहे.'' अझीमनं तिथून परतताना आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

''नव्हे! वाढवला आहे.'' मी म्हणालो.

''काही का असेना-मला ती आवडली.'' रायबाने थोडक्यात आपले मत दिले; आणि शिवा काहीच म्हणाला नाही. परंतु तिच्याकडे पुन्हा जायला हरकत नाही असेच आम्ही साऱ्यांनी ठरवले आणि मग वारंवार जाऊ लागलो.

तिच्याकडे आम्ही सतत जाऊ लागलो तेव्हा शिवाला तिच्या बऱ्याचशा गोष्टी खटकू लागल्या. ती तोंडाला फासत असलेल्या पावडरपासून अंगावरल्या वस्त्रांपर्यंत अनेक गोष्टींबद्दलची आपली नापसंती त्याने व्यक्त केली. तिच्याकडे इतर लोकांनी यावे, ही बाबही त्याला आक्षेपार्ह वाटू लागली.

तिने कसे वागावे, कुणाशी संबंध ठेवावेत आणि कुणाला दूर ठेवावे याची आम्हाला फारशी क्षिती वाटत नव्हती. या बाबतीत काही गोष्टी आम्ही गृहीत धरून चालत होतो. तिच्या व्यवसायाला ते वागणे धरूनच होते. त्यात आक्षेप घेण्यासारखे काहीच नव्हते.

परंतु या बाबतीत आम्हा तिघांतदेखील मतभिन्नता होती. अझीमची या बाबतीत ठाम मते नव्हती. त्याला ती कशीही असलेली, कशीही वागलेली चालण्यासारखी होती.

तिने जरा नेटके, स्वच्छ राहावे, उगाच रंगरंगोटी करू नये, असे मलाही वाटत होते. परंतु या माझ्या मताचा आग्रह धरण्याची माझी इच्छा नव्हती. या बाबतीतले तिचे स्वातंत्र्य मी पूर्णपणे मान्य केले होते.

रायबाची मते मात्र अगदीच वेगळी होती. तिच्याकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन वास्तववादी होता. एक भोग्य वस्तू या दृष्टीनेच तिच्याकडे तो पाहत होता आणि तिच्या व्यवसायाला धरून ती वागत असल्याचा निर्वाळा तो देत होता. या बाबतीत आपल्या कल्पना तिच्यावर लादणे म्हणजे स्वत:ला तिच्या अधिक निकट आणल्यासारखे होत असल्याचे त्याचे मत होते. ''रांड ती!'' तो उद्गारला होता, ''तिने रंगरंगोटी करायची नाही तर काय आश्रमातल्या संन्यासिनीसारखे वागायचे?''

तिच्याकडे जाण्याआड मात्र आमची ही मते कधी आली नाहीत. पण आम्ही तिच्याकडे वारंवार जात राहिलो आणि तिचेच वागणे हळूहळू बदलत चालले. तिने रंगरंगोटी करणे हळूहळू सोडून दिले. भडक अत्तराचा वास तिच्या अंगाला येईनासा झाला. केसांना सवंग तेल चोपडायची ती बंद झाली...आणि तिच्याकडे आम्हाला इतर कोणी माणसे आढळेनाशी झाली. तिच्याविषयीच्या आपल्या साऱ्या अपेक्षा पुऱ्या झाल्याचे समाधान शिवाला लाभले.

एवढे सारे तिने आपखुषीने आमच्याकरिता केल्यानंतर आम्हालाही तिच्याशी वागण्याचे

काही नियम करणे आवश्यक होऊन बसले. याही बाबतीत शिवानेच पुढाकार घेतला. त्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार काळीचे हे रहस्य आम्हा चौघांत गुप्त ठेवायचे, शक्यतो दुसऱ्या कुणा बाईकडे जायचे नाही, (बाई म्हणजे तिच्यासारखी बाई. दुसऱ्या 'चांगल्या' बाईकडे जायला मुभा ठेवण्यात आली होती!) तिचा सारा खर्च चौघांनी चालवायचा आणि चौघांखेरीज दुसऱ्या कुणाला सामील करून घ्यायचे नाही, असे आम्ही ठरवले.

यातल्या काही बाबींना रायबाचा सक्त विरोध होता. विशेषत: दुसऱ्या बाईकडे न जायची कल्पना त्याला साफ नापसंत होती. मला तो म्हणाला, ''हा साराच मूर्खपणा आहे. काळीला पोसत बसायची कल्पना काही माझ्या बुद्धीला पटत नाही. माझ्यापुरते विचारशील तर अशा सतरा बायांशी माझे संबंध असतात! ते मी सोडावेत किंवा त्यांना जन्मभर पोसत राहावे याला काय म्हणावे?''

परंतु सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वांतून तो स्वत:ची सुटका करून घेऊ शकला नाही, शिवाच्या म्हणण्याला त्याला संमती द्यावीच लागली.

या साऱ्या प्रकाराबद्दल आमच्या मनात मात्र कधी कधी एक प्रकारची उद्विग्नता निर्माण होऊ लागली. आम्ही चौघांनी एकत्रितपणे एका बाईशी गुप्त संबंध ठेवावेत हे माझ्या मनाला पटेनासे झाले. आमच्यासारख्या स्वातंत्र्यचळवळीतल्या लोकांनी आणि काही एक विशिष्ट राजकीय तत्त्वप्रणाली धारण करणाऱ्यांनी असे चारित्र्यहीनतेने वागावे ही कल्पना मनाला बोचू लागली. परंतु शिवाला माझ्या या शंका पटल्या नाहीत. समाजाकडे पाहण्याच्या दुबळ्या वृत्तीचे ते प्रतीक आहे असे त्याने प्रतिपादन केले. नैतिकतेची चुकीची मूल्ये स्वीकारल्याचा हा परिणाम आहे असे त्याने आमच्या निदर्शनास आणले. आणि त्याचे वैचारिक नेतृत्व आम्ही मान्य केले असल्यामुळे त्याचे हे प्रतिपादनदेखील आम्हाला बिनतक्रार मान्य करावे लागले.

आम्हा सर्वांत शिवाच तिच्यावर अधिक खूष झाला होता. तिच्याकडे अत्यंत सहानुभूतीने पाहत होता. तिच्या अडचणीचे अत्यंत तत्परतेने निवारण करीत होता. तिच्या चांगुलपणाची तोंड भरून स्तुती करू लागला होता.

परंतु तिच्याविषयी त्याच्या काही वेगळ्याच भावना आहेत असे आम्हाला मागाहून जाणवू लागले. एका सामान्य बाईपेक्षा ती काहीतरी वेगळी आहे अशा भावनेने तो तिच्याशी वागू लागल्याचे आम्हाला कळून आले. आमच्या तिच्याशी असलेल्या संबंधापेक्षा काही तरी वेगळे, नाजूक संबंध शिवा आणि ती यांच्यात प्रस्थापित झाले असावेत असा आम्हाला संशय येऊ लागला आणि रायबा शिवाच्या व तिच्या या नाजूक भावनांची आमच्यापाशी थट्टा करू लागला.

परंतु या भावना केवळ एकतर्फी नसल्याचेही आमच्या हळूहळू लक्षात येऊ लागले होते. काळीच्या त्याच्याविषयीच्या कल्पनादेखील वेगळ्या होत्या. ती त्याच्या भावनांना नेहमी प्रतिसाद देत होती. आम्हा साऱ्यांशी ती एका विशिष्ट मापाने वागत होती; आमच्याशी शृंगार करीत होती आणि आमच्या पैशांची आपल्यापरी परतफेड करण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु त्याच्याशी वागताना ती तेच माप सर्रास लावायला विसरत होती. त्याच्यावरून

मिळणाऱ्या पैशाविषयी ती आम्हाला बेफिकीर दिसू लागली. नव्हे, त्याच्याकडून असल्या बिदागीची अपेक्षाच करीनाशी झाली. त्याच्या अस्तित्वाने अधिक खुलून जाऊ लागली आणि बरेच दिवस तो न फिरकल्यास चिंतातुर होऊन आम्हाला विचारू लागली, ''शिवा कुठं आहे? बरेच दिवस येत नाही तो! तब्येतीने बरा आहे ना?''

त्या दोघांचे संबंध हे असे गुंतागुंतीचे बनत चालले आणि इकडे आमच्या संबंधात हळूहळू बराच फेरबदल होऊ लागला. अझीम पूर्वीसारखा आमच्यात अधिक वावरेनासा झाला. समाजवादावरील त्याचा विश्वास उडाला...धर्मातीत राजकारण म्हणून काही एक चीज त्याला आकलन होईनाशी झाली. भारतावरील त्याची निष्ठा डळमळली... पाकिस्तानची निर्मिती मुसलमानांच्या उन्नतीकरिता आवश्यक असल्याबद्दल आता त्याची खात्री पटून गेली.

इतक्या झपाट्याने त्याचे मतांतर होत गेले की तो आम्हाला भेटायचा बंद होऊन पाकिस्तानात कधी निघून गेला याची आम्हाला काही दिवस दाददेखाल लागली नाही. कराचीहून त्याचे मला चार ओळीचे पत्र आले. तेव्हाच त्याच्या अचानक नाहीसे होण्याचे कारण आम्हाला कळून आले.

त्याच्या या अत्यंत विसंवादी वर्तनाने मला धक्का बसला. शिवाला अत्यंत उद्वेग वाटू लागला. रायबा नुसता हसला. जणू असे कधी तरी होणार हे त्याला आधीपासूनच माहीत होते. परंतु त्याबद्दल काही विशेष वाटून घ्यायचीही त्याची तयारी नव्हती. माणसातली ही अतिरिक्त विसंगती त्याने पुरती समजून घेतली होती. आम्ही तडफडलो, अझीमला चार शिव्या घातल्या. त्याच्या मूर्खपणाला दोष दिला. परंतु तो काहीच म्हणाला नाही. आमचे बोलणे संपताच त्याने समारोप केला, ''चालायचेच! त्यात एवढे वाटून घेण्यासारखे काहीच नाही. तो तसा कच्चाच होता. त्याला मते अशी नव्हतीच! राजकारणापासून काळीपर्यंत तो आपल्या मागे येत होता. परंतु आता त्याने येण्याचे नाकारले, एवढेच!'

अझीमच्या विचित्र वागण्याचे त्याने केलेले हे विश्लेषण आम्ही आमच्या समाधानाखातर गृहीत धरून चाललो. परंतु काळीला मात्र ते शक्य झाले नाही. तो असा एकाएकी निघून गेला यावर आधी तिचा विश्वासच बसला नाही. परंतु शिवाने सांगितल्यानंतर तिला ते खोटेही म्हणता येईना. तो असा अचानक, न सांगता निघून जावा याचा तिला फार संताप आला. आपल्याला त्याने फसवले, वंचित केले असा तिने स्वत:चा समज करून घेतला. आम्ही सारेच कधी ना कधी असे अझीमसारखे अदृश्य होऊ असा तिच्या मनाने कयास बांधला. तिचे आमच्याशी वागणे बदलले. ती रूक्ष बनली. थंड्या वृत्तीने आमचे स्वागत करू लागली. आमचे अस्तित्व तिला फारसे जाणवेनासे झाले. आमची तिला विशेष पर्वाच वाटेनाशी झाली. आमच्याशी ती एकप्रकारे फटकूनच वागू लागली.

तिच्या स्वभावातल्या या फरकाने रायबा चटकन सावध झाला. खरे म्हणजे तो पहिल्यापासून संतुष्ट नव्हताच आणि तिच्याशी असलेले आपले संबंध तोडून टाकण्याची संधीच शोधीत होता. ती त्याने यावेळी घेतली. तो तिच्याकडे जायचा मंदावला. जाईनासा

झाला. तीदेखील एका अक्षराने त्याचा उल्लेख करीनाशी झाली.

तिच्या या विक्षिप्त वागण्याची झळ शिवाला मात्र लागत नव्हती. तिने त्याचा सर्वच बाबतीत अपवाद केला होता. तो आपल्याला दगा देणार नाही, असा फसवणार नाही याविषयी तिला पुरी खात्री होती. त्याचे ती पूर्वीसारखे हसऱ्या चेहऱ्याने स्वागत करीत होती. आणि रायबा तिच्याकडे यायचा बंद झाल्यानंतर तिच्या या रोषाचा धनी व्हायची पाळी माझ्या एकट्यावर आली.

ते मलाही आवडले नाही आणि हळूहळू मीही तिच्याकडे जायचा बंद झालो. ते ऐकून रायबा मला म्हणाला, ''बरे केलेस! तिच्या बाबतीत प्रथमपासूनच आपले चुकत गेले. परंतु अझीमने आपल्याला चूक सुधारायची संधी दिली. त्याच्यामुळे आपला केवढा फायदा झाला बघ! त्या किळसवाण्या प्रकारातून एकदाची स्वत:ची सुटका तरी करून घेता आली!''

पण शिवाला हे मानवले नाही. त्यानंतर काही दिवसांनी आम्ही तिघे एकत्र आलो, तेव्हा तो आम्हाला म्हणाला, ''काळीने तुम्हा दोघांना बोलावले आहे!''

''ते कशाला बरे?'' रायबा खेकसला, ''पैसे कमी पडले काय?''

''असतीलही!'' मी म्हणालो, ''पण त्याकरता आमची आवश्यकता आहेच असे नाही. तसे नसते तर तिने आमच्याशी असे घाणेरडे वर्तन केले नसते!''

''तुम्ही लोकांनी तिच्याविषयी उगाचच चुकीची कल्पना करून घेतली आहे.'' शिवाने म्हटले, ''अझीमने काही शिष्टाचार पाळायला नको होते? काही सभ्यपणा दाखवायला नको होता? आपल्याला विश्वासात घ्यायला नको होते?''

''हवे होते ना! पण या साऱ्या गोष्टींशी तिचा फार कमी संबंध आहे.'' रायबा मध्येच म्हणाला.

''का बरे? तिनं शिष्टाचाराची अपेक्षा करणं चूक कसं? आपण चौघांनी तिची जबाबदारी घेतली होती? आठवते?''

''चांगले आठवते!'' रायबा.

''अझीमने ती मोडली नाही?'' शिवा.

''आणि तिने काय ती पाळली? ती आपल्या साऱ्यांशी सारखीच वागत होती? आमच्याशी असलेले तिचे संबंध आणि तुझ्याशी असलेले संबंध यात फरक नव्हता? अझीम गेल्यानंतरदेखील ती तुझ्याशी एकाच मापाने वागली?''

रायबाच्या या प्रश्नांच्या भडिमाराला शिवाने लागलीच उत्तर दिले नाही. तो किंचित गंभीर झाला. मग काही वेळाने म्हणाला, ''ती माझ्याशी वेगळी वागते हे मला मान्य आहे. पण त्याला दोन कारणे आहेत. एक तर मी तिला पहिल्यापासून, तुमच्या आधीपासून ओळखतो. आणि दुसरे म्हणजे तिला माझा विश्वास वाटतो. हा आपल्याला फसवणार नाही असे वाटते. तुमच्याविषयी तिला तसे वाटत नाही.''

''मग ठीक आहे.'' रायबा कोरड्या सुरात उद्गारला, ''कटकटच गेली. विश्वास वाटत नाही म्हणजे मग प्रश्नच संपला.''

''असे नाही. असेच काही नाही!'' शिवा पुन्हा गयावया करून बोलू लागला. ''अझीम गेल्यानंतर तिला तसे वाटले. आता नाही वाटत. तुम्ही दोघांनी जरा समजून घ्या सारे-''

''तिला पैसे हवे आहेत एवढेच ना?''

''नाही. तुम्ही तिच्याकडे यावे अशी तिची इच्छा आहे. तिचे वागणे समजून घ्यावे-''

''हट्!'' रायबा त्वेषाने उद्गारला, ''असल्या य:कश्चित हेंगाड्या बाईचे म्हणणे मला बिलकूल ऐकून घ्यायचे नाही. हमीदला ऐकायचे असेल तर त्याने ऐकून घ्यावे.'' आणि असे म्हणून तो उठून त्वेषाने तिथून निघून गेला.

''निदान तू तरी चल.'' शिवा आवाजात शक्य तितकी अजीजी आणून मला म्हणाला आणि त्यावरून 'ती फारच अडचणीत सापडली असली पाहिजे' एवढे अनुमान काढायला मला वेळ लागला नाही. तिच्याविषयी मला सहानुभूती वाटू लागली. परंतु तसा एकदम होकार देणे माझ्या स्वाभिमानाच्या विरुद्ध झाले असते. म्हणून मी म्हणालो, ''मला विचार केला पाहिजे.''

''त्यात विचार कसला करायचा आहे?'' शिवाने माझा दुबळा मनोनिग्रह ओळखून म्हटले, ''तू तिला भेट तर खरा! म्हणजे माझ्या म्हणण्याची तुला प्रचीती येईल.'' आणि त्याने मला जवळ जवळ तिच्याकडे चलायची सक्ती केली. त्याच्याबरोबर उठून मी चालू लागलो. तसाच त्याच्याबरोबर तिच्या घरी गेलो. मला तिच्यापुढे ढकलीत तो एक मोठी कामगिरी पार पाडल्याच्या आविर्भावात तिला म्हणाला, ''एकाला तरी आणला! आता झाले तुझे समाधान?''

ती माझ्याकडे पाहून नुसती हसली; काहीच म्हणाली नाही. तिचे पूर्वीचे गुबगुबीत शरीर बरेचसे ओसरून गेले असल्याचे तिच्याकडे लक्षपूर्वक पाहिल्यानंतर माझ्या लक्षात आले. ती उदास, दु:खी दिसत असल्याचे मला जाणवून आले. परंतु त्या उदासीनतेचे कारण शोधायच्या फंदात मी पडलो नाही. सहज म्हणून मी विचारले, ''कसे काय? मजा आहे ना?''

''नका असं बोलू!'' ती आपल्या हेंगाडी स्वरात एकदम भावनावश होऊन म्हणाली. एव्हाना शिवा कुठे बाहेर सटकला आणि तिच्या त्या ताणलेल्या भावनांचा भडिमार मला एकट्याला सहन करावा लागला. तिचा आवाज चिरका बनला; गदगदून बाहेर पडू लागला.

''मी चुकले!' पश्चात्तापाच्या त्या क्षणाला ती म्हणाली, ''आता तुमच्याशी मी अशी वागणार नाही! कधीच वागणार नाही!''

तिला अशी असहाय झालेली, माझ्यापुढे लोटांगण घालताना पाहून प्रथम मला खूप बरे वाटले आणि मागाहून करुणा आली. ''उगाच रडू नकोस!'' मी म्हणालो. ''मी तर सारे विसरून गेलो आहे.'' आणि त्या दिवसापासून मी पुन्हा अधूनमधून तिच्याकडे खेप टाकू लागलो.

परंतु तिच्यात आता फार चमत्कारिक बदल झाला असल्याचे मला जाणवू लागले. ती सदाच गंभीर राहू लागली. उदास दिसू लागली. पूर्वीसारखी मोकळेपणे वागेनाशी झाली.

तिला याविषयी विचारले तेव्हा ती नुसती हसली; गंभीरपणे हसली. काही म्हणालीच नाही. मीही अधिक खोलात शिरलो नाही.

परंतु पुढे पुढे तिचा साराच नूर पालटत गेला. तिच्या अंगावरची उंची वस्त्रे हळूहळू दिसेनाशी झाली, जागेचे भाडे थकू लागले. पैशांची तिला सतत चणचण भासू लागली. आणि आपला पूर्वीचा सारा गर्व फेकून देऊन ती माझ्यापाशी अधिक पैशांची मागणी करू लागली.

''तुम्हां दोघांशिवाय मला कुणाचाच आधार नाही.'' ती म्हणू लागली, ''दुसरे काहीच साधन उपलब्ध नाही.''

मी थंडपणे तिला म्हणालो, ''दोघेच का बरे?'' आणि तिच्या तोंडाकडे पाहिले.

''मग काय?'' ती रूक्षपणे हसून उद्गारली, ''आता कोणी ढुंकूनदेखील बघत नाही माझ्याकडे. पूर्वीचे संबंध मी तुम्हा लोकांसाठी तोडले ते आता जुळत नाहीत. आणि जसजसे वय होते आहे तसतसे नवीन कोणी यायला तयार होत नाही.''

मी काहीच उत्तरलो नाही. मग तिनेच एकाएकी विचारले. ''तुमचे दोस्त काय करतात?''

''कोण रायबा?'' मी विचारले.

''होय.''

''मला काय माहीत? बरेच दिवस मला तो भेटला नाही.''

''पण मला माहीत आहे''-ती म्हणाली, ''ते दुसऱ्या बायांकडे जातात.''

''तुला काय माहीत?''

''शिवाने सांगितले.''

''त्याला तरी कसे कळले?''

''रायबानेच सांगितले. तो म्हणाला, मी काय करावे आणि काय करू नये हे मी ठरवणार. इतर बाया मला सुख देतात. काळी तसे देऊ शकत नाही. म्हणून मी त्यांच्याकडे जातो.''

रायबाचे काळीविषयीचे म्हणणे मात्र तंतोतंत खरे होते. तिच्या त्या सदासर्वकाळ संत्रस्त चेहऱ्याकडे आणि ओसरू लागलेल्या शरीराकडे पाहून काही क्षण सुखात घालवण्याची कल्पना हळूहळू माझ्या मनात येईनाशी झाली...त्या सहवासाची पूर्वीसारखी ओढ वाटेनाशी झाली. सावकाश तिच्याविषयी माझ्या मनात तिरस्कार निर्माण झाला. मी तिला भेटायचा बंद झालो. आणि शिवा मला तिच्याकडे जायला भाग पाडील या भीतीने त्यालाही भेटायचे टाळू लागलो.

आणि पुढे माझ्या आयुष्याला एक वेगळीच कलाटणी मिळाली. एका मुलीने माझ्या आयुष्यात प्रवेश केला आणि मी पार बदलून गेलो. पूर्वीचे सारे ऋणानुबंध विसरून गेलो. सारा भूतकाळच माझ्या मनातून नष्ट झाला. फक्त ती मुलगी तेवढी राहिली. तिच्याशिवाय मला दुसरे काही दिसेनासे झाले, काही कळेनासे झाले. माझा वेळ तिच्या सहवासात जाऊ

लागला. अखेर यथावकाश मी तिच्याशी लग्न केले.

शिवा लग्नाला आला होता. रायबाही हजर राहिला होता. हे दोघे तर अनेक दिवसांनी त्या निमित्ताने एकत्र आले होते. परंतु दोघे एकमेकांना टाळू पाहत होते! रायबा बेफिकीरपणे एका टोकाला बसून सारख्या सिगारेटी ओढीत होता. शिवा त्याच्या जणू खिजगणतीतच नव्हता.

शिवा मात्र अस्वस्थ दिसत होता. सारखा बसल्या जागेवरून माझ्याकडे पाहत होता. कधी एकदा हा निकाचा सोहळा संपतो असे त्याला झाले होते. निका संपताच तो माझ्याजवळ आला, तेव्हा मीच म्हणालो, ''सॉरी, बायकोची ओळख करून देता आली नाही. ती आत आहे.''

''काही हरकत नाही. पुन्हा भेटेन केव्हातरी! फक्त सांगायचे एवढेच की, मित्रांना विसरू नकोस.''

''अरे वा! कसा विसरेन?'' मी वरवर उद्गारलो. परंतु त्याची मैत्री चिरंतन राहावी अशी इच्छा माझ्या मनात नव्हती.

तो गेल्याचे रायबा बसल्या जागेवरून पाहत होता. मग तो उठून माझ्याकडे आला.

''अभिनंदन!''

''थँक्यू.''

''शिवा काय सांगत होता?''

''मित्रांना विसरू नकोस.''

''आणि त्या हेंगाडणीला?'' तो तिरस्काराने म्हणाला, ''तुला सांगतोय. तुझे लग्न झालेय. चांगला सुखाने संसार कर! त्या काळीचा नाद सोडून दे!''

''तुझा उपदेश स्तुत्य आहे. आणि तो पाळायचेही मी ठरवले आहे. नव्हे, आधीपासूनच अंमलात आणला आहे. परंतु तुझ्या बाबतीत मी काय काय ऐकले!-ते सारे खरे आहे?''

''तंतोतंत खरे!''

''असे का?''

''ते असेच असायचे! हे बघ! मी कलंदर मनुष्य आहे. आजवर कुणाच्या बंधनाला मी जुमानलेले नाही. कुठले आदर्श फारसे मानायच्या फंदात पडलेलो नाही. ज्या ज्या वेळी मनाला जे जे पटत गेले त्या त्या वेळी ते ते करीत गेलो आणि पुढेही करीत राहणार-''

तेवढ्यात माझी बायको दरवाजात येऊन उभी राहिली आणि तो गप्प राहिला. अधिक वेळ न थांबता लगेच तो तिथून निघूनही गेला.

लग्न झाले आणि माझा संसार सुरू झाला. त्या नवथर काळात मी जगाला विसरूनच राहिलो. माझ्या संसारात मश्गुल झालो. तासनतास बायकोच्या सहवासात व्यतीत होऊ लागले. घरात आणि बाहेर सतत ती माझ्याबरोबर राहू लागली. तिच्या संगतीतल्या रात्री मला पुलकित करू लागल्या.

त्या दिवसांत काळीशी असलेल्या माझ्या संबंधाच्या आठवणीही मला किळसवाण्या वाटू

लागल्या. आपल्या आयुष्यातला तो एक अत्यंत गलिच्छ भाग असल्यासारखे मला वाटू लागले. तो मूळातच विसरून जाण्याची मी पराकाष्ठा करू लागलो.

परंतु एक दिवस बायकोबरोबर सहज रस्त्याने फिरत असताना लांब मला शिवा दिसला आणि नकोशा वाटणाऱ्या आठवणी एकदम मनात दाटल्या. विसरलेले चारित्र्य एकाएकी नजरेसमोर उभे राहिले. मला स्वत:ची लाज वाटू लागली आणि शिवाचा तिरस्कार मनात दाटला. त्याला टाळायचा मी प्रयत्न करू लागलो. सरळ दुसरा रस्ता पकडला. परंतु त्याने मला नेमके हेरले आणि माझ्यासमोर येऊन तो उभा राहिला. अनिच्छेनेच मी त्याची बायकोशी ओळख करून दिली.

''आहेस कुठे?'' त्याने विचारले.

''इथेच!''

''बायको सोडीत नाही?''

त्याचे हे बोलणे माझ्या बायकोला आवडले नाही. ती मला तिथून निघायला खुणा करू लागली.

''तुझ्यापाशी माझे काम होते.'' तो पुढे म्हणाला.

''काय आहे? बोल ना!''

परंतु तो काही क्षण गप्प राहिला. माझ्या बायकोकडे त्याने एकदा पाहिले. त्याला तिची अडचण होत असल्याचे माझ्या लक्षात आले.

''काळेने तुला बोलावले आहे-'' तो अखेर म्हणाला.

''काळे?''

''काळे-मि. काळे.'' त्याने पुन्हा म्हटले आणि उगाच डोळे मिचकावले आणि मग माझ्या डोक्यात प्रकाश पडला.

''त्याला सांग, सध्या मला भेटता येणार नाही.''

''पण–पण नुसते भेटायला-''

''नो नो! सध्या शक्यच नाही!'' असे म्हणून मी त्याला वाटेला लावले. बायकोच्या हजेरीत त्याने आपल्याशी काळीचा सरळ उल्लेख केला नाही हे मला बरे वाटले. त्यानंतर तो दोनतीनदा असाच भेटला तेव्हा बायकोचा मला असाच ढालीसारखा उपयोग झाला. तिच्या अस्तित्वाचे संरक्षण लाभू लागले. कारण तो तिच्यासमोर काळे या नावानेच काळीला संबोधू लागला. 'काळेला फार वाईट दिवस आलेत!', 'एकदा तरी काळेला भेटून ये!' इतपत तो तिच्याविषयी माझ्यापाशी बोलू लागला.

परंतु माझ्या बायकोला मात्र या काळेचे विलक्षण कुतूहल वाटू लागले. मी तिला उडवाउडवीची उत्तरे दिली आणि एक दिवस शिवा असाच भेटल्यानंतर तिच्याविषयी बोलू लागला, तेव्हा त्याला दंडाला धरून मी एका बाजूला नेऊन सांगितले, ''कृपा करून हा प्रकार थांबव!''

त्याने मला एकदा आपादमस्तक पाहिले. मग आवाजात भावनाविवशता आणून तो

उद्गारला, ''तिची अवस्था फार वाईट आहे.''

''असू दे! मी आता काही करू शकत नाही.''

''तू येऊ नकोस. निदान काही पैसे तरी!''

''नो! मी काहीच करणार नाही. काही करू इच्छीत नाही. मला पुन्हा काही विचारू नकोस! याकरिता भेटू नकोस.''

तो गप्प राहिला. एक आवंढा गिळून हताशपणे माझ्याकडे पाहू लागला.

''हे बघ! काळीशी असलेल्या माझ्या संबंधाची मला शरम वाटते. माझ्या आयुष्यातली ती एक किळसवाणी बाब आहे असे वाटते. माझ्या चारित्र्यावरचा एक कलंक वाटतो. आणि तो धुऊन टाकण्याचा मी प्रयत्न करतो आहे. ते सारे पूर्वीचे विसरून जातो आहे. स्वत:ची त्या किळसवाण्या प्रकारातून मला सुटका करून घ्यायची आहे. तू कशाला मला त्यात पुन्हा अडकवतो आहेस?''

माझ्या या बोलण्याचा त्याच्या मनाला बसलेला धक्का त्याच्या चेहऱ्यावर उमटला. त्याच्या मनाला खूप झालेल्या वेदना त्याच्या डोळ्यांत प्रकट झाल्या. काही क्षण दगडासारखा निश्चल असा तो माझ्यापुढे उभा राहिला. ''तुला सारे किळसवाणे वाटते?'' तो पुटपुटला.

''होय.''

''तुझी खात्री आहे?''

''होय–होय–होय.''

''ठीक आहे. यापुढे तुला मी काळीच्या वतीने काही सांगायला येणार नाही.''

'थँक्स-मेनी मेनी थँक्स!' मी म्हणालो. परंतु माझे थँक्स घ्यायलाही तो तिथे थांबला नाही. माझ्याकडे त्याने पाठ वळवली आणि सावकाश चालत तो रस्त्यावरल्या गर्दीत मिसळला; दिसेनासा झाला.

''त्या काळेच्या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावला.'' मी बायकोचे विलक्षण शिगेला पोहोचलेले कुतूहल शमविले. ''लेकाचा सारखा पैशांची याचना करतो आहे. याच्या बापाचा मी काय देणेकरी लागतो आहे?''

त्यानंतर मात्र शिवाने पुन्हा माझ्यापाशी काळीचा विषय कधी काढला नाही. पुन्हा येऊन मला कधी सतावले नाही. तिच्याकडे चलायचा आग्रह केला नाही आणि तिच्या वतीने पैशाची मागणी केली नाही. कधी रस्त्यात दिसताच दुरूनच नाहीसा होऊ लागला. आणि एखादेवेळी अचानक समोरासमोर गाठ पडलीच तर मामुली चार शब्द बोलून तो पुढे सटकू लागला आणि दुरान्वयाने का होईना, काळीशी येणारा माझा संबंध असा कायमचाच तुटला.

त्यानंतर मात्र तो कायमचाच भेटेनासा झाला. अनेक महिने दृष्टीस पडला नाही. कुणीतरी एक दिवस सहजपणे सांगितले की, तो कम्युनिस्ट पक्षात सामील झाला आहे. परंतु मी तिकडे विशेष लक्ष दिले नाही. मग एकदा तो मला भेटला आणि त्याने सांगितल्यावरून कळले की, काळी आता त्याच्या खोलीवरच राह्यला गेली आहे आणि तिच्याशी लग्न करायचा त्याचा बेत आहे!

## काही कथासंग्रह

मोकळा । राजीव नाईक
स्वस्तिक । अनिल डांगे
गंधर्व । बाळकृष्ण प्रभुदेसाई
त्रिसुपर्ण । प्रभाकर पाध्ये
निळेगर्द आणि लालभडक । ए० वि० जोशी
कॅक्टस व्हिला । सुरेश मथुरे
सांज । सखा कलाल
राखी पाखरू । चिं० त्र्यं० खानोलकर



मौज प्रकाशन गृह